# माणूस



इंडोनेशिया.... कोणीकडे ?

१५ मे १९६६

चाळीस पैसे

# फाशी ! ! !

सुभाषचंद्र बोस यांना

अमेरिकन सरकारने फासावर लटकावले काय ?

□ रा. म. शास्त्री यांचे एक स्फोटक टिपण

# दिनांगच्या तीरावर

आझाद हिंद सेनेच्या

नेफा–आसाम–ब्रम्हदेशमधील क्रांतिकार्यावर आधारित

□ एक साहसरम्य प्रदीर्घ कथा

लेखक ? ? ?

याशिवाय नेहमीची बंदीष

महावा वर्षारंभ अंक

# माणूस

१ जून १९६६

मूल्य चाळीस पैसे फक्त




वर्ष पाचवे : अंक चोविसावा : १५ मे १९६६

किंमत चाळीस पैसे : वार्षिक वर्गणी दहा रुपये

संपादक : श्री. ग. माजगावकर

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

---

व्हिएतनाम, इंडोनेशिया हे सध्या आपल्याला वाटतात इतके दूरचे विषय राहिलेले नाहीत. रोज यांसंबंधी नवीन घडामोडी घडत असतात, वृत्तपत्रांतून त्यांचे साद-पडसाद उमटत असतात, आपल्या देशाच्या प्रगतीवर, ध्येयधोरणांवर त्यांचे परिणाम होत राहतात. व्हिएतनामच्या युद्धाचा परिणाम आपल्याला चालू असणाऱ्या अमेरिकन मदतीवर होणार हे उघड आहे तर इंडोनेशियात झालेल्या कम्युनिस्टांच्या शिरकाणाचा योग्य तो शोध व बोध आपल्याकडील सत्ताधारी व राजकीय पक्ष घेणार हेही निश्चित आहे. म्हणूनच असे दूरचे वाटणारे, पण आपल्या भावी काळावर परिणाम घडवून आणणारे विषय निवडून ते विशेष विस्ताराने देण्याचा 'माणूस'चा प्रयत्न असतो. मागे 'व्हिएतनाम'संबंधी एक प्रदीर्घ लेख श्री. अरुण साधू यांनी 'माणूस'मध्ये लिहिला होता. तो अनेकांना आवडलाही होता. श्री. साधू यांचा इंडोनेशियासंबंधी असाच एक लेख या अंकात सादर केला आहे. वाचक याही लेखाचे स्वागत करतील असे वाटते.

पुढचा अंक हा 'माणूस'चा सहावा वर्षारंभ अंक आहे. या अंकातील 'विशेष' सोबतच्या कव्हर पान दोनवरील प्रकटनात दिले आहेतच. —सं.

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# देश-विदेश

## □ हेम बारुआंचा रहस्यस्फोट

नागांच्या तथाकथित भूमिगत संघराज्य सरकारशी भारत सरकारने युद्धतहकुबी करून आता १९ महिने उलटून गेले. पण स्वातंत्र्याच्या गेल्या १९ वर्षांत नागा प्रश्नाने जेवढ्या कटकटी निर्माण केल्या नसतील, तेवढ्या कटकटी या १९ महिन्यांत झाल्या. गुंतागुंत वाढत गेली एवढेच नव्हे, तर पूर्वी जे नागा प्रश्नाचे सरळ स्वरूप होते ते जाऊन त्यामागे आता काही रहस्येही निर्माण होऊ लागली आहेत. पूर्वी जे नागा समोरासमोर तीरकमठ्यांनी अथवा बंदुकांनी युद्ध करीत त्यांनी आता आधुनिक बॉम्ब्सच्या साहाय्याने रेल्वेगाड्या उलथून लावून दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचे आरंभिले आहे. आणि या सर्व गोष्टींमध्ये केंद्र सरकारच्या झोपाळूपणाची आणि गलथानपणाची भर पडली आहे. केंद्राच्या निष्काळजीपणाचे जे वाभाडे लोकसभेत निघाले, त्याने तर केंद्र सरकारने शरमेने मान खाली घालावयास हवी होती. खरोखर एखाद्या प्रगल्भ लोकशाहीच्या देशांत असला प्रकार घडला असता तर तेथील सरकार तरी गडगडले असते किंवा निदान संबंधित मंत्र्यांनी तरी राजीनामे दिले असते.

केंद्राच्या या अक्षम्य झोपाळूपणाची हकीकतही मोठीच चित्तथरारक आहे. १६ फेब्रुवारीला आसाम मेलला एक अपघात झाला. 'अपघातामध्ये घातपाताचे कारण नाही,' असे सरकारने तेव्हा निक्षून सांगितले होते. पण आता मात्र सरकारलाही तो अपघात घातपाताचाच प्रकार असल्याचे जाहीरपणे पटलेले आहे.

हा अपघात झाल्यानंतर बरोबर १९ दिवसांनी आसामधील जोरहाट या गावापासून जवळच एका रस्त्यावरून पोलिसांनी संशयावरून एक जीप अडविली. त्या जीपमध्ये ड्रायव्हर व एक नोकर सोडून आणखी तिघेजण होते. त्यांच्याजवळील काही कागदपत्रे जप्त करून पोलिसांनी त्यांना अटक केली. पण पुढे कुठून कशी कळ फिरली कोण जाणे. त्या इतर तिघांना पोलिसांनी सोडून दिले. आणि लगेच त्याच्या पुढच्या पंधरवड्यात आसामातील लुमडिंग आणि दिप्फु येथील रेल्वे गाड्यांच्या स्फोटांत १०० च्या वर बळी पडले आणि अनेक जखमी झाले. जीपच्या त्या घटनेमध्ये आणि या स्फोटांमध्ये वास्तविक संबंध लावण्याचे काही कारण नव्हते. पण त्यानंतर लोकसभेमध्येच एकामागून एक अशा ज्या घटना उजेडात आल्या त्या धक्का देणाऱ्या होत्या.

जीपमधील ज्या तिघांना पोलिसकस्टडीमधून रहस्यमयरीत्या सोडून देण्यात आले होते त्या तिघांतील एक होता तथाकथित नागा संघराज्याचा गृहमंत्री, दुसरा होता शेतकीमंत्री आणि तिसरा होता एक ब्रिगेडियर! त्यांच्याजवळ जी कागदपत्रे होती तीमध्ये नुकतीच एक महत्त्वाची कामगिरी पार पाडण्याबद्दलचा उल्लेख होता व लवकरच आणखी एक त्याहीपेक्षा महत्त्वाची कामगिरी पार पाडण्यासंबंधीच्या त्यात सूचना होत्या. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही गोष्ट आणि हा सारा तपशील लोकसभेपुढे आला तो सरकारतर्फे नव्हे तर एक विरोधी सदस्य श्री. हेम बारुआ यांना यातील एकेक तपशील सभागृहाला धक्के देत देत सादर करावा लागला आणि ही सारी माहिती तंतोतंत बरोबर असल्याचे गृहमंत्र्यांना कबूल करावे लागले. मग त्या तीन नागा पुढाऱ्यांना त्यांच्या कागदपत्रांसह सोडले कुणी? त्यांना डावलून त्यांच्याकडून कटाची पूर्ण माहिती का घेण्यात आली नाही? सरकारचे गुप्तहेर खाते एवढा सर्व वेळ झोपले होते की काय?

## कसून चौकशी?

या साऱ्या प्रश्नचिन्हांची उत्तरे अद्याप मिळत नाहीत. उलट त्यातून आणखीनच रहस्यमय प्रश्नचिन्हे निर्माण होत आहेत. विरोधी पक्षाच्या काही सदस्यांनी–नागा पीस मिशनच्या एका सदस्याने–दबाव आणून या तीन बंडखोरांना सोडल्याचा आरोप केला. त्यांचा रोख सरळ सरळ आसामचे मुख्यमंत्री चालिहा यांच्यावरच होता. नागालँडमध्ये ज्यांच्यामागे पोलिस लागले आहेत अशा भूमिगत नागा बंडखोरांना त्यांच्याच शेजारच्या राज्यात अशी वात्सल्यपूर्ण वागणूक मिळते याचा अर्थ तरी काय? या मागे कोठले रहस्य दडले आहे? मुख्यमंत्री चालिहा यांनी बहुधा याच कारणासाठी पीस मिशनच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला असावा.

बरे, त्या कागदपत्रांमध्ये त्या "महत्त्वाच्या कामगिऱ्या" ज्या दोन नागांवर सोपविल्याचा उल्लेख होता, त्या दोन नागांना तरी अद्याप सरकारने पकडले आहे काय? मुळीच नाही. अजूनपर्यंत तरी ते दोघे सरकारच्या हातावर तुरी देऊनच आहेत. गृहमंत्री नंदा म्हणतात, या साऱ्या प्रकरणाची कसून चौकशी चालू आहे. आणि त्यासाठी केंद्रीय अधिकारी व आसामी अधिकारी यांच्यांत बोलणीही चालू आहेत. दरम्यान रेल्वेचे स्टेटमंत्री अपघातस्थळी जाऊन आले आणि त्यांनी जाहीरपणे सांगितले की पोलिसांकडे घातपाताच्या प्रकरणाची संपूर्ण माहिती असतानाही त्यांनी योग्य ती काळजी घेतली नाही. पोलिसांनी आपली कामगिरी चोख बजावली असती तर निदान दुसरा दिफू येथील अपघात तरी टाळता आला असता.

हे रहस्यमय अपघात झाल्याबरोबर तथाकथित नागा संघराज्य सरकारने मात्र मुळीही वेळ न दवडता या घातपाताशी आपला कुठलाही संबंध नसल्याचे जाहीर

केले व शांततेच्या मार्गाने आपला प्रश्न सोडविण्याच्या आपल्या आश्वासनात आपण कसूर करणार नाही असेही वर सांगितले.

आता यातून दोनच पर्याय निघतात. एक तर हे भूमिगत नागांचे तथाकथित सरकार भारत सरकारला सपशेल बनवीत तरी असले पाहिजे नाहीतर भूमिगत नागांमध्येच जहाल आणि मवाळ असे तात्पुरते दोन तट पडलेले असले पाहिजेत. भारत सरकारचा बहुतकरून या दुसऱ्या पर्यायावरच अधिक भरंवसा असावा.

भारत सरकारच्या झोपाळूपणाचा आणखी एक नमुना. कम्युनिस्ट चीनचा अध्यक्ष लिऊ शाओची आणि इतर चिनी पुढारी पूर्व पाकिस्तानात आले असताना खास त्यांना भेटण्यासाठी म्हणून नागांची एक समिती डाक्क्याला गेली होती. हीही माहिती हेम बारुआंनीच लोकसभेला पुरविली आणि ज्यांच्या हाती देशातील साऱ्या सूक्ष्म राजकीय घडामोडींचे रिपोर्टस् जातात, देशातील गुप्तहेर खात्याची सूत्रे जे हलवितात त्या गृहमंत्री नंदांना मात्र ही माहिती खरी आहे किंवा काय, याची शहानिशा करण्यासाठी चौकशी करावी लागेल असे सांगावे लागले.

या दहशतकारी स्फोटांसाठी नागांनी जे बॉम्ब्स् वापरले ते त्यांनी आणले तरी कोठून ? त्यांना बंदुका, काडतुसे कोण पुरवितो ? त्यांना पैसा मिळतो तरी कोठून ? कुठला तरी बाहेरचा देश त्यांच्यामागे असल्याशिवाय त्यांचे असे चाळे चालणे शक्य नाही. आता त्यांच्या पाठीशी कोणता देश आहे याविषयी चर्चा चालू आहे. काही म्हणतात नागा लोक आपल्या ख्रिश्चन धर्माबद्दल अत्यंत जागरूक असतात. त्यामुळे ते कम्युनिस्ट चीनकडे आकर्षिले जाणे शक्य नाही. त्यांना पाकिस्तानचीच मदत मिळत असली पाहिजे. नागालँडमधील पाद्री लोकांशी अधिक घनिष्ठ संबंध असणाऱ्या पाश्चात्त्य वार्ताहरांचा तर हा आवडता मुद्दा. पण त्यात त्यांचा प्रचारकी थाट स्पष्ट दिसून येतो. कारण कम्युनिस्टांचा पाठिंबा बंडखोर नागांना मिळतो आहे हे बाहेरच्या जगात कळले तर साऱ्या पाश्चात्त्य देशांची सहानुभूती नागा चळवळीचे हे पाद्री नेते गमावून बसतील ना. त्यामुळेच रेव्हरंड स्कॉट्ही हेच जीव तोडतोडून सांगतो की नागांना कुठल्याही परकीय सत्तेचा पाठिंबा नाही. कम्युनिस्ट चीनचा तर नाहीच नाही.

वास्तविक पाहता या चर्चेतच काही तथ्य नाही. नागांना परकीय सत्तेची मदत मिळते आहे हे तर उघड आहे. ती पाकिस्तानची की चीनची अशी चर्चा करणे केवळ हास्यास्पद आहे. चीन आणि पाकिस्तान भारताविरुद्धच्या कोणत्याही कारणाला मदत करावयास एका पायावर तयार आहेत. आणि त्या दोघांचे सध्याचे प्रेमाचे संबंध लक्षात घेता दोघांचीही नागांना एकत्र मदत मिळणे अगदीच अशक्य नाही. भूमिगत नागांच्या तथाकथित सरकारचे प्रधानमंत्री कुघातो सुखाई मात्र अजूनही म्हणतात, "आम्ही खरोखरच कोणत्याही परकीय सत्तेची मदत घेत नाही हो."

## □ नाकेबंदीचा देखावा !

आफ्रिकेच्या दक्षिण विभागातील ऱ्होडेशियाच्या गोऱ्या वसाहती सरकारने ब्रिटिश राज्याविरुद्ध बंडखोरी करून आपले एकतर्फी स्वातंत्र्य पुकारल्याला आता सहा महिने होऊन गेले आणि त्या राज्याविरुद्ध ब्रिटनने आर्थिक नाकेबंदी घोषित केली होती त्यालाही आता चार महिने होऊन गेले. तरी पण ब्रिटनच्या अपेक्षेप्रमाणे आर्थिक नाकेबंदी होताच नाक मुठीत घेऊन ऱ्होडेशिया ब्रिटनला शरण जाण्याऐवजी ब्रिटिश पंतप्रधानांनाच आपले नाक मुठीत घेऊन ऱ्होडेशियन सरकारशी बोलणी करावयास जाण्याची पाळी आली आहे.

कारण उघड आहे. ब्रिटिश कारखानदारांचे आणि भांडवलदारांचे इतके हित-संबंध ऱ्होडेशियात गुंतले आहेत की ब्रिटिशांना ही नाकेबंदी खरे म्हणजे मनापासून नको आहे. जागतिक राजकारणात ऱ्होडेशियाला शिक्षा करण्याचा थोडा तरी देखावा करायला हवा म्हणून ही नाकेबंदी आहे. आणि ब्रिटनने आणि इतर आफ्रिकन राष्ट्रांनी कितीही नाकेबंदी केली तरी जोवर दक्षिण आफ्रिका आणि पोर्तुगाल ऱ्होडेशियाला मदत करावयास तयार आहेत तोवर या नाकेबंदीचा परिणामकारक उपयोग होणे शक्य नाही.

ऱ्होडेशियातील स्थानिक निग्रोंना गोऱ्यांच्या बरोबरीचे मताधिकार देण्याच्या प्रश्नावर मतभेद होऊन ऱ्होडेशियाच्या गोऱ्या सरकारने हे एकतर्फी स्वातंत्र्य पुकारले आहे. काळ्यांना जर आपल्या बरोबरीचे मताधिकार दिले तर त्यांच्या बहुसंख्येने आपली हकालपट्टी होऊन आपले हाल कुत्राही खाणार नाही हे गोरे वसाहतवादी जाणून आहेत. आणि त्यांचे ब्रिटनमधील भाईबंदही जाणून आहेत. तेव्हा जोवर ब्रिटिशांना खरोखर मानवी हक्कांची, स्वातंत्र्याची स्वार्थनिरपेक्ष चाह उत्पन्न होत नाही तोवर ऱ्होडेशियाचा प्रश्न सुटणे कठीण आहे. हिंदुस्थान किंवा ब्रिटिश साम्राज्यातील इतर वसाहतींत ठीक होते. तेथे गोऱ्या वसाहतवाल्यांची संख्या कमी होती. त्यामुळे तेथे स्थानिकांना स्वातंत्र्य द्यावयास त्यांना जड गेले नाही. पण ऱ्होडेशियात तसे नाही. फार मोठ्या गोऱ्या लोकसंख्येला येथे स्थानिकांच्या ताब्यात जावे लागेल.

वास्तविक पाहता ऱ्होडेशियाने एकतर्फी स्वातंत्र्य पुकारताच त्याविरुद्ध कायदेशीररीत्या लष्करी कृती करणे ब्रिटनला सहज शक्य होते. पण ब्रिटनच्या या मऊ धोरणाच्या पोटी तेथील गोऱ्यांविषयीची वात्सल्याची भावनाच आहे असे दिसते. मग तेथील काळे लोक गोऱ्यांच्या दडपशाहीखाली कितीही चिरडलेले गेले तरी ब्रिटनला त्याची विशेष चिंता नाही.

● ● ●

# लांडोबा पुंडोबांची नवी कहाणी

मो. ग. तपस्वी

" आटपाट नगर होतं. तिथं एक राजा होता... "
आमची आजी सांगायची. आम्ही ती कहाणी ऐकत असू.

तो जमाना गेला. आजी गेली. ती कहाणीही गेली. पण त्या कहाणीतला वसा अजून कायम आहे. तो वसा घेतल्याचे काय फळ असा प्रश्न आजकाल आपल्याला विचारीत नसून, तो वसा न घेतल्याचे हे फळ असे तो आपल्याला बजावीत आहे. ती कहाणी त्या काळीच्या नागांची होती.'

आजी सांगायची "...तिला नागदेवाने आपले मानले. माणसासारखा वेश धारण करून आपल्या घरी माहेरपणाला घेऊन गेला. तिथे नागदेवाची वायको प्रसूत झाल्यावर हिच्या हातून भीतीने पणती त्या नाग-पिलांच्या शेपट्यांवर पडली. त्यांच्या शेपट्या तुटल्या, भाजल्या, पोळल्या. हिला फार वाईट वाटले. नागदेवाने पुन्हा सासरी आणून घातली. हिला आपल्या 'त्या' भावांची आठवण यायची. ते लांडोबा पुंडोबा असतील तेथे सुखाचे असोत म्हणून ही त्यांच्या प्रतिमांचे पूजन करायची, त्यांचे कल्याण होवो असे देवाला विनवायची, दूधपाण्याचा नैवेद्य दाखवायची. हे लांडोबा पुंडोबा मोठे झाल्यावर सूड घ्यायला निघाले. आपल्या शेपट्या पोळून काढल्याचा जुना राग तिच्यावर काढायला निघाले. पण ती पूजा पाहून शरमले, वरमले. दंश करून निर्वंश करायला आले होते, ते रत्नहार ठेवून दूधपाणी पिऊन निघून गेले...

नागांची आणखीही एक कहाणी आहे...आमची आजी सांगायची...‘ शेतीचा हंगाम आला. शेतकरी शेत नांगरायला निघाला. शेत मोठे होते. त्यात नागांची वारूळे होती. ती याने नांगरली. त्याला माहीत नव्हते. नागीण आली. नांगर रक्ताने माखलेला पाहिला. तिचे रक्त तापले. शेतकऱ्याचा निर्वंश करायला गेली. सगळ्यांना डसली. सूड पेटला होता. तिला कळले या शेतकऱ्याची मुलगी दूर गावी राहते. तिला तरी का सोडा म्हणून निघाली. पण तिथे नागकुळाची पूजा सायसंगीत होताना पाहून हरखली. सूड विसरली. मनात विष घेऊन आली होती ती अमृत देऊन निघून गेली. शेतकरी मेला होता तो उठला. त्याची पोरेबाळे उठली. शेती पुन्हा पिकली, फळाला आली, नागाच्या कृपेने धनधान्याने देश समृद्ध झाला...”

आज त्या कहाण्या गेल्या. ती आजी गेली. पण शेतीवर जगणारा देश कायम आहे. नागांच्या सूडाने पेटलेले नागा लोक कायम आहेत. कुणाच्या तरी हातून कधी काळी त्यांचा निर्वंश झाला असेल. कुणाच्या तरी हातून चुकीने जळती पणती त्यांच्या शेपट्यांवर पडली असेल. त्यामुळे या एकसंध भारताच्या आत्म्याशी तादात्म्य पावण्याच्या त्यांच्या इच्छांची, आशाआकांक्षांची टोके तुटली असतील, अपरी वा लांडी बांडी झाली असतील. ते लांडोबा पुंडोबा भारताच्या वंशातून वेगळे होण्याच्या भावनेने भारताच्या मूळ अस्मितेचा एकदम नव्हे पण क्रमशः निर्वंश करायला निघाले आहेत. पण या नागांना, या नव्या लांडोबा पुंडोबांना चिथावणी द्यायला अनेकांची लुडबुड आज चालली आहे. या लाडोबांना कुणी लाडोबा केले आहे आणि त्यांच्या पुंडाईला शांततेने उत्तर देण्याची शिष्टाई चालवली आहे. त्यामुळे या पुंड लांडोबांना दूरगावी दिल्लीत त्यांच्या सत्त्वगुणाची चाललेली सात्त्विक पूजा दिसेनाशी झाली आहे. ही आजच्या नव्या लांडोबा पुंडोबांची कहाणी आहे.

## नवी कहाणी

ऐका तर ती नवी कहाणी. भारताच्या अगदी पूर्व सरहद्दीवर आसामच्या काहीसा ईशान्येकडे नागालोक वसला आहे. ३ लाख ७० हजार नागांची वस्ती आहे. ८६० वारूळांसारखी खेडी आहेत. १५ प्रकारचे नागा लोक त्यात राहतात. काहींना अंगामी, सेमा, ल्होथा, आओ, रेंगमा, चाकेसांग, सांगताम, कोन्याल, चांग, फोम यिमचुंगर, खिएमुंगन वगैरे नावे आहेत. नाग तसे भोळे, रक्षण करणारे आणि चिडले तर निर्वंश करणारे. ब्रिटिशांनी त्यांना छेडले नाही. उलट त्यांना आपला धर्म दिला, शिक्षण दिले. आपले केले. भारताच्या अस्मितेपासून वेगळे असे काही तरी त्यांना हळूहळू शिकवले. थोडी चूक आपलीही झाली. आपण स्वातंत्र्यासाठी संग्राम केला. पण त्याचे लोण या नागलोकांत पोचले नाही. ब्रिटिशांनी ते पोचू दिले नाही. त्यांमुळे नव्या भारताशी त्यांना आत्मिक जवळीक वाटावी तशी वाटली

नाही. त्यातून ख्रिश्चन मिशनरी आपल्या वाईटावर टपलेले. त्यांनी यांचा बुद्धिभेद केला. त्यामुळे स्वतंत्र भारताहून आपण काही कमी नाही अशी लांडोबापणाची भावना त्यांच्यात वाढली. त्यांनी सवता सुभा मागायला सुरुवात केली. आपल्या वाईटावर असलेल्यांनी या आगीला फुंकर घातली, तिचा निखारा केला, वणवा केला.

त्या धुमश्चक्रीत स्वातंत्र्यानंतरची उणीपुरी १० वर्षे गेली. नागालोकांची राजधानी कोहिमापासून दूरगावी दिल्लीत. त्यांच्या भावनांची जाण होती, त्यांच्या गुणांची कदर करायची वाण नव्हती, पण भारतीय वंशावळीची आणही कायम होती. तिला साजेशा भावनेने नागांना नवभारतात सामावून घेण्याचे प्रयत्न झाले. १९५७ च्या ऑगस्टात कोहिमामध्ये नागा पीपल्स कन्व्हेन्शनची बैठक झाली. २००० नागालोक तिला हजर होते. पण सवता सुभा मागणारी मंडळी त्याला आली नाहीत. त्यांचा आपला एकच ध्यास. आम्ही भारताहून निराळे होतो आहोत, व राहू. सरकारला हे रुचावे कसे? लांडोबांची पुंडाई सुरू झाली. ती मोडून काढायला सरकारी बंदुका सरसावल्या, तोफाही झडल्या, विमाने घरघरली, फौजा पुढे आल्या. शरण या नाही तर मरण जवळच आहे, असा जल्लोष उडाला. अखेर पुंड नागा आले नाहीत ते नाहीतच. ते भूमिगत झाले. तेव्हापासून त्यांना भूमिगत नागा म्हणण्यात येऊ लागले. नागा पीपल्प कन्व्हेन्शनने एक घटना तयार केली. तदनुसार भारतान्तर्गत घटक-राज्य म्हणून नागांसाठी त्यांचे एक राज्य आसामातून कोरून काढायचे ठरले. पुंड नागांचा नेता पिझो याला मात्र हे पटेना. आपल्याला भारताबाहेर सार्वभौम स्वतंत्र नागाराज्य हवे असे त्याचे म्हणणे व मागणे. या पुंडांची मने वळवण्यासाठी कन्व्हेन्शनच्या लोकांनी प्रयत्न करायचे असे ठरले.

पण तोवर पिझोच्या अनुयायांनी थैमान घालायला सुरुवात केली. तथापि त्यांचा जोर मंदावला होता. कारण कन्व्हेशनने केलेल्या घटनेनुसार सरकारने पावले टाकायचे ठरवले होते. ही घटना तयार करणाऱ्या समितीलाही बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागले. ज्या चिकित्सा समितीने या घटना समितीची नेमणूक केली होती, तिच्या सदस्यांना समितीच्या सद्धेतूबद्दल शंका आली. तिच्या करवी भारत सरकार नागांवर त्यांचे इच्छेविरुद्ध एक घटना लादत आहे असे त्यांना वाटले. तसा आरोप पुढे आला व चिकित्सा समितीच्या कित्येक नामवंत सभासदांनी त्याच्या निषेधार्थ राजीनामेही देऊन टाकले. ही मंडळी दुसऱ्यांच्या चष्म्याने पाहणारी होती. पिझो मिशनऱ्यांच्या नादी लागून फारच वाहवला होता. परंतु अखेर त्या घटनेत थोडे फेरफार करून भारत सरकारने झपाट्याने पावले टाकायला सुरुवात केली. डिसेंबर ५ ते ८ फेब्रुवारी १९६१ दरम्यान नियोजित प्रशासकीय विभाग आसामातून वेगळा करण्यात आला. ऑक्टोबर १९५९ मध्ये मोकॉकचुंग येथे नागा पीपल्स कन्व्हेन्शनचे आणखी एक सम्मेलन झाले. त्यांनी



[पत्रकारांसमवेत] डावीकडून पहिले सुखाई, दुसरे मायकेल स्कॉट

केलेल्या मागण्यांनुसार आसाम आणि नेफा यातील नागा भाग व नेफाची तुएन्सांग डिव्हिजन मिळून हा वेगळा प्रशासकीय विभाग करण्यात आला. त्यामुळे नागा लोकांत विश्वास निर्माण होऊ लागला. पुंडपणाची नांगी मोडली. ६०० वर नागा शरण आले किंवा गिरफ्दार झाले. घरेदारे सोडून जंगलात भूमिगत झालेली कित्येक कुटुंबे परत आपापल्या स्थानी स्थायिक झाली. खेड्यांवर पडलेले संशयाचे सावट दूर झाले. हे सर्व करायला अनेक वाटाघाटी झाल्या. आसाम सरकारशी व केंद्र सरकारशी बोलणी झाली. त्या सर्वांची परिणती १८ फेब्रुवारी १९६१ रोजी नागालॅण्ड प्रशासकीय विभागाच्या निर्मितीत झाली. —

## वेगळे घटकराज्य

रीतसर वेगळे घटकराज्य नागांना मिळण्याची ही नांदीच होती. या नागालॅण्ड प्रशासकीय विभागाला एक कारभार मंडळ देण्यात आले. त्यात पाच कारभारी होते. म्हणजे पाच मंत्र्यांचे हे मंत्रिमंडळच झाले. मुख्य कारभारी हा मुख्य मंत्री झाला. ४५ सभासदांची एक हंगामी सभा या विभागाला मिळाली. हे जणू भावी आमदारच. या हंगामी सभेचे स्वरूप विधानसभेसारखे. तिचे पहिले अध्यक्ष झाले डॉ. इमकाँग्लीवा आओ. पण सात महिन्यांतच त्यांचा पुंड नागांनी भर रस्त्यात दिवसाढवळ्या खून केला. पुन्हा दशहत पसरली. पण भारतनिष्ठ नागांचा निश्चय ढळला नाही, आचार चळला नाही. टी. एन. अन्गामी नवे अध्यक्ष झाले.

डॉ. शिलु आओ यांच्या नेतृत्वाखाली नागालॅंडचे कारभार मंडळ अधिकारावर आले. यात मार्च महिना लोटला. पुंडोबांची पुंडाई तरीही चालू होती. त्यांचा धीमोडही होतच होता. अखेर २१ ऑगस्ट १९६२ रोजी नेहरूंनी संसदेत नागालॅण्ड विधेयक मांडले. त्याबरोबरच १३ वे घटनादुरुस्ती विधेयकही मांडण्यात आले. आणि येथेच लांडोबांना लाडोबा व पुंडोबांना पंडित करण्याची बीजे पेरली गेली. कारण नेहरूंनी नागालॅण्डबाबत जे विधेयक मांडले त्यात कन्व्हेन्शनच्या काही मागण्या अन्तर्भूत करण्यात आल्या. या मागण्या अप्रत्यक्षपणे नागा लोकात एकात्मते-ऐवजी पृथकता निर्माण करण्यास कारणीभूत ठरतील अशाच होत्या. या विधेयकान्वये काही खास तरतूदी करण्यात आल्या. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी राज्यपालावर विशेष जबाबदारी टाकण्यात आली, आणि ती निदान पुंड नागांचा पुंडावा चालू असेपर्यन्त राहील अशी व्यवस्था करण्यात आली. तसेच असेही कायद्याने मान्य करण्यात आले की भारतीय संसदेचा कोणताही कायदा नागा लोकांच्या धार्मिक व सामाजिक प्रथा व प्रघात यांना त्यांच्या परंपरागत आचार–नियमांना, इतकेच काय परंतु जमिनीची मालकी व हस्तांतरण यांनाही लागू होणार नाही अशी तरतूदही त्यात करण्यात आली. याला जरतारी किनार लावली व फक्त एकच आणि ती म्हणजे नागालॅंड विधानसभेने मंजुरी दिली तरच संसदीय कायदा तिथे लागू होई.

यावर त्या वेळी संसदेत झालेली उलट सुलट चर्चा वाचकांनी वाचून पाहावी. अनेकांनी या तरतुदीच्या औचित्याबद्दल शंका घेतली. सत्तारूढ पक्षातही तसे लोक निघाले. अखेर सरकारला या विधेयकात एक दुरुस्ती करावी लागली आणि तदनुसार या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना जर काही अडचणी आल्या तर त्या दूर करण्यासाठी म्हणून राष्ट्रपती जो काही अध्यादेश काढू इच्छितील तो संसदेपुढे मांडावा लागेल. यातूनही काही फारसा फायदा व्हायचा नव्हताच. पण अपाय झालाच तर तो सरकारला नाकारता येणार नाही एवढाच दिलासा मिळाला होता. संसदेच्या दोन्ही सभांनी ही विधेयके सप्टेंबर ६२ मध्ये मंजूर केली आणि तिकडे चीनचे आक्रमण झाले. सारा डाव उधळला. नेहरूंना त्यांच्या आयुष्यातील सगळयात मोठे गणित चुकल्याचा धक्का बसला. त्याने ते खचलेच आणि तिकडे पुंड नागांना आपल्या पोराबाळांच्या शेपट्यावर ही जळती पणतीच पडल्यासारखे वाटले. आता आपल्यातील काही नागा भारत सरकारच्या या नव्या व्यवस्थेने फितवले जाणारा याची त्यांना खंत वाटू लागली–खेद वाटू लागला. त्यांच्या मनात ख्रिश्चन पाद्र्यांनी फुंकार घालून घालून जागवलेल्या खोट्या स्वाभिमानाचा हा घोर अपमान आहे असे त्यांना वाटले आणि हे विपस्फुल्लिग चेतविण्यात फिझोच्या निमित्ताने ब्रिटिश पाद्र्यांनी थोडीही कसूर ठेवली नाही

## शांतता मंडळाचा बूट

लोकशाही घटनाचक्राची सर्व सव्यापसव्ये पूर्ण होता होता आणि चिनी आक्रमणातून ठेचाळलेला देश जरा सावरता सावरतो १९६३ साल संपायला आले आणि अखेर १ डिसेंबर १९६३ रोजी पं. नेहरूंच्या हस्ते भारतातील सोळाव्या घटकराज्याच्या रूपात नागालॅण्डचे रीतसर उद्घाटन झाले. पिझोवर खटला भरण्यात आला. पण तो पोलिसांना सापडला नाहीच. उलट त्याचे हातावर तुरी देऊन पार परागंदा झाला आणि एकदम लंडनमध्ये उपटला. भारतातून राज्याचा सुंभ जळाला तरी ब्रिटिशांचा त्याबाबतच्या आकसाचा पीळ कायम होता. त्याने पिझोला आसरा दिला. भारतीय नागरिकत्व जाताच त्याला ब्रिटिश नागरिकत्वही दिले आणि मग काही दिवस पिझोचा स्वतंत्र सार्वभौम नागाराज्याचा शिमगा लंडनहून चालत राहिला आणि तोही गेल्यावर काही दिवस उरलेले त्या शिमग्याचे कवित्वही कालांतराने विरून गेले.

तथापि असे वरकरणी भासत असले तरी ब्रिटिश राजनीती अशी सहजासहजी हार मानणारी नव्हती. भारतातून जाता जाता जशी त्यांनी या देशाची दोन कृत्रिम शकले करून आपल्या मागे पाकिस्तानची कायम कटकट लावून दिली, तशीच पिझो यांचे नेतृत्वाचा बार फुसका ठरताच त्यांनी या आखाडयात घेतलेली पडी उलथवली आणि मायकेल स्कॉटच्या मिषाने नवा डाव टाकला. बंडखोर नागांचे बंडाचा एव्हांना बिमोड झाल्यासारखा होता. एकनिष्ठ नागांच्या आकांक्षांना शिलु आओ यांचे नेतृत्वाने स्थापन झालेल्या सरकारमार्फत भारतीय खतपाणी मिळत होते. त्यामुळे बंडखोर नागांचा धीर खचत होता. तो मायकेल स्कॉट यांच्या आगमनाने गुप्तपणे सावरला गेला. वाटाघाटीसाठी तयार आहोत या नव्या धूर्त परवलीने स्कॉटने बंडखोरांचा बंडावा आणि त्यांचेविरुद्ध सुरू झालेले सरकारी दमन दोन्ही थांबवले. तोवर, नागालॅण्डमध्ये सार्वत्रिक निवडणुकी होऊन लोकनियुक्त सरकार अधिकारावरही आले होते. १९६४ चा प्रजासत्ताक दिवस नागालॅण्ड सरकारने इतर राज्यांबरोबरच साजरा केला.

भारतीय शस्त्रसामर्थ्यापुढे टिकाव लागणे अशक्य आहे असे दिसताच स्कॉटप्रभृती लोकांनी शांतता मंडळाचा बूट काढला. जयप्रकाश नारायण, आपले शंकरराव देव, आसामचे मुख्यमंत्री चालिहा हेही स्कॉटच्या भुलावणीच्या जाळयात आले आणि स्कॉट तर हवेतच या नागा-आग्रहामुळे हे तिघे व स्कॉट अशा चौघांचे मिळून एक नागालॅण्ड शांतता मंडळ स्थापन झाले. याच ठिकाणी आमच्या नेतृत्वाने आणखी एक चूक केली. रीतसर निवडणुका होऊन लोकनियुक्त सरकारचे मुख्यमंत्री बनलेल्या डॉ. शिलु आओ यांची उपेक्षा या शांतता मंडळात झाली. इकडे तोवर पं. नेहरू निधन पावले होते. लालबहादूर शास्त्रींचा जमाना सुरू झाला होता.

[ पृष्ठ ७८ वर चालू ]

# विचार धारा

## • धान्यटंचाईचे मूलभूत कारण

" खेड्यांतील जनतेचे योग्य नेतृत्व करू शकणाऱ्या मंडळींचा अभाव आणि खेड्यांतील तरुणाने शिक्षण मिळविल्यावर आपली जमीन सोडून पांढरपेशा व्यवसायाच्या शोधार्थ इतरत्र जाणे, या दोन मूलभूत कारणांमुळे बऱ्याच प्रगतिशील देशांत अतीव्र धान्यटंचाई निर्माण झाली आहे," असे ठाम मत श्री. रॉजर हिक्स या अमेरिकन तज्ज्ञाने परवा दिल्लीच्या मुक्कामात बोलून दाखविले. श्री. हिक्स भारत, ब्रह्मदेश व सिलोनमध्ये १६ वर्षे राहिले असून, त्यांनी या देशांच्या समस्यांचा बारकाईने अभ्यास केला आहे.

सिलोनमध्ये तर शालांत परीक्षा दिल्यावर आपली जमीन सोडून जाणाऱ्या ग्रामीण तरुणांचे प्रमाण " मोठे भयानक " आहे. या तरुणांनी खेड्यांत काम करण्याचे नाकारल्यामुळे दोन लाख एकर सुपीक जमीन पडीक राहिली आहे. आजूबाजूच्या इतर देशांप्रमाणे सिलोनमध्येही फार मोठी धान्यटंचाई आहे. आयात होणाऱ्या मालांत ५२ टक्के धान्य असल्याने औद्योगीकरणाऱ्या गतीवरही परिणाम झाला आहे. देशाला लागणाऱ्या तांदळापैकी ४० टक्के तांदळासाठी परदेशी चलन खर्च करावे लागते. त्याचा भार सध्याच्या उद्योग-धंद्यांनाही जड वाटत आहे.

धान्यटंचाईच्या मूलभूत समस्येचे मूलभूत उत्तर काय ? सिलोनी तरुणांना शेतीची आवड लावण्यासाठी सिलोन सरकारने एक योजना आखली आहे. त्या योजनेनुसार पुढील काही वर्षांच्या कालावधीत २०,००० विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेनंतर खेड्यांत परतण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. परतणाऱ्या प्रत्येक तरुणाला २५० रुपये मासिक उत्पन्नाची हमी देण्यात येईल. शंभर-शंभर विद्यार्थ्यांची एक-एक वसाहत करून त्यांना जंगल साफ करण्यासाठी व शास्त्रीय पद्धतीने शेती करण्यासाठी ट्रॅक्टर व इतर अवजारे देण्यात येतील.

ही योजना सफल व्हावी म्हणून सिलोन सरकारच्या मदतीने हिक्स यांनी आणखी एक योजना आखली आहे. जंगल साफ झाल्यावर तेथे ज्या नवीन वसाहती होतील त्यांचे नेतृत्व करण्यासाठी एक ' नेत्यांची शाळा ' उघडायची अशी ती योजना आहे. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांतल्या तज्ज्ञांच्या मदतीने १००-१०० विद्यार्थ्यांसाठी तीन-तीन महिन्यांचा शिक्षणक्रम आखण्यात येणार असून त्यात शेती, जनावरे व कोंबड्या इत्यादी पाळणे. यातल्या आधुनिक शास्त्रीय तंत्रांचे शिक्षण तर देण्यात

येईलच, पण चांगले नागरिक कसे व्हावे याचेही शिक्षण देण्यात येईल. या शिक्षण-क्रमाची मूलभूत कल्पना नवीन स्थापन होणाऱ्या वसाहतीसाठी जबाबदार नेते निर्माण करणे ही आहे.


भारत-सिलोनसारख्या देशांतल्या सुशिक्षित मंडळींना शेतीत स्वारस्य का वाटत नाही ? उत्तर : पूर्वी या देशांच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जे एकांगी शिक्षणविषयक धोरण अंगीकारले होते त्याचा हा परिणाम आहे.

## ● अमेरिकेतील हरिजन

अमेरिकन सरकारच्या रेड इंडियन खात्याचे आतापर्यंतचे प्रमुख आणि एक निष्णात मानववंशशास्त्रज्ञ डॉ. फिलिओ नॅश हे भारतात हरिजन-समस्या सोड-विण्यासाठी काय उपाययोजना होत आहे याचे निरीक्षण करण्यासाठी इकडे आले आहेत. भारताची हरिजन-समस्या आणि अमेरिकन सदसद्विवेकबुद्धीला भारभूत होऊन बसलेली रेड इंडियन समस्या यांच्यांत बरेच साम्य आहे. अर्धा रेड इंडियन समाज अजून राखीव जागांतून राहत आहे व अशा लोकांची संख्या दर ३० वर्षांनी दुप्पट होत आहे त्यांची स्थिती सुधारण्याचे प्रयत्न अमेरिकन सरकार गेली ३० वर्षे करीत आहे व प्रत्येक रेड इंडियन स्त्री, पुरुष व मुलाला खास सवलती देण्यासाठी दरवर्षी माणशी १००० डॉलर (म्हणजे सुमारे ५००० रुपये) खर्च करीत आहे. पण एवढे करूनही समस्येच्या गाभ्याला अजून हात घातला गेलेला नाही. " केवळ पैशाने हा प्रश्न सोडविता येत नाही—पण पैशाशिवाय तो सोडविण्याच्या कामी फारशी प्रगतीही करता येत नाही. भारतात इतरही बरेच प्रश्न असल्याने तुम्हांला हरिजनांवर फारसे पैसे खर्च करणे शक्य नाही; पण तुम्ही इतर साधनांनी हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहात तो कोणती हे पाहण्यासाठी मी आलो आहे. "

अमेरिकेत रेड इंडियन समाजाचा प्रश्न सोडविण्यासाठी काय करायला पाहिजे ? —आज ना उद्या त्यांच्या राखीव जागेतही आधुनिक संस्कृती शिरणारच, तेव्हा या आक्रमणाचा आघात सहन करण्यासाठी त्यांची तयारी केली पाहिजे. आज या आघाताला ते कसे तोंड देऊ शकतील ? मला वाटते मायकेल स्कॉटजवळदेखील या प्रश्नाचे उत्तर सापडणार नाही. "

● ● ●



## □ नेताजी सुभाषबाबूंची पाचावर धारण !

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जन्मदिनी नभोवाणीवर पाच वर्षांतून एकदा कार्यक्रम करावा असे सरकारने ठरवले आहे. परवा राज्यसभेत नभोवाणी खात्याच्या उपमंत्र्यांनी ही माहिती दिली. विरोधी पक्षांच्या सभासदांनी या गोष्टीचा निषेध केला. " ज्यांचे जन्मदिन पाळले जावेत, अशा पुढाऱ्यांची संख्या देशात बरीच मोठी आहे, " असे उद्‌गार मंत्रीणबाईंनी काढल्यावर तर काय गोंधळ उडाला नुसता. हा नेताजींचा अपमान आहे, असे काहीजणांना वाटले, तर काहींनी हे शब्द मागे घेण्याची मागणी केली. शेवटी बाईंनी क्षमा मागितली. मग नभोवाणी खात्याचे मंत्री खुलासा करायला उठले. ते म्हणाले, " अहो, हे सगळे मध्यवर्ती कार्यक्रम सल्लागार समितीच्या शिफारशींप्रमाणेच आम्ही केले. समितीने अशी सूचना केली की, गांधीजी, नेहरू आणि शास्त्री यांचे फक्त जन्मदिन प्रतिवर्षी नभोवाणीवर साजरे व्हावेत आणि नेताजी, डॉ. राजेंद्रप्रसाद, पंडित पंत यांचे जन्मदिन पाच पाच वर्षांनी व्हावेत. नेताजींबद्दल आम्हांला काय आदर नाही ? तुमच्यापेक्षा जास्त आहे. पण प्रातिनिधिक सल्लागार समितीची सूचना आहे ही. सरकारला तिचा अव्हेर करून कसा चालेल बरे ? " या खुलाशानेही सभासदांचे समाधान झाले नाही. तूर्त, या विषयावर थोडा वेळ चर्चा करण्याच्या सूचनेवर विचार करण्याचे आश्वासन अध्यक्ष डॉ. झकीर हुसेन यांनी दिले आहे.

बातमी वाचली आणि मती गुंग झाली बुवा आपली. किती लहानसहान गोष्टींसंबंधी आम्ही भांडत असतो पाहा. काय म्हणावे या मोठ्या मंडळींना ! सरकारचे म्हणणे तरी नीट समजावून घ्यायचे होते त्यांनी. खोटी गोष्ट आहे का ? ज्यांचे जन्मदिन साजरे करावेत अशा पुढाऱ्यांची संख्या आपल्या देशात थोडी का आहे ? वर्षाचे दिवस ते असे किती ? तीनशे साठपासष्ट, अन् पुढारी ? नुसते काँग्रेसचेच घेतले तर दोनतीन हजार निघतील. तरी बरे, जन्मदिन साजरा करायचा म्हणजे तो पुढारी मेलेला असावा लागतो. जिवंत पुढाऱ्यांचे वाढदिवस नभोवाणीवरून करायचे ठरवले तर मग ही संख्या तिप्पट–चौपट तरी होईल ! कुणाकुणाचे वाढदिवस करायचे ? मग दुय्यम पुढाऱ्यांचे जन्मदिन पाच पाच वर्षांनी एकदा करावेत असे कुणी म्हटले तर त्यात चूक काय ? सुभाषबाबू हे बोलूनचालून बंगालचे पुढारी. त्यातून शस्त्राचारांवर त्यांचा विश्वास ! गांधीजींची इच्छा नसताना काँग्रेसचे अध्यक्ष होण्याइतका उर्मटपणा अंगात. युद्धकाळात तर कहरच केला. स्वारी जी पळाली ती जर्मनी, जपानला जाऊन, आझाद हिंद सेना स्थापन करून आणि इंफाळ–मणिपूरपर्यंत येऊन मोकळी. अडचणीत असलेल्या ब्रिटिशांना असे कोंडीत पकडणे आणि खुशाल त्यांचे रक्त सांडणे हे त्यांना शोभून तरी दिसले का ? शांततावादी आणि अहिंसा-

प्रेमी भारताच्या या पुत्राला हे बरे दिसले काय ? मग त्यांना दुय्यम पुढाऱ्यांच्या यादीत ठेवले तर बिघडले कोठे ? मी तर म्हणतो, आमचे सरकार कनवाळू अंतः-करणाचे आणि लोकशाहीवादी आहे म्हणून एवढे तरी घडले आहे. पाच पाच वर्षांनी का होईना, पण वाढदिवस साजरे होतील. नभोवाणीवर त्यांचे नाव घेतले तरी जाईल. अहो, कोण एवढे तरी करायला बसले आहे सांगा पाहू. पदरात पडेल तेवढे घ्यावे, समाधान मानावे. पण हा शहाणपणा विरोधी पक्षांजवळ असता तर मग ते विरोधी पक्षात कशाला राहिले असते ? सत्तारूढ पक्षात जाऊन केव्हाच मंत्रिपदाच्या श्रेष्ठ आसनावर बसून मोक्षप्राप्तीचा आनंद उपभोगीत राहिले नसते का ? ' निर्वाचनफले विपरीतबुद्धी ' हेच खरे !

याबाबतीत आपले बाळासाहेब खेर मुख्य मंत्री असताना ज्या बाणेदारपणे वागले त्याची आठवण झाली. पंधरावीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. आता किती जणांना ती ठाऊक असेल माहीत नाही. पण लाख माणूस. विधानसभेत कुणीतरी विरोधी पक्षाच्या सभासदाने विचारले की, शिवाजीमहाराजांच्या जन्माची सरकार का सुटी देत नाही ? सुटी देण्याबाबत सरकारचे धोरण तरी काय आहे ? तेव्हा बाळासाहेब म्हणाले की, गांधी, नेहरू अथवा युगपुरुषाच्या जन्मदिनीच सुटी देण्याची सरकारी वहिवाट आहे. मग शिवाजीमहाराज हे युगपुरुष नाहीत, असे सरकारला वाटते काय, हा लगेच पुढचा प्रश्न. पण बाळासाहेबांचे कामच निर्भीड अन् लख्ख. त्यांनी स्वच्छ सांगितले की, "होय, सरकारला तसेच वाटते." सरळ उत्तर दिले की, प्रश्न कसा चुटकीसरशी सुटतो पाहा ! बाळासाहेबांनी तेच नेमके केले. एक ऐतिहासिक सत्य सांगितले. नाहीतरी शिवाजीमहाराजांना युगपुरुष का म्हणायचे हे कोडे मला अजूनही सुटलेले नाही. तीनशे वर्षांपूर्वीची गोष्ट ही. त्या वेळचा माणूस युगपुरुष होईलच कसा ? गांधी-नेहरूंच्या आधी कुणी युगपुरुष या देशात होऊन गेला असेल शक्य तरी आहे काय ? कॉंग्रेसचे अध्यक्ष पट्टाभी सीतारामय्या यांनी एके ठिकाणी मागे म्हटले होते—"देशाचा खरा इतिहास हा एकोणीसशे वीसपासून सुरू होतो." तीनशे वर्षांपूर्वी देशाला आपला इतिहासच नव्हता. मग युगपुरुष होईलच कसा ? आणि त्याच्यासाठी सुटी मिळावी कशी ? उगीच आपली उचलली जीभ अन् लावली टाळ्याला.

म्हणून, सुभाषबाबूसंबंधी ही जी पंचवार्षिक योजना सरकारने आखली तिला माझा तरी पाठिंबा आहे. गांधी, नेहरू, शास्त्रीजी ही केव्हाही थोर माणसे. त्यांचे वार्षिक जन्मदिनच काय, पण मासिक दिनही साजरे करायला हरकत नाही. दर शुक्रवारी बापूजींची साप्ताहिक आठवण नभोवाणीवर काढतात ती उत्तम आहे. बाकीचे दुय्यम अन् तिय्यम पुढारी मात्र पंचवार्षिक योजनेत बसवावे. सरदार पटेलांचा जन्मदिन दहा वर्षांनी एकदा साजरा करावा असे मला वाटते. आणि टिळक, सावरकर यांच्या बाबतीत तर साठ वर्षांनी एकदा असे प्रमाण ठेवून नवीन

कपिलाषष्ठी सरकारने सुरू करावी. तरच या विरोधी पक्षीय सभासदांची आरडा-ओरडा करण्याची उपद्व्यापी खोड जाईल. नाहीतर साध्या, सरळ गोष्टींवरही वादंग घालून आपल्या गरीब आणि सज्जन सरकारला त्रास देण्याची परंपरा ते तशीच चालू ठेवतील.

## ☐ मिशनरी बापाचे 'कॉपीराईट्' अध्यात्म !

वेळगावकडची कुठलीही बातमी हल्ली मी वाचायला लागलो की काहीतरी अन्याय घडलेला आहे याबद्दल आधीच माझी खात्री असते. गेली दहा वर्षे तेथील मंडळींचा जो छळवाद चालू आहे त्याला खरोखरच तोड नाही. त्यामुळे 'बेळगाव' आणि 'अन्याय' हे दोन शब्द एकदमच माझ्या मनात येतात आणि कसे वाईट वाटते. आता परवाचीच बातमी पाहा. झाले असतील पंधराएक दिवस. तेथील लिंगराज महाविद्यालयात म्हणे बी. ए. ची परीक्षा चालू होती. फादर कुटिन्हो नावाचे गोव्याचे कुणी 'पिताजी' परीक्षेला बसले होते. 'अध्यात्म' हा विषय घेऊन बिचारे परीक्षेस बसलेले. पण परीक्षकाने सरळ आपले या पेपराच्या वेळी कॉपी करताना फादरना पकडले. त्यांना रस्टिकेट करावे अशी शिफारसही कर्नाटक विद्यापीठाकडे केली आहे असे म्हणतात. संभाव्य प्रश्न आणि त्यांची उत्तरे यांचे कागदच्या कागद त्यांच्याजवळ सापडले अशीही बोलवा आहे.

बातमी वाचली आणि आश्चर्याने थक्क झालो. अध्यात्मासारखा पवित्र विषय. त्यातून 'फादर'सारखा थोर माणूस, आणि कॉपीच्या नावाखाली त्याला त्रास द्यायचा. रस्टिकेट करण्यापर्यंत त्याच्यावर पाळी आणायची ? आता अगदी हद्द झाली. हल्ली या पर्यवेक्षकांना झाले आहे तरी काय ? आधी असली कामे करण्यासाठी त्यांची नेमणूक मुळीच झालेली नसते. बरे पकडलीत एखाद्याची कॉपी तर निदान एखाद्या पोरासोराची तरी पकडायची. 'फादर'सारख्या एका आदरणीय माणसाची फटफजिती करायची ? हरहर ! 'सकल पृथ्वी आंदोळली, धर्म गेला' ... दुसरे काय म्हणायचे ?

या दीड शहाण्या पर्यवेक्षकाने एवढी गोष्ट तरी लक्षात घ्यायची होती की, फादरसाहेबांचा पेपर 'अध्यात्म' या विषयावरचा आहे. पण 'अध्यात्म' कशाशी खातात हे माहीत असेल तर ना ! अध्यात्म म्हणजे चिन्मय, चिदानंद स्वरूप. भेदातीत अवस्था ( असे निदान काही तरी म्हणतात खरे. नक्की या शब्दांचे अर्थ मलाही माहीत नाहीत. ) मन कसे उन्नत अवस्थेत पोचलेले. भेदभाव आणि मीपणाचा अहंकार पूर्णपणे ज्याचा गळतो तोच अध्यात्माचा अधिकारी. फादरसाहेब या विषयाचे खरे ज्ञानी असले पाहिजेत हे उघड आहे. त्याशिवाय का कुणी असे करील ? सगळी मायाच. शेवटी 'ब्रह्मं सत्यं जगत् मिथ्या' दिसते ते सगळे भासरूप, खोटे. एक ब्रह्म काय ते सत्य. फादरसाहेब या श्रेष्ठ पातळीवर पोचलेले कुणी तरी थोर संत असतील हे साधे सत्य या पर्यवेक्षकाला उमगले नाही ? अरेरे ! साधु-

संतांचा छळ करण्याची परंपरा आपल्या समाजात अजूनही असावी हं?...पुस्तकात कागदावरले बघून लिहिलेले काय, अन् न बघता लिहिलेले काय, साधु–पुरुषाला सगळेच सारखे असते. बरे, मागे एकदा एका गुरुजींची अशीच पंचाईत शिष्याने करून ठेवली होती. गुरुजी अरण्यामध्ये एका वृक्षाखाली बसून शिष्याला असेच 'अध्यात्म' शिकवीत होते. ही सगळी माया आहे, जे डोळ्यांना दिसते ते सर्व खोटे आहे हे महान् अध्यात्मिक सत्य ते विद्यार्थ्याला प्रेमळपणाने पटवून देत होते. तेवढ्यात एक पिसाळलेला रानटी हत्ती ची–ची करीत गुरुजींच्याच रोखाने धावत आला. पण गुरुजी असे चलाख की, काही विचारू नका. पोथी तिथेच टाकून धोतर सावरीत त्यांनी एकदम धूम ठोकली. त्यांना पळताना पाहून चेला लेकाचा खवचटपणाने (पण पळत पळतच) म्हणतो कसा–"गुरुजी, अहो, आताच ना तुम्ही म्हणालात की, ही सगळी माया आहे म्हणून? जे दिसते ते सगळे खोटे–मिथ्या–आहे म्हणून? मग पळताय् कसे? अहो, हा हत्तीही मिथ्याच आहे." पण गुरुजी खरेखुरे गुरुजी. भारी हुषार. पळता पळताच ते म्हणाले, "नाही कोण लेकाचा म्हणतो? हा हत्तीही मिथ्याच आहे. अन मूर्खा, मी हा जो पळताना तुला दिसतो आहे, तेही सगळे मिथ्याच आहे. सगळाच केवळ भास आहे!"

फादरसाहेबांनी असेच काहीतरी करून त्या पर्यवेक्षकांची चांगली जिरवायला हवी होती. माझ्याजवळ जे कागद दिसताहेत, तो सर्व तुझा साध्या चर्मचक्षूंना होणारा केवळ एक भास आहे असे त्यांनी ठणकावून सांगायचे. म्हणजे त्या पर्यवेक्षकांची दातखिळीच बसली असती. खरे म्हणजे ही विद्यापीठाचीच चूक. अशा विषयावर पेपर कसला ठेवलाय? 'गुरोस्तु मौनं व्याख्यानम्' हे अध्यात्मातले महत्त्वाचे सूत्र लक्षात ठेवायचे. कुणीही तीन तास नुसता गप्प बसून राहिला की लगेच त्याला पास करून टाकायचे. आहे काय अन् नाही काय!

## □ वंदे मातरम् : पक्षीय आणि राष्ट्रीय

पुण्याच्या शनिवारवाड्यासमोरची एक सभा. तिचे वैशिष्ट्य ते काय असायचे? ठरल्याप्रमाणे सभा झाली. कार्यक्रम संपला आणि 'वंदे मातरम्' सुरू झाले. राष्ट्रगीतासाठी सगळी माणसे उठून उभी राहिली. राष्ट्रगीत चालू असताना मध्येच व्यासपीठावर कम्युनिस्ट पक्षाचे एक कार्यकर्ते वसंतराव तुळपुळे खाली आले आणि निघून गेले. तुळपुळे यांच्या या वागण्याने सगळ्यांनाच धक्का बसला. राष्ट्रगीताचा असा अपमान करणे हे त्यांना शोभले नाही, असे बऱ्याच जणांचे मत पडले. त्यांच्या या वागण्याचा निषेध मागाहून करण्यात आला म्हणतात.

वसंतराव तुळपुळे यांच्या या वर्तनाने मला पहिल्यांदा आश्चर्य वाटले होते. कम्युनिस्ट पक्षाचा कार्यकर्ता आणि राष्ट्रीय रीतिरिवाज पाळत नाही म्हणजे काय? असे होणे शक्य नाही. कम्युनिस्ट पक्ष राष्ट्रीय परंपरा सोडून कधी वागायचा

नाही, ही तर बालंबाल खात्री. शिवाजीमहाराज कम्युनिस्ट होते हा शोध त्यांच्यापैकीच, लालजी पेंडसे नावाच्या एका विद्वानांनी लावला होता. ( त्याच्यापुढचे संशोधन अजून कुणी केलेले नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ते केलेच असते तर तानाजी हा कडवा उजव्या गटाचा आणि बाजी प्रभू देशपांडे, नेताजी, येसाजी ही डाव्या गटाची होती असा बहुमोल शोध केव्हाच लागून गेला असता, पण ते असो. ) स्वतःला ते 'भारतीय' कम्युनिस्ट म्हणवून घेतात. यात त्यांचे भारतीयत्व स्पष्ट होते. चीनशी वाटाघाटी करून हा वाद मिटवून टाकावा अशी त्यांची जोराची मागणी. आहे की नाही ? आपल्या देशाबद्दल आस्था असल्याशिवाय का कोणी असली सूचना करील ? मग झाले तर ! हां, सांगायचा मुद्दा काय, की तुळपुळे यांनी आपल्या राष्ट्रगीताबद्दल इतका अनादर दाखवलाच कसा हे मला कोडे पडले होते. पण परवाच्या त्यांच्या खुलाशाने मन कसे प्रसन्न झाले. तरी म्हटलेच, वसंतराव तुळपुळे असे वागतीलच कसे ?

तुळपुळेसाहेब आपल्या खुलाशात म्हणतात की, 'वंदे मातरम्' या गीतामधील पहिल्या दोन कडव्यांनाच राष्ट्रगीताचा दर्जा आहे. आपण नेहमी दोनच कडवी सभेतून म्हणतो, तिसऱ्या कडव्यापासून ते राष्ट्रगीत नाही. म्हणून त्या वेळी, सभेतून निघून जाणे यात आक्षेपार्ह काही होत नाही. राष्ट्रगीताचा त्यामुळे अपमान होत नाही. तुळपुळे यांनी आणखी पुढे खुलासा करून सगळ्या विरोधकांची अगदी फटफजिती करून टाकली आहे. ते म्हणतात, "त्या सभेत जेव्हा पुढची कडवी म्हटली जाऊ लागली तेव्हा मी व्यासपीठावरून खाली उतरलो, ह्यात राष्ट्रगीताचा अपमान नव्हता. तर स्वतः राष्ट्रगीताचा अपमान करून आपले एका अर्थाने पक्षीय गीत हेच राष्ट्रगीत म्हणून इतरांवर लादण्याच्या प्रयत्नाचा तो निषेध होता."

वाहवा ! तुळपुळेसाहेब, आपले हे राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रगीताच्या पावित्र्याबद्दलचा आग्रह पाहून माझ्या तर डोळ्यांतून आनंदाश्रू का काय म्हणतात तेच घळाघळा खाली ओघळले ! तरी मला वाटलेच होते यात नक्की काही तरी भानगड असणार आणि मागाहून ती कळल्यावर आपण खजील होणार. आता कसा डोक्यात लख्ख प्रकाश पडला. आम्ही आपले बावळटच. शेवटी 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत पूर्वी केव्हा तरी ठरले. आम्हांला वाटले की सगळे 'वंदे मातरम'च आपले राष्ट्रगीत आहे बरे का. पण तसे नाही बुवा. त्यांतल्या पहिल्या दोन कडव्यांनाच ती तेजःपुंज राष्ट्रीय झळाळी आहे. बाकीची कडवी आपली आहेत झाले ! तुळपुळ्यांच्या सराईत लाल दृष्टीला बरोबर ती दिसली. माझ्यासारख्या अडाण्यास ती कशी कळणार ?

ही सगळी माहिती कळल्यावर मी 'वंदे मातरम्' या पेशंटची पूर्वीची 'हिस्ट्री' काय आहे म्हणून चौकशी केली. बऱ्याच भानगडी कळल्या. हे गीत बंकिमचंद्रांच्या

एका कादंबरीत मुळात होते आणि ते मूळ वंगभूमीला उद्देशून लिहिलेले होते. पण स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीत क्रांतिकारकांनी, राजकीय नेत्यांनी ते भावनोत्कट स्वरात आळवले. त्यामुळे आपोआपच त्याला राष्ट्रगीताचा दर्जा प्राप्त झाला. पूर्वी हे गीत सबंधच म्हटले जात असे. काँग्रेसच्या अधिवेशनातसुद्धा. पण पूज्य बापूजींच्या कारकीर्दीत आपले मुसलमान बंधू स्वराज्याच्या खटपटीला आले. तशी त्यांची मातृभक्ती जबर. भारतमातेचे सुपुत्रच ते. पण पुढच्या कडव्यात एके ठिकाणी 'त्वं हि दुर्गादशप्रहर धारिणी' असे शब्द आहेत. दुसरीकडे 'तोमारहि प्रतिमा मंदिरे मंदिरे' अशी ओळ आहे. या खुदा, राष्ट्रगीत म्हणायचे अन् त्यात दुर्गादेवीचा उल्लेख ? मंदिरांचा आणि मूर्तीचा आदर ? तोबातोबाच! या तर शंभर टक्के हिंदू चीजा. आम्ही त्यांचा उच्चार कसा करायचा ? झाले ! तक्रार बापूजींच्याकडे गेली. बापूजींना अर्थातच ती पटली. त्यांनी उत्कृष्ट तोडगा सुचवला. पहिल्या दोन कडव्यात ही काही 'हिंदू' भानगड नाहीना ? मग पहिली दोनच कडवी यापुढे राष्ट्रगीताच्या वेळी म्हटली जावीत. तेव्हापासून दोन कडव्यांचे राष्ट्रगीत सुरू झाले.

आता कळले ना, वसंतरावांचे म्हणणे कसे शंभर टक्के बरोबर आहे ते ? लोक मोठे विसराळू असतात. एवढा मोठा इतिहास घडलेला. पण कित्येकांना तो ठाऊकही नाही. मग मूर्खासारख्या शंका काढीत बसायचे, "पूर्वी सगळी कडवी म्हणतच होते ना ? मग आताही म्हटली म्हणून बिघडले कोठे ? दुर्गा अन् मंदिर असले म्हणून काय झाले ? त्याने तुमच्या नाकाला मिरच्या झोंबण्याचे कारण काय ?... खरं ना ! इतके सगळे ठरले ना पूर्वी ? मग आता तेच पुन्हा उकरून काढीत बसायचे ? खासा न्याय ! वसंतरावांनी बरोबर आठवण करून दिली. पुढच्या कडव्यांना जातीय वास येतो. पहिली दोन कडवी जशी 'सेक्यूलर' आहेत तशी पुढची नाहीत हे नाकारण्यात काय अर्थ आहे बरे ?

वसंतरावांनी अगदी बेस्ट काम केले. राष्ट्रगीत चालू असताना ते उठून गेले हे बरोबरच झाले. मी तर म्हणतो, त्या वेळी निघून न जाता ते स्टेजवर थयथय करून नाचले असते तर उत्कृष्ट झाले असते. म्हणजे पुढची जातीय कडवी लोकांनाही ऐकू आली नसती आणि राष्ट्रगीताचा मान संपूर्णपणे राखला गेला असता. आता यापुढे तरी वसंतरावांनी ही चूक दुरुस्त करावी. कुठल्याही सभेत दोन कडवी म्हणेपर्यंत मान खाली घालून चुपचाप उभे राहणे. पण तिसऱ्या कडव्याला जर सुरुवात झालीच तर मात्र त्यांनी आपला शंख बाहेर काढावा. कोणतेही वाद्य किंवा मुखवाद्य वाजवावे. चारपाच कम्युनिस्टांनी मिळून 'शंखान् दध्मौ पृथक् पृथक्' केल्यावर ही पुढची दुष्ट 'हिंदू' कडवी लोकांना ऐकू जाण्याची काय टाप लागून गेली आहे !

— ग्यानबा

# भिकार सावकार

सौ. जयश्री खिरे


उतरायचं स्टेशन जवळ सरकू लागलं, तसतसा त्याचा विचार मनात अधिक उद्भवू लागला. तो स्टेशनवर उतरून घ्यायला येईल, त्याच्याशी कसं वागावं ... कसं बोलावं......साऱ्या प्रवासभर ती याच गोष्टीचा अधनं–मधनं विचार करीत होती...चार वर्षापूर्वीचा असाच प्रवास. पण तो मोहरलेला. आता......आताचा प्रवास. . .या प्रवासात ती अगदी गप्प गप्प. ती अबोल म्हणून पोचवायला आलेला तिचा भाऊही ... किती चमत्कारिक ! तिच्या जवळच्या ओझ्याच्या सावटाखाली भाऊ दबून गेलेला होता. एकटया सतीशला काहीच कल्पना नव्हती. एकटा सतीश तेवढा अधूनमधून बोलत होता. अजाणता. . .प्रवासात दिसणाऱ्या चिचांचं आईला खुशीत सांगत होता.

आणि सतीशची वडबड ऐकता ऐकता तिला अधिक कढ येत होते. मग ती होऊनच भावाशी कोरडं कोरडं बोलू लागली, त्याच वेळी एकीकडे ती स्वतःशी ठरवूही लागली. त्याच्यासमोर असं व्हायला नको. निदान स्वतःच्या घरात पाऊल पडेपर्यंत तरी...तोवर तरी हे सावरून धरायला हवं.

' डोळयांच्या बाहेरच्या कडांशी सारखं साचणारं पाणी खूप गोळा झालं की, भावादेखत इतर प्रवाशांसमोर टिपायला ती संकोचायची. ती खिडकीजवळ बसलेली. मग काही निमित्त करून चेहरा खिडकीबाहेर पळणाऱ्या दृश्याच्या बाजूला सामोरा करायची आणि डोळे पुसून घ्यायची.

ओळखीची झाडं, शेतं....मग मग इमारती दिसू लागल्या, तेव्हा ती आत वळून भावाला म्हणाली, " आलंच स्टेशन. "

गाडी थांबल्यावर तिनं पाहिलं प्लॅटफॉर्मवर कमी गर्दी होती. कमी गर्दीत तो



उभा होता. तिचा भाऊ अगोदरच डब्यान्च्या तोंडाशी जाऊन उभा. भावाला पाहताच तो डब्याकडे आला. खाली उतरताच दारात उभ्या असलेल्या सतीशला कडेवर उचलून घेत ती त्याला म्हणाली, "अगोदर एखादा हमाल पाहा पाहू. . ."

आणि लगेच त्याच्याकडे पाठ करून सामान खाली काढणाऱ्या भावाला ती काही सांगू लागली.

चार वर्षांच्या सतीशला कडेवर घेऊन उभं राहणं तिचं तिलाच खटकल्यासारखं झालं. हल्ली कितीतरी दिवसांत तिनं त्याला असं घेतलं नव्हतं. पण सतीशविना ती एकाकी, एकटीच आलेली होती. तिच्या कडेवर सतीशच उरला. . .उरला. . . तसं झालं नसतं तर त्याच्या जागी कुणी दुसरं. . .अगदी कोवळचा सुरकुतल्या शरीराचं रंगीबेरंगी दुपटचात गुंडाळलेलं. . .काजळल्या डोळचांचं.

सतीश तिच्या कडेवरच. स्टेशनमधून बाहेर पडतानाही गर्दीचं निमित्त करून तिनं त्याला कडेवरच ठेवलं. खाली उतरण्यासाठी सतीशची सारखी धडपड चालू होती. एकदोन वेळा, बाजूनं चालणाऱ्या त्याला सतीश म्हणालाही, "बाबा, ही आई बघा हो, कशी करते ?"

सतीशच्या बोलण्याकडे तिनं जाणूनबुजून दुर्लक्ष केलं. तिला एकदा वाटलं, "तो आता आपल्याला काही म्हणेल, नको मनाला लावून घेऊस एवढं." परंतु त्याला तसं म्हणण्याचा धीर झाला नसावा. तो काहीच म्हणाला नाही.

ती आपली नजर त्याच्याकडे जाऊच देत नव्हती. सारखी इकडे तिकडे करीत होती. सतीशचा फार मोठा आधार आपल्याला आहे. तिला वाटलं, हा आधार नसता तर आपण ठिसूळ झालो असतो. तुटण्याफुटण्याइतपत ठिसूळ.

सतीशभोवती तिच्या हातांची पकड घट्ट झाली.

त्याच्या डोळ्यांपुढं ती स्वतःला अपराधी समजत होती. ती त्याच्याकडे पाहत नव्हती.

मधूनच तिला वाटलं, त्याच्याशी एखाददुसरा शब्द बोलावा. बोलण्यासाठी तिनं अस्पष्ट शब्द उच्चारले ' जेवत होता ना नीट ?' पण त्याच वेळी तो कोवळा ओला चेहरा तिच्या डोळ्यांत जमलेल्या पाण्यात प्रतिबिंबू लागला. लाटालाटांनी ते प्रतिबिंब हेलावत गेलं. खोलगट, उंच, वर होत गेलं. विकृत होऊ लागलं. त्यात दुःखाची लहर लहरून होती. ते प्रतिबिंब सगळं साकळून घेत होतं आणि तिचा त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न विफल होत होता.

मग त्याच्याशी बोलायला नको म्हणून ती सतीशची बडबड ऐकत राहिली.

घरात पोचायला केवढा काळ लागला.

भावाला उलट पावली परत जायचं होतं. ती घाईनं काम आवरू लागली. सुचत काहीच नव्हतं तरी ती हे–ते काम करीत राहिली. अगदी काहीच न झाल्यासारखी तिची घाई-गर्दी चालू होती. सतीशला मात्र तिनं सारखं अवतीभवती ठेवलं.

बाहेरच्या खोलीत तिच्या भावाशी बोलणारा तो तिला अधूनमधून दिसत होता, ऐकू येत होता. ऐकू येणारे शब्द सारखे थांबून येत होते.

मध्येच तो घरात येऊन म्हणाला, "चहा ठेवतेस ना ?"

जाणाऱ्या भावाला जेवायचं नव्हतं. त्याला चहा ठेवण्याची गोष्ट ती अजिबात विसरून गेली होती. हातातली कामं टाकून तिनं चहा टाकला.

थोड्या वेळानं तो आत आला. न बोलता त्यानं चहाचे कप बाहेर नेले.

एकीकडे कुकर लावून ठेवून ती सतीशला आंघोळ घालू लागली.

"आई, मला येतोय् साबण लावायला, तू का घालतेस पाणी ? मी घेतो." सतीशची सारखी कुरकुर चालू होतीच.

सतीशला आपल्या हातानं आंघोळ घालण्याचं काम तिनं चालू ठेवलं.

तो आपल्यामागं येऊन उभा राहिला आहे हे तिला जाणवलं, पण तिनं मागं वळून पाहिलं नाही. ती तशीच ओणव्यानं सतीशच्या डोक्यावर तांब्यानं भडाभडा पाणी ओतत होती. पाण्याच्या धारांखालचा सतीशचा चेहरा रडवेला झाला होता.

"आटप रे, नको त्रास देऊ तिला." त्याचे शब्द तिच्या पाठीला ऐकू आले.

बाहेर परतल्याची त्याच्या पावलांची चाहूलही तिनं घेतली. तिला वाटलं, त्याच्यामागं धावावं. त्याच्या पाठीला गच्च मिठी घालावी. खूप फुलून फुलून रडावं. दुःखाच्या सगळ्या पाकळ्या विलग होऊ द्याव्या. खाली गळून पडू द्याव्या. पण ती तशीच राहिली.

तिनं सतीशला बाहेर घेतलं व ती त्याचं अंग टॉवेलनं पुसू लागली. ओठांच्या त्वचेप्रमाणे हळूवारपणे.

तिच्या भावाची निघायची वेळ झाली होती. भाऊ मधल्या दारात येऊन उभा राहिला. थोडा वेळ थांबून त्यानं म्हटलं, "जातो, ताई..."

त्याच वेळी तिनं भावाकडे पाहिलं. ती शब्द बोलली नाही. तिनं केवळ होकारार्थी मान हलवली. मान हलवण्यात दुःख अधिक गहिरं होऊन उठलं.

भाऊ बाहेर पडला. त्याला पोहोचवण्यासाठी तोही बाहेर गेला.

ते दोघे गेल्यावर काही क्षण ती रिकाम्या दरवाजावर पाहत होती.

नंतर सतीशला म्हणाली, "चल, खा जरा—"

सतीशची इच्छा नव्हती. प्रवासानं त्यानं पोट भरून घेतलं होतं. परंतु त्यानं खावं, अशी तिची इच्छा होती. तो हातानं खायचं म्हणत असतानाही तिनं त्याला भरवलं.

नंतरची कामं आवरली, तो अजून परत आलेला नव्हता. ती पलंगावर पडली. जेवतानाच सतीश डोळे मिटत होता, त्याला तिनं स्वतःजवळ झोपवलं. तिचा हात त्याच्या अंगावर. तिचा डोळा जरा लागला.

पण ती जागी झाली. तेव्हा तिनं पाहिलं, सतीश तिच्याजवळ नव्हता. पोटात खड्डा पडल्यासारखी ती कावरीबावरी होऊन सगळं भान विसरून उठली. पण तिला पुढं जावं लागलंच नाही.

सतीशच रडत रडत तिच्याजवळ आला.

"काय झालं रे?" तिनं कासावीस होऊन विचारलं.

"अग, शेजारची मुलं खेळायला घेत नाहीत."

पटकन् तिला जाणवलं असंच कुणी लगेच परकं झालं होतं.

"जाऊ दे. तू घरात खेळ आपला."

"कुणाशी?"

ती सताड डोळ्यांनी सतीशकडे पाहत राहिली. त्याच्या प्रश्नाचं खूप मोठं वर्तुळ तिच्या डोळ्यांत धावून येऊ लागलं. ती काही उत्तर देण्यापूर्वीच सतीश म्हणाला, "तू खेळ माझ्यावरोबर."

"काय खेळू?"

"पत्ते."

"आण."

सतीश कपाटात पत्ते शोधू लागला.

तिचा छोटा बाळ असता तर तिनं सतीशला वेगळं म्हटलं असतं, "आपल्या बाळाशी खेळ तू आपला."

तो गाल फुगवत म्हणाला असता, "त्याच्याशी काय खेळायचं? तो नुस्ता पडून राहतो. रडतो. रडका बाळ."

"असं बोलू नये राजा, तो रडला तर तू खेळव त्याला. खुळखुळा वाजवून दाखव." ती म्हणाली असती.

"आई, सापडले पत्ते."

"काय खेळायचं ?"

"भिकार–सावकार."

'भिकार–सावकार.' या शब्दाची आपल्याला कालपरवा ओळख झाली–दोनच शब्द...तिचे दोन्ही ओठ ते शब्द सारखे पुटपुटू लागले.

अगदी कालच घडल्यासारखं होतं की युगं आली घडायला ? आणि ते अजूनही ताजं चालत आलंय्. ओल्या कुशीचा हा गंध कालचा की युगापूर्वीचा ?

परवाच बाळ तिच्याजवळ झोपलेला.

सतीश हट्ट करीत होता, "आई, त्याला काय सारखं घेतेस ? ठेव त्याला खाली. मला तुझ्याजवळ झोपायचं."

"आई, हा चांदीचा खुळखुळा माझा आहे न ? त्याला देऊ नको."

"आई, याच्यासारखी मला तूच आंघोळ घाल."

सतीशला आवरता आवरता तिची अगदी पुरेवाट झाली.

"आई, हे पान तू मध्येच खेळलीस, बघ, माझा हात झाला." सतीशनं आनंदानं हाताचे पत्ते गोळा केले व आपल्या मांडीजवळ रचून ठेवले. पानं टाकणारा तिचा हात लोंबकळतच राहिला. पानं धरलेल्या डाव्या हाताच्या बोटांना पानांचं ओझं झालं. त्यांचे रंग चित्रविचित्र होऊन डोळ्यांतल्या बाहुल्यांवर ठिबकू लागले.

"तू पत्त्यांचा बंगला बांध आता, मी पडते जरा. दमले मी."

तिनं पानं खाली टाकली.

सतीश सारे पत्ते गोळा करून उठला. कोपऱ्यात पत्त्यांचा बंगला बांधत राहिला. ती त्याची प्रत्येक हालचाल टिपत पडून राहिली.

छोटा बाळ रांगत रांगत गेला व तो, तो बंगला पाडणार...

सतीश चिडला, रडू ओरडू लागला. बाळाला मारण्यासाठी त्यानं हात उगारला. तिनं पटकन् पुढं होऊन बाळाला उचललं, "अरे, लहान ना तो ? तो का तुझ्या-एव ा मारायला !"

एकटेपणानंच बंगला बांधत असलेल्या सतीशला तिनं उचलून घेतलं. त्याला जवळ घेऊन ती पलंगावर पडली. या वेळी त्यानं काही कुरकुर केली नाही.

क.पऱ्यात सतीश बांधत असलेला बंगला पहिल्याच मजल्यावर अर्धवट थांबला होता...अर्धवट पडला होता.

●


आतां पुन्हा मिळूं लागलें!
सांडू ओरिजिनल ब्राह्मी तेल
आयुर्वेदीय औषधी तेलांमध्यें सांडू ओरीजिनल ब्राह्मी तेल हें गुणानें आणि कालानुक्रमानेंहि पहिलें आहे. नेहमी त्याचीच मागणी करा.
या तेलाचा नित्य वापर केल्यानें डोळ्यांची आग, झोंप न येणें, बौध्दिक श्रमानें येणारा थकवा, डोकें दुखणें या तक्रारी दूर होतात.
शिवाय : केसांची निरोगी वाढ होते.
• ते लांब व काळेभोर होतात.
• ते अकाली पांढरे होत नाहीत.
• केस गळण्याचें थांबतें.
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर मुंबई-७१.
SANDU ORIGINAL BRAHMI OIL
STUSA DKS 2/66



# गारण

## विष्णू तु. गुंजाळ

वजवज वजवज त्याची मोट चालली हाये. डोळं तारवटलं हायेत. झोकांड्या जाताहेत. बैलं सरायला जरा जड हायेत. कानाला आढा दिला तरी हात काचून जाताहेत. तरी तो तसाच मोट पिटाळतो हाये. जिवावर आल्यागत तो मोट हाकतो हाये. कारन बटाटं ताणलं हायेत. त्यात बारीची इहीर. रातचं जागरान !

एका मोटचं पाणी ते काय चालणार ? त्यात पाण्यावाल्या, घुण्यावाल्या, दोन्दा सौंदर तुटला. चार घालून चालू केला तर कनाच इहीर पडला. लागतं जुगतं व्हईतवर तिसरा प्रकार झाला. बैलं तरतळ्या देऊ लागली. . . . वावरात पानी गेलं नायत् आट गेली. मंग वैतागला तो. त्यानं मोट आसडली, बैलांना पानी दावलं. वैरण अडी केली. टुकडा खाल्ला व जरा आंग टाकलं. . . .

मंग दिवस कल्ला तव्हा घाईघाई घाईघाई त्याने बैल सोडले नि जाडी गळ्यात घातली. चिरा दीड चिरा व्हतो नायतो परत आट गेली. मंग कट्टाळला जीव. साला आज दिवसच खराब. सकाळच्या प्रहरी कुणाचं तोंड पाह्यलं ? तो आठवू लागला. . . .

" दादा धुनं धुऊ ?"

" आता कोन्ल्हा नको म्हणू ?"

" नाय इटाळाचं हाय म्हणू इचारलं. "

" माझं काय इलायती गवात नाय !"

" बटाट्याला चालतं ?"

" काय मरातय !"

बाईनं मंग लुगड्याचं बोळं आहाळात भिजावलं. खसखसा ती धुनं धुऊ लागली.

" लई आळसावलात ?"

" आ ?" तो जागा झाला.

" नाय वजवज मोट चालली हाये म्हून इचारलं."

" रातचं जागरान !"

" बाई तर आजारी हाये म्हणत्यात ?"



" जागरान म्हंजी तमाशाला गेल्तो. "

" आसं आसं. मला येगळं वाटलं.' ती खळखळून हासली. नादात मंग येळ कसा गेला तो कळ्ळाच नाय. तिचं धुनं झालं. बाईनं धुन्याचं पिळं घमेल्यात घातलं नि चांगलासा दगड पाहून ती पाय घासू लागली.

" बाईला काही औषाधपानी नाय का पाहिलं ?"

" अं ?"

" नाय बाईला औषाधपानी ....."

" हाये ना. चालूच हाये. "

" नाय देवलसी म्हणते मी. "

" देवलसी व्हय ! मसतर झालं. आता कटाळलो. "

" काही उतार नाय मंग ?"

" त्यात काय उतार असनार? झिजून झिजून मरायचं एक दिवस. . . ."

चिनभिन अंधार पडला तव्हा त्यानं मोट सोडली. सामानं गुंडाळली. बैलांना कासरा लावला नि त्यांना तो मांडवात घेऊन आला. उगी लोकाच्या मालात जनावर जायचं. तुडवातुडव व्हायची. त्यान बोंबलायचं त्यापक्षी सोताला आदव पडलेली बरी. . . . बैलांना वैरणकाडी करून मंग तो वर घराकडं येतो.

घरात पाय दारात पाय. बायको मारक्या म्हशीगत पाहते. त्याला वाटतं कार्टी पोर्टी तरास देत असतील. वैतागली आसेल. पन घरात बघतो तर पोरांचा पत्ता नाय. दिवाबत्ती झाली.

" प्वारं नाय आली ग ?"

एक नाय. दोन नाय. बायको ताठलेली ती ताठलेली. हिला फुगायला झालं तरी काय? पाट्यावर हिरव्या मिरच्या कचकचा ठेचीत व्हती. बोलतं करावं म्हून इचारलं.

"कुठून आणल्या मिरच्या ?"

"चोरी करून."

"सरळ इचारलं."

"मंग मी काय वाकडं बोलले ?" त्याने तात्काळ वळाखलं. आज रंग बदलला हाये. नरमाईनं घ्यावं.

"तू अशी फिरू नकोस. सरळ सांग."

"वाकडीच हाये मी. म्हूनतर निभावले इथं. . . ."

च्याआयला ईला झालं तरी काय? माणूस दमूनभागून आल्यालं. सरळ इचारल तर वाकड्यात शिरते. आन् पुना मलाच इचारते ?

त्याच्या पोटात आगीचा डोंब उसळलेला आसतो, पण तो चकार शब्द काढीत नाही. मुकाट्यानं पोत्यातून दोन-चार बुचकुली शेंगा खिशात भरतो अन् बाहेर पडतो.

"अजून दारं पुंजायची झाली नाय वाटतं ?"

"कुठं मरायला चाललो नाय मी."

"कसं जालं?"

"म्हंजी ?"

"बायकांशी बोलल्याबिगार तुमाला व्हतच नाय का हो ?"

चटका बसावा तसा तो मागं सरतो.

"कुणाशी बोललो मी ?"

"डोळं फुटल्यालं नाहीत अजून माझं."

"हं हं ते व्हय. मंग काय झालं ?"

"मोठं समाधान झालं आसल ?"

"तुला बरं वाटलेलं दिसत नाय."

"एखादी आनातरी घरात. . . ."

"तेव्हडं तर जमत नाय. म्हूनतर. . . ." पाय पाय, पाय पाय मंग तो घरातून निसटतो. कुत्रं मागं लागल्यागत पाय उचलून चालू लागतो.

त्याचं काळीज तटतटा तुटत आसतं. पन ते झटक्यात तुटतही नाही. उगीचच वढ लागते काळजाला. टिप् टिप्, टिप् टिप् रघात गळू लागल्यागत वाटतं. जीव मंग गळून जातो त्याचा. काळजाचे लचके तोडावेत आसं वाटतं. . . . काय बायकू हाये ! इतका सौंशय ? आसन. मी म्हणतो सोमावाला धरून आसन. पन पाटी-पोटी दोन लेकरं हायेत. निम्मंशिम्मं वय झालं हाय आपलं काही जिमंला हाड ? काही बोलायचं ?

सालं आपलं नशीबच भंगड. बापाला काम नव्हतं. त्यानं लवकर लगीन करून दिलं. बरं दिलं ते दिलं या बायेशी ! लग्नाच्या वेळी ही लहान. चार वर्षं तोंड पाहू दिलं नाही थेरड्यानं. म्हणलं आसनाका बुटबैंगान. खाऊन पिऊन सुदरल. आंगी भरल. पन त्याचं नाव नाय !

दोन प्वारं झाली तेच नशीब !

आन् आता तर इचारायलाच नको. घुबडानं झेललेला दगड उगाळीत बसावा तशी झिजते हाये. आज काय हेच झालं. उद्या काय तेच झालं. सालं मरतयही नाय एकापरीनं. खोकून खोकून पार बरगड्या ढिल्या झाल्या हायेत. खय रोगानं काय माणसं मरत नाहीत ? पन आपलं नशीबच दलिंदर ! काय करायचं ! टुकडा थापून घालते त्यातच आभार मानायला पाहिजेत. बाई काय ?

नशिबातच नाय तर आनायचं कुठून ? चांगली धडधाकट आसती तर सहा बैलांचा वाडदाना आसता आज. प्वारासोरांनी घर भरलं आसतं. कुनाचं 'आरं' म्हणून घ्यातलं नसतं. पन आता उभारीच येत नाय मनाला. उल्हास नाय. पोरं मोठी व्हनार. मंग आपून पाहानार, या लांबच्या गोष्टी...हाये तवर करायचं. नाय त्या दिशी काही नाय, काय करायचं ! कर्म आपलं आसं ! !

मरमर तोंडात माती जाईसूतवर उपसावं, घरी आलं की ही आशी आदळआपट. खऊट बोलनं, इखारी पाहानं. सौंशय. वैतागून गेला हाये जीव. नको वाटतं जिणं ! पन जीव राहात नाही. दोन रोपीटोपी हायेत. त्यांच्याकडं कोन पाहाणार ? मंग पोटात नाय तुटलं तर काय व्हईल ? बाकी हाये काय ? बे एके बे चालूच हाये. केली तर शेती नायतर मातीच ती. त्यात हे काळादुकळाचे दिवस. मोलमजुरीनं का कामं व्हत्यात ? उगी आपलं तुटकं पळ जोडीत बसायचं. चार घालायचा...

कधी कधी जीव तरसून जातो. वाटतं, हमसूनधुमसून रडावं. ऊर बडवून घ्यावं. पन डोळ्याला टिप्पूसभर पानी येत नाय. जिवाची उलघाल व्हते. काळजाला वढ बसते. सांगायचं कुनाला ?

ज्याला त्याला आपला भार नकोसा झालेला. आई...बहिन, आसती तर गोष्ट येगळी ! घटकाभर कुठं टेकलो तर हे आसं ! सालं हिला कळतं कसं ? कळत नाय ? कुठंही जा, काहीही करा. ही तात्काळ वळखणार, दातखडं खाणार !

कधी कधी जीव ईर्षेला पेटतो. वाटतं सारी लाजलज्जा सोडून द्यावी. पुरुषासारखा पुरुष मी. एका बसनी दोन अडीच भाकरी हाणतो पन गांडूळ झालो हाये. आईच्यान् गांडूळ झालो हाये !

बापाची पंढरीची वारी कधी चुकली नाय. आई विच्चारी कशी असू तोंडावरचा पदर कधी तिच्या ढळला नाय. आम्ही त्यांचेच पुत ! बापाला मोठा अभिमान वाटायचा. (चार वर्षं कळ काढली ना !) म्हनायचा, 'जैशा, शुद्ध ज्याचं बिज त्याची मुलं कुलशीलवान वरं !' कसचं कमीचं शुद्ध बिज ! तापल्या तव्यावर उभा

राहिल्यावर कळतं.

इथं मरायचं येळ आली हाये, बघतो कोन कुळ आन् शिळ. कुळाला बट्टा लागूने ढीग वाटतं. पन जिवाची उलघाल व्हते तव्हा डोळं उघडत्यात, तरणाताठा मानूस हाये मी. काय मनात येनार नाय ? किती कळ काढील ?

ढीग वाटतं करीत नाय का लोक दुसरं लगीन ? मंग आपल्यालाच काय धाड भरली हाये. आपली तर बायकू बी खयरोगी पन घड तेही मला करता येत नाय. सालं जन्मात कधी पाहिलं ना चाखलं. या वयात पुन्हा जुळवाजुळव करायची. सौंसार थाटायचा. दोन बायकांचा ' दादला ' व्हायचं. लोकांनी हसायचं...त्यापक्षी... म्हणून बापाचा राग येतो. त्यानंच वळाण पाडलं आसतं तर गोष्ट येगळी व्हती ! आन् त्याच कारनानी या बायकूला बी सांभाळून घ्यावं लागतं. हसून जिरवावं लागतं. तिच्या कलानं नाय घेतो तर उद्या टुकडयाचे हाल.

हारघडी तू–मी करीत बसण्यात काय अर्थ हाये ? काय जीव तरी काय हाये तिच्यात ? जोरात एक ठिवून दिली तर पानी मागणार नाय. पण आपून म्हणतो जाऊ द्या. जाऊ द्या. काय करायचं. म्हणून मुनूमुनू...

पन मी म्हणतो, या सौंशयाला काही अंत ? कुनाही वाईची बोललो की पोटात शनवार–ऐतवार. का वैताग येणार नाही मंग ? हिच्यासाठी मी खस्ता खातो. जीव जाळतो. हसून जिरवतो. तळहाताच्या फोडासारखा हिला जपतो. हिला ' हे ' कळू नये ? रोज तीच कहानी. रोज तीच कहानी. फटकन् एखाद दिवशी बोललो तर काय करील ? आन् केलं तर करून करून काय करणार हाये ? पण मी म्हणतो जाऊ द्या. जाऊ द्या. च्याआयला...

जेवणावळ होऊन गेली हाये तरी त्याला घरी जावं आसं वाटत नाही. जिवाला खात तो अंधारातच मुक्ताबाईच्या पायरीवर बसला हाये. पोटात आग पडली हाये पन त्याला भान नाही. देवळाच्या शेजारच्या खोलीत कुनी गोसाई उतरले हायेत. धुनी पेटली हाये. गप्पा मारे रंगात आल्या हायेत. त्याने सहज आत डोकावलं पन पावलं त्याची वाजलीच.

" कौन है ?"

" मी. "

तो पुढं होऊन दारात उभा राहिला. चिलीम गोल फिरत व्हती. दोघेचौघे गांजा ओढीत बसले व्हते. हे बंबच्या बंब लाल इंगळागत डोळं.

" बैठो बेटा. "

तो भीत भीत आत घुसला. जमिनीवर टेकला.

" कहाँ रहते हो ?"

" तिकडं मळ्यात. " त्याने अंधारात हातानं दाखविलं.

" चिलम पिवोगे ?"

त्याच्या उगीचच मनात आलं प्यावी चिलीम. काय हरकत हाये. बघावं तरी एकदा. पण पटकन् त्याच्या तोंडून शब्द गेले.

"नाय नाय."

"अरे टेस्ट तो देखो. बाबाजीका प्रसाद ठुकराना अच्छा नहीं."

"नको. खरंच नको मला. सवय नाय."

"अच्छा बैठो."

खिनभर तो तिथं टेकला नि लगेच परत फिरला. पोरं वाट पाहून झोपली आसतील...उगीचच त्याच्या पोटात तुटू लागलं. पाय उचलून मंग तो चालू लागला.

न बोलता त्याने मंग टुकडा गिळला. हात धुतला. पोरं झोपली व्हती.

"मी जरा भजनाला जातो."

"आता बास झालं देवधरम. मांडवात पळा. कळतंय देवाला."

"तू आसं खऊट बोलू नको."

"मी खऊटच हाये. तुमी तेवढं चांगलं...कुळशीळवान."

"मघापासून पाहातोय. तुझ्या मनात तरी काय हाये?"

"तेच. एखादी बाई घरात आणावी." तिने सरळ त्याच्या काळजालाच हात घातला. मंग पिसाळला तो. डोळं लाल झालं त्याचं.

"बाई आन् म्हणतेस?"

"त्यात काय बाकी हाये."

"मला काय तू हांडगा समजतेस, मला ते जमणार नाही?"

"जमल ना. न जमाया का झालं? दहा वर्षं जमत हाये, ते आजच..."

"आसं. म्हंजी दहा वर्षापासून मी रांडा ठेवल्या हायेत. आसंच ना?"

"त्या काय बाकी हाये?"

"आन् तरी तू कळ काढलीस?"

"मनाची नाय पन जनाची हाये मला."

"आन् मी सोडली हाये. मंग ऐक. दहा वर्षं जे करीत आलो ना, तेच आज तुला सांगून करायला जातो. रांडेकडं......"

आन् मंग तो येड्यासारखा टांगा टाकीत परत गावात आला. त्याला आज शुद्ध नव्हती. चारदोन येळा तो ठेचाळला. त्याने मुक्ताबाईच्या देवळात डोकावलं. खच्चून गांजा वढायची त्याची इच्छा व्हती. पन आत बाबाही नव्हते आन् धुनीही. त्याला मंग उगीचच चुटपुट लागून राहिली. सालं मघाशी चांगला वढ म्हणाले गांजा. वढला नाही. आता इच्छा असून मिळाला नाही.

चिनमिन रात झाली हाये. सगळा गाव सामसूम झाला हाये. कुंभारवाड्यात गाढवं नि रस्त्यावर फक्त कुत्री. आज तो दुखावला आहे. पाय पाय, पाय पाय मंग तो भैरोबाच्या देवळात येतो. भजन रंगात आले आहे. खिनभर तो तिथं टेकतो.

जीव ताळ्यावर नाही तरी तसाच मंडळीत घुसून बसतो. त्याला 'हे' सारं विसरायचं आहे. भजन तालात आलं आहे. पन त्याच्यापुढं येगळंच.

चित्र उभं आहे. दुखावलेल्या जिवाचा तोल जाऊ पाहात आहे. तो सावरायचा आटोकाट प्रयत्न करतो आहे. पन त्याचं भजनातही लक्ष नाही. मंडळींनी अभंग पुरा केला नि ती चहाला उठली. एकानं त्याला डिवचलं.

"काय रे जैशा ?"

"काय ?"

"आज भजनाला आलास ?"

"येऊ नये ?"

"नाय. काल तमाशाला गेल्ता म्हून इचारलं."

"मंग त्यात काय झालं ?"

"इथून मागं भजनाला कधी आला नाहीस ?"

"नाय आलो."

"मंग आजच ?"

"मर्जी माझी."

"का ? गेल्ता कुठं शेन खायला ?"

"जरा तोंड सांभाळून बोल."

त्याने डोळे तांबारले. डिवचणारा गार झाला.

भजन मोडलं तव्हा चाणी माथ्यावर आली होती. गावाच्या बाहेरून तो घराकडे निघाला. दाण्याआळीला कोल्हारणीचं घर आहे. मध्यरात्र उलटून गेली तरी दिवा ढणढणा जळतो आहे. दार सताड उघडे पडले आहे. आत झोपाळा कुरकुरतो आहे. तो पाहतो. दरदरून त्याला घाम फुटतो. झपाटल्यागत मंग तो जे धुमचकाट पळत सुटतो ते थेट मांडव.

शेजारचा बाबू तात्याचा मांडव. कुणीतरी वैरण टाकायला उठतो. घावरत घावरत इचारतो,

"कोन आहे रे ?"

"मी. तात्या."

"जैशा ?"

"व्हय तात्या."

"एवढा घाबरलास का ?"

"पळत आलो तात्या."

"कुठं गेल्ता ?"

"भजनाला."

"देवाच्यान्."

" आईच्यान्. "

कुत्री भुंकतात. घाटचा घणघणतात. पुन्हा सामसूम व्हते.

घुशीनं बिळात घुसावं तसा तो गोधडीत घुसतो. गच्च जीव दडपून धरतो. पण धडधड काही थांबत नाही. झोप काही येत नाही. सारख्या कुशी बदलीत तो उलथा पालथा होतो. माशासारखा तरमळतो. पहाटं पहाटं त्याला डोळा लागतो.

चांगली ऊनं अंगावर येतात तरी तो लोळत पडलेला असतो. बायकू शेण काढायला येते.

" कोन झोपलं हाये, राधे ?" बाबू तात्याचा आवाज.

" दुसरं कोन असणार तात्या ?" बायको.

" इतका उशीर ?" तात्या.

" रातभर शाण खायचं......"

" आन् गडीच तो......"

इच्चू चावावा तसा तो जागा व्हतो. उभा राहतो. पण त्याला चक्कर येऊ लागते. तोल जातो. मंग तो पुन्हा मटकन् अंथरुणावर टेकतो. डोळं झाकून घेतो. त्याला वाटतं सालं राती भजनाला गेलो ही चूकच झाली......

●


# शस्त्रक्रियेची जरुरी नाही

**नाकातील हाड, मांस, वाढल्यास**


**श्वासोच्छ्वासास अडचण, सर्दी, दुर्गंधी, खपली,**

**डोकेदुखी, दम्यासारखा खोकला असल्यास**

पोस्टेजसह लिहा

**आरोग्य मंदिर**

सिटी हायस्कूल रोड, सांगली (महाराष्ट्र)



१ ऑक्टोबर १९६५ ची प्रहाट. अद्याप जकार्तामध्ये उजाडायची होती. सारे शहर अजून साखरझोपेतच होते. खरे म्हणजे अजून बराच वेळ नेहमीच्या सवयीप्रमाणे ते आळसावत पडले असते. पण आजची पहाट जरा वेगळी होती. जकार्तामधले पोलीस त्यावेळेस पेंगत नसते तर पहाटेच्या त्या अंधुक धुक्यात अनेक तरुण दबत छपत काही रहस्यमय हालचाली करीत आहेत, असे त्यांना दिसून आले असते.

जकार्तामधील प्रमुख रस्त्याच्या चौकामध्ये, रेलरुळांच्या आसपास, रेडिओ स्टेशन, पोस्ट आणि तार ऑफिसे यांच्या सभोवताली हे तरुण हळूहळू छोटया छोटया गटांनी जमत होते. आणि झाडाझुडुपांचा, अंधाऱ्या गल्लीबोळांचा आश्रय घेऊन दबत होते. आता खरोखरच पहाट फुटायला आली होती. शहराची साखरझोप अद्याप उडाली नव्हती.

पण इतक्यात कडाड् काड्काड् असा बंदुकीच्या फैरींचा एकच आवाज होऊ लागला. आणि सारे जकार्ता खडबडून जागे झाले. इंडोनेशियाच्या राजकारणाला कलाटणी देणारी, इंडोनेशियन कम्युनिस्ट पक्षाची पाळेमुळे खणून काढण्यास व सतत वीस वर्षे इंडोनेशियन जनतेला मंत्रमुग्ध करून आपल्या तालावर नाचविणाऱ्या अध्यक्ष डॉ. सुकार्नोंच्या ऱ्हासास कारणीभूत ठरणारी अयशस्वी क्रांती त्या पहाटे सुरू झाली होती.

इंडोनेशियाबाहेरच्या जगाला या क्रांतीची बातमी कळली ती एकदम दुपारी

'अजूनही मीच अध्यक्ष आहे
मीच सर्वसत्ताधीश आहे
हा ऽऽ हा .... हा ऽऽ'

# इंडोनेशियाचा मावळता मांत्रिक

# सुकार्नो

१२ वाजता. जकार्ता रेडिओवर अध्यक्ष सुकार्नोंच्या शरीररक्षक पथकाचा नेता लेफ्ट. कॅर्नल उंटूंग याने जाहीर केले की, लष्करी सेनापतींच्या एका गटाचा क्रांतीचा कट हाणून पाडण्यासाठी मी स्वतः सत्ता हाती घेतली आहे. त्याच वेळी त्याने सत्ता चालविण्यासाठी ४५ जणांची एक क्रांतिकारक समितीही स्थापन केल्याचे जाहीर केले.

त्यानंतर जकार्ता रेडिओ जो बंद पडला, तो तब्बल पाच तासांनंतर जागा झाला. दळणवळणाची इतर सर्व साधने तुटली होती. रेडिओवरचा या वेळचा आवाज दुसराच होता. राष्ट्रनिष्ठ लष्कराने सत्ता पूर्ववत काबीज केली असून क्रांतिकारक समिती नष्ट करण्यात आली आहे. इंडोनेशियन क्रांतीचा घात करणारा सकाळचा कट हाणून पाडण्यात आला असून अध्यक्ष सुकार्नो व जनरल नासुशन सुखरूप आहेत व लष्कर तात्पुरते जनरल सुहार्तोंच्या आज्ञेखाली देण्यात आले आहे अशी घोषणा करण्यात आली.

त्यानंतर एकामागून एक अशा ज्या भराभर घटना इंडोनेशियात घडत गेल्या त्यांच्या नुसत्या वर्णनानेसुद्धा अंगावर काटा उभा राहतो. त्यापुढील दोन महिने इंडोनेशियन जनतेला एखाद्या भयानक स्वप्नाप्रमाणे वाटत असले पाहिजेत. कर्नल

लेखक
*अरुण साधू*

उंटूंगने सुरुवातीलाच यशस्वी क्रांतीची घोषणा रेडिओवर करताच कम्युनिस्टांनी सर्वदूर आपल्या कारवायांना सुरुवात केली. ठिकठिकाणच्या ग्रामीण अधिकाऱ्यांवर आणि पुढाऱ्यांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. लवकरच लष्करानेही पवित्रा घेतला आणि गल्लीबोळांतून, झोपडयांतून, जंगलांतून कम्युनिस्टांना हुडकून काढून गोळया घालण्यास सुरुवात झाली. नद्यांचे पाणी रक्ताने लाल झाले. कोल्ह्या-गिधाडांना अपूर्व पर्वणी प्राप्त झाली. अवघ्या दोन महिन्यांच्या अवधीत अडीच लाख कम्युनिस्टांना ठार करण्यात आले.

या सर्व गोंधळात डॉ. सुकार्नोला मात्र गप्प बसून राहावे लागले. वीस वर्षांच्या वर ज्याने इंडोनेशियावर अमर्याद सत्ता गाजविली, आपल्या जादुमय भाषणांनी म्हणेल ती पूर्वदिशा ठरविण्यास इंडोनेशियास भाग पाडले. डाव्या बाजूला कम्युनिस्ट व उजव्या बाजूला लष्कर अशा तारेवरच्या कसरतीत आपली सत्ता ज्याने टिकविली, त्या सुकार्नोला मात्र लष्कर आणि कम्युनिस्टांची जुंपताच काहीच करता आले नाही. तो जिवंत राहिला हेच त्याचे भाग्य. बरेच दिवस तो जिवंत आहे की नाही, याची जगाला शाश्वती नव्हती. आजही इंडोनेशियाचा अध्यक्ष म्हणून औपचारिकपणे तोच वावरत असला तरी सर्व सत्ता मात्र जनरल सुहार्तोच्या हाती आहे. या साऱ्या क्रांतिकालात मात्र त्याच्या केसालाही धक्का लागला नाही, एवढेच नव्हे तर सुकार्नो सुखरूप आहे, असे पुन्हा आवर्जून सांगण्याची दक्षता घेतली जात होती.

## एकराष्ट्रीयत्वाची निर्मिती

याला कारणही तसेच आहे. हिंदी महासागरातून पॅसिफिक महासागरापर्यंत विखुरलेल्या उण्यापुऱ्या तीन हजार बेटांच्या या द्वीपसमूहातील शेकडो जाति-जमातींमध्ये व भाषांमध्ये एकराष्ट्रीयत्वाची भावना रुजविण्याचा थोडाफार यशस्वी प्रयत्न करून अमाप लोकप्रियता संपादणारा डॉ. सुकार्नो ह्याच एकमेव इंडोनेशियन नेता आहे.

या प्रचंड द्वीपसमूहामध्ये एकराष्ट्रीयत्वाची भावना रुजविणे खरोखरच मोठे कठीण होते. जगाच्या नकाशात सर्वांत मोठया असणाऱ्या या द्वीपसमूहाच्या लोकांमध्ये एकीची भावना कधीच नव्हती. इंडोनेशिया एक देश आणि इंडोनेशिया एक भाषा ही भावना रुजविण्याचे प्रयत्न जाणूनबुजून सुरू झाले ते १९२० पासून. तोपर्यंत ऐतिहासिक काळापासून असंख्य जमाती, भाषा व द्वीपांमधील समुद्राचे अंतर, यांमुळे हा प्रदेश हजारो शकलांमध्ये विभागला गेला होता. आर्थिक प्रगतीकडे दुर्लक्ष करून कृत्रिम घोषणांच्या बळावर देशाची एकी साधण्याचा डॉ. सुकार्नोला प्रयत्न करावा लागला तो देशाच्या या विचित्र भूगोलामुळे. इंडोनेशियन क्रांतीची आणि राज-कारणाचीही बीजे देशाच्या इतिहासात आणि या विचित्र भूगोलात सापडतील.

या साडेतीन हजार मैल लांबवर पसरलेल्या बेटांमध्ये जावा आणि सुमात्रा हीच दोन महत्त्वाची बेटे आहेत. मुख्य म्हणजे जावा हेच बेट इंडोनेशियन लोकवस्तीचे,




**काळा भाग–इंडोनेशिया**

उत्पन्नाचे, राजकारणाचे आणि समाजकारणाचे केंद्रस्थान आहे. द्वीपसमूहाच्या मध्यभागी असलेल्या व ज्वालामुखींच्या लाव्हारसापासून अतिशय सुपीक बनलेल्या या बेटाचे क्षेत्रफळ एकूण द्वीपसमूहाच्या सात टक्केही नाही; परंतु देशातील दोन तृतीयांश लोकसंख्या मात्र याच बेटावर आहे. इंडोनेशियाची लोकसंख्या सुमारे १० कोटी आहे तर जावाची ६·५ कोटी.

इंडोनेशियाची बेटे नैसर्गिकदृष्टया जगातील अत्यंत समृद्ध देशांमध्ये गणली जातात. जगाला लागणाऱ्या मसाल्याच्या पदार्थांपैकी ६० टक्क्यांच्या वर इंडोनेशिया पुरवितो. खनिज तेलाच्या बाबतीतही इंडोनेशिया समृद्ध आहे. तांदळाचेही उत्पादन उत्तम होत असले तरी वाढत्या लोकसंख्येच्या मानाने ते कमीच पडते.

या नैसर्गिक समृद्धीमुळेच शतकानुशतके परकीय लोकांचे लक्ष या द्वीपसमूहाकडे सतत आकर्षिले जात होते. इंडोनेशियाची (खरे म्हणजे जावाची) सध्या जी स्वतंत्र संस्कृती भासते ती हिंदू, मुस्लिम, चिनी संस्कृतींचे मिश्रण होय. ९० टक्क्यांच्या वरील इंडोनेशियन्स धर्माने मुस्लिम असले तरी हिंदुधर्माचा प्रचंड प्रभाव अद्यापही इंडोनेशियावर आहे. रामायण–महाभारताचे तर भारतातही होत नसेल, एवढ्या प्रचंड प्रमाणावर सामुदायिक नाटय–प्रदर्शन इंडोनेशियात होत असते. इंडोनेशिया-तील वेगवेगळ्या भाषांवरही संस्कृतचा प्रभाव अजून टिकून आहे. ख्रिस्त जन्माच्या

सुमाराला दक्षिण भारतातील हिंदू राजांनी जे दिग्विजय गाजविले, त्यांचाच हा परिणाम आहे.

## डचांचा अंमल

या नैसर्गिक समृद्धीमुळेच युरोपियनांचेही लक्ष १६ व्या शतकात या द्वीपसमूहाकडे लागले. एका हाती तागडी आणि दुसऱ्या हाती तरवार घेऊन पोर्तुगीज, डच आणि ब्रिटिशांनी येथे शिरकाव केला. हिंदुस्थानात जसे घडले तसेच येथेही झाले. व्यापाराच्या निमित्ताने युरोपियनांनी आपल्या वखारी स्थापल्या आणि हळूहळू पाय पसरण्यास सुरुवात केली. डचांनी आपले वर्चस्व स्थापून इतर युरोपियनांना हाकून लावले आणि शेतीचा सगळा धंदा जवळजवळ ताब्यात घेतला आणि तेथील भरघोस पिकांच्या जोरावर अमाप फायदा मिळविण्यास सुरुवात केली. १८५८ साली ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार संपवून इंग्लंडच्या राणीने हिंदुस्थानचा कारभार हाती घेतला तसाच १७९८ साली डच ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त करून डच सरकारने इंडोनेशियाचा कारभार आपल्या ताब्यात घेतला. डच ईस्ट इंडिया कंपनीच्या जुलुमाने आणि पिळवणुकीने जनता मेटाकुटीस आली होती आणि ठिकठिकाणी बंडाचे झेंडे उभारले गेले होते.

या बेटांना डच ईस्ट इंडीज बेटे म्हणत. या सर्व बेटांत शांतता प्रस्थापित करून ती आपल्या एकछत्री अंमलाखाली आणण्यास डचांना उणीपुरी शंभर वर्षे लागली. जागोजागी विखुरलेली सर्व मुस्लिम संस्थाने हळूहळू डचांच्या ताब्यात आली. डचांची सत्ता आली तरी इंडोनेशियन राष्ट्रीयत्वाचा वन्ही विझला नव्हता. अधूनमधून तो जावा बेटातील ज्वालामुखीप्रमाणे पेटत होताच.

पण इंडोनेशियन राष्ट्रीय चळवळीची संघटित सुरुवात झाली ती २० व्या शतकाच्या पहिल्या दशकात विद्यार्थ्यांच्या चळवळीमधून. १९०८ साली इंडोनेशियन विद्यार्थ्यांनी 'बोएदी ओतीमो' नामक पहिली वहिली राष्ट्रीय संघटना स्थापन केली. याच सुमाराला मुस्लिम धर्मावर उभारलेली एखादी संघटना स्थापन करण्याचे १९०९ व ११ साली असे दोन प्रयत्न झाले, पण ते दोन्हीही फसले. परंतु त्यानंतर मात्र एका व्यापाऱ्याने स्थापलेली मुस्लिम संघटना चांगलीच यशस्वी झाली. 'स्जादिकत वगांग इस्लाम' नामक या संघटनेत हजारोंच्या संख्येने सदस्य सामील झाले व लवकरच या संस्थेला 'एका सामाजिक चळवळी'चे स्वरूप प्राप्त झाले. याच संघटनेचे पुढे 'पार्टाय स्जादिकत इस्लाम इंडोनेशिया' असे नामकरण झाले व इंडोनेशियात हा एक बलिष्ठ पक्ष बनला. परंतु शांततामय मार्गाने स्वराज्य संपादन करावयाचे की चळवळीचा मार्ग पत्करायचा या प्रश्नावर या पक्षात मतभेद झाले आणि पक्षातून १९१८ साली डावा गट फुटून त्याने आपला वेगळाच 'पार्टाय कोम्यनिस' (कम्युनिस्ट) स्थापन केला. दरम्यान सोशल डेमॉक्रॅटिक लेबर, सोशोडेमॉक्रॅटिक पार्टी असे अनेक लहानसहान पक्ष स्थापन झाले. पण १९२७ साली

पार्टाय नॅशनल इंडोनेशिया (इंडोनेशियन राष्ट्रीय पक्ष) स्थापन होईपर्यंत या अर्धवट जातीय पक्षाला तुल्यबल प्रतिस्पर्धी असा नव्हता.

## क्रांतिकारकाचा उदय

ही नॅशनल-पार्टी स्थापन करणाऱ्या प्रमुखांमध्ये २६ वर्षांचा तरणाबांड विद्यार्थी सुकार्नो हाही होता. जावानीज बाप आणि बालिनीज आई अशा जोडप्यापासून १९०१ साली जन्मलेला हा तरुण खरे म्हणजे इंजिनियर होता. परंतु दरिद्री देशाची चिंता कुठल्याही देशभक्ताला स्वस्थ बसू देत नाही. शिवाय आपले रुबाबदार व्यक्तिमत्त्व, श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकणारे बेफाट वक्तृत्व आणि जनमानसावर सहज छाप बसविणारी अमृतवाणी यांमुळे सुकार्नो आधीच विद्यार्थिदशेत लोकप्रिय झाला होता. त्यामुळे त्याने इंजिनियरिंगचा व्यवसाय कधी केलाच नाही. विद्यार्थिदशेमधूनच त्याने राजकारणात उडी घेतली. चीनपासून भारताच्या दक्षिण टोकापर्यंत ज्या श्रीविजा व महाजपहिता या इंडोनेशियन राज्यांचे प्राचीन काळी साम्राज्य पसरले होते त्यांच्या कथा त्याने वाचल्या होत्या. कुणी सांगावे, कदाचित त्या कथांमधूनच त्याने 'इंडोनेशिया राज'ची स्वप्ने पाहिली असतील. त्याचबरोबर सुकार्नोने आधुनिक तत्त्वज्ञानाचे, मार्क्सवादाचे, हिंदू, बौद्ध व मुस्लिम धर्मावरील वाङ्मयाचेही वाचन केले. व्यापक वाचनामुळे त्याची सर्व धर्माविषयीची मते अतिशय समंजसपणाची होती, व त्यामुळे तो राजकारणात पडल्याबरोबर धर्माधर्मांचा भेद न ठेवता देशातील साऱ्या पुरोगामी व राष्ट्रीय शक्ती त्याच्यामागे खड्या झाल्या, आणि त्यांच्या बळावर त्याने डच सरकारशी एकामागून एक लढे दिले, असहकाराच्या चळवळी उभारल्या, तुरुंगवास भोगला, प्रसंगी सशस्त्र क्रांतीचाही अवलंब करण्याचा प्रयत्न केला. मद्य व मदिराक्षींची आवडही त्याने याच काळात वाढविली असावी. विशेषतः, त्याची मदिराक्षींची आवड तर जगप्रसिद्ध आहे. आणि अख्ख्या जनसमुदायाला आपल्या रसपूर्ण वक्तृत्वाने, रुबाबदार व्यक्तिमत्त्वाने भारून टाकणाऱ्या या रंगेल नेत्याची स्त्रियांनाही भुरळ न पडली तर नवलच.

१९४० साली हिटलरने नेदरलँडवर आक्रमण केले आणि डच सरकारला आपले मायदेशातील चंबूगबाळे आवरून इंग्लंडला पळ काढावा लागला. नेदरलँडमध्येच सरकार नाही तर इंडोनेशियावर तरी नेमकी सत्ता कुणाची अशी जरा चमत्कारिक परिस्थिती तेव्हा निर्माण झाली. सारी सत्ता तात्पुरती तरी डच गव्हर्नर जनरलच्या हाती आली. पण ही अवस्था फार काळ टिकली नाही. जपानने युद्धामध्ये उडी घेतली आणि अवघ्या महिनाभराच्या अवधीत साऱ्या इंडोनेशियन द्वीपसमूहावर जपानी फौजांनी कब्जा मिळविला.

## इंडोनेशिया स्वतंत्र होतो...

जपानी आक्रमणाच्या काळात इंडोनेशियन जनतेला जपान्यांशी जबरदस्त सहकार्य

करणे भाग पडले. पण ६ ऑगस्ट १९४५ ला पहिला अणुबाँब हिरोशिमावर पडला आणि १५ ऑगस्टला जपानने संपूर्ण शरणागती पत्करली. ही संधी साधून डॉ. सुकार्नोने घाईघाईने हालचाली करण्यास सुरुवात केली. युद्धकाळात तयार झालेली लोकांची सेना त्याने हाताशी धरली आणि त्या बळावर त्याने १७ ऑगस्ट १९४५ रोजी स्वतंत्र इंडोनेशियाचे गणराज्य स्थापन झाल्याची जाहीर घोषणा केली. १७ मंत्र्यांचे मंत्रिमंडळ जाहीर करून डॉ. सुकार्नो अध्यक्ष व डॉ. महंमद हाटा उपाध्यक्ष झाल्याचेही त्याने जाहीर केले.

जपानने शरणागती पत्करताच अमेरिकन सैन्याने इंडोनेशियाचा ताबा घ्यावा असे ठरले होते, परंतु जपानची शरणागती इतकी अकल्पित होती, की घाईघाईने ब्रिटिश सैन्याला त्या कामासाठी पाठवावे लागले. ब्रिटिशांनी वेळ ओळखून जपान्यांना हाकून लावण्यासाठी सुकार्नोच्या सरकारची मदत मागितली. परंतु डच सरकार मात्र सुकार्नोशी बोलणी करण्यास मुळीच तयार नव्हते. दरम्यान सुकार्नो सरकारने इंडोनेशियाची एक नवी घटना तयार करून तीनुसार सुतान स्जहीर नामक एका मवाळ पुढाऱ्याला इंडोनेशियाचा पंतप्रधान करून त्याच्या हाती सत्ता देण्यात आली. पण स्जहीरने डच सरकारशी बोलणी करताना डच फेडरेशनच्या योजनेत इंडोनेशिया समाविष्ट करण्याची तयारी दाखविताच जून १९४६ मध्ये कम्युनिस्टांनी नवे मंत्रिमंडळच उलथून पाडण्याचा घाट घातला. परंतु आपल्या अध्यक्षांच्या अधिकारात सुकार्नोने तो कट हाणून पाडला व सर्व सत्ता स्वतःच्या हाती केंद्रित केली.

डच सरकार मात्र अजूनही आपल्या हातून सत्ता सोडावयास तयार नव्हते. आणि काही बोलणी फिसकटताच डचांनी साऱ्या इंडोनेशियात पोलिसी ॲक्शन घेण्याचा प्रयत्न केला. पण त्यामुळे त्यांचा हेतू साध्य होण्याऐवजी जागतिक मत त्यांच्याविरुद्ध गेले व शेवटी १९४९ मध्ये त्यांना जागतिक मताच्या दडपणाखाली औपचारिकपणे इंडोनेशिया सोडून जावे लागलेच. परंतु जाताना आपला पश्चिम न्यू गिनीवरचा ताबा त्यांनी सोडला नाही.

## स्वातंत्र्यानंतर...

१९४९ ला संपूर्ण स्वातंत्र्य मिळेपर्यंत डॉ. सुकार्नो, डॉ. हाटा आणि त्यांचे मंत्रिमंडळ यांच्यांत चांगले सहकार्य होते. पण लवकरच मतभेदांना सुरुवात झाली. मंत्रिमंडळे गडगडू लागली. १९४९ ते ५८ च्या दरम्यान सात मंत्रिमंडळे गडगडली आणि संदिग्ध राज्यघटनेचा पुरेपूर फायदा घेऊन अध्यक्ष डॉ. सुकार्नोने हळूहळू आपल्या हाती सर्व सत्ता केंद्रित करण्यास सुरुवात केली. मंत्रिमंडळाला अथवा उपाध्यक्षाला आपल्या सल्ल्यात न घेता वाटतील त्या घोषणा आपल्या जाहीर सभांमध्ये देण्यास त्याने सुरुवात केली. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. डॉ. हाटाने आपल्या उपाध्यक्षपदाचा १९५६ साली राजीनामा देऊन टाकला.

१९५६ ते १९५८ पर्यंत इंडोनेशियाला एकामागून एक आणीबाणीच्या प्रसंगांना तोंड द्यावे लागले. सुमात्राच्या काही भागांत लष्करी क्रांत्यांचे प्रयत्न झाले. त्यामुळे तेथे लष्कराच्या हाताखाली विभागीय शासकीय समित्या स्थापन कराव्या लागल्या. तीच परिस्थिती पूर्व इंडोनेशिया व कालीमंतन भागांतही झाली. आपली सत्ता टिकविण्यासाठी बंडखोरांनी ठिकठिकाणचे कर वळवून त्यांचा आपल्या कामासाठी उपयोग करण्यास सुरुवात केली. ही बंडे दडपून टाकण्यासाठी सुकार्नोला लष्कराच्या हाती बरीच सत्ता द्यावी लागली.

दरम्यान इंडोनेशियन कम्युनिस्ट पक्ष चांगलाच प्रबळ झाला होता. त्याच्याच पाठिंब्यावर डॉ. सुकार्नोला डचांच्या पश्चिम न्यू गिनीच्या कारभाराविरुद्ध लोकांच्या भावना चेतविणे शक्य झाले. इंडोनेशियाच्या खऱ्या आर्थिक प्रश्नांकडे लक्ष जाऊ न देता ते भलतीकडेच वळवावे हाही त्यात एक हेतू होता. न्यू गिनीच्या प्रश्नावर इंडोनेशियन जनतेचे मत इतके तयार करण्यात आले की, न्यू गिनीच्या स्वातंत्र्या-साठी सशस्त्र लढ्याचीही तयारी जनतेने दाखविली. शेवटी जागतिक दडपणाला बळी पडून डचांनी १९६२ मध्ये करार करून १ मे १९६३ ला आपल्या पश्चिम न्यू वेस्ट गिनीवर पाणी सोडले.

न्यू गिनीचा प्रश्न संपतो न संपतो आहे तोच इंडोनेशियन जनतेचे लक्ष स्वतःच्या दारिद्र्याकडे व आर्थिक गोंधळाकडे जाऊ नये म्हणूनच की काय, मलेशियाचा जन्म झाला आणि सुकार्नोने " ब्रिटिशांचा साम्राज्यवादी मलेशिया " खतम करण्याची प्रतिज्ञा करून जनतेचे लक्ष तिकडे वळविले.

## लष्कर व कम्युनिस्ट पक्ष : दोन संघटित शक्ती

तेव्हा १९५८ पासून एका बाजूला अत्यंत शिस्तबद्ध असलेली व मोठ्या प्रमाणा-वर संघटित व लोकप्रिय असलेला कम्युनिस्ट पक्ष व दुसऱ्या बाजूला आधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असलेली सेना यांच्या पाठिंब्यावर डॉ. सुकार्नोने आपल्या योजना कार्यवाहीत आणण्यास सुरुवात केली. लष्कर ही एकुलती एक संघटना आपली शासकीय सत्ता टिकवून ठेवण्यास उपयोगी आहे हे सुकार्नोने ओळखले होते. ब्रिटिशांनी भारतात जशी एक कुशल आणि जबरदस्त सिव्हिल सर्व्हिस तयार करून ठेवली होती, तसेच इंडोनेशियात कांही नव्हते. त्यामुळे सुकार्नोला लष्करावर जादा विसंबून राहावे लागले. जावामध्ये लष्कराची संख्या आणि लोकप्रियताही कमी असली तरी बाहेरच्या साऱ्या बेटांमध्ये शासकीय कारभार लष्कराच्याच हाती होता. दळणवळणाची सर्व महत्त्वाची साधने, शासनातील महत्त्वाच्या जागा साऱ्या लष्कराच्या हाती होत्या आणि आहेत. एवढेच नव्हे तर, व्यापार, उद्योग, शेती या संघटनांमध्येही लष्कराचे प्रतिनिधी होते. आणि आजही आहेत. साऱ्या फुटीर प्रवृत्तींची तोंडे लष्करानेच बंद केली. आणि मुख्य म्हणजे कम्युनिस्ट चळवळ जावा-

बाहेर कुठे जादा फोफावणार नाही याचीही दक्षता लष्करानेच मोठ्या कटाक्षाने घेतली.

पण अपार लोकप्रिय असलेली कम्युनिस्ट पार्टी आपली उद्दिष्टे पुढे न्यावयास आपल्याला साथ देत आहे, हेही सुकार्नो ओळखून होता. इंडोनेशियन कम्युनिझमही जरा वेगळाच आहे. हिंदू, जावानीज, इस्लाम, बौद्ध यांच्या संमिश्र तत्त्वांचा मार्क्स-वादाशी काला करून इंडोनेशियातील अर्धशिक्षित जनतेला आपल्यामागे लावण्याचे सामर्थ्य इंडोनेशियन कम्युनिस्टांत आहे. आणि त्यांचा सुकार्नोला संपूर्ण पाठिंबा होता. सुकार्नोनेही आपल्या मंत्रिमंडळात कम्युनिस्ट नेता ऐदित याला स्थान दिले होते. कम्युनिस्टधार्जिणा डॉ. सुबांद्रियो हा तर सुकार्नोचा परराष्ट्र मंत्री होता. हा तोल सांभाळण्यासाठी लष्करातल्या थोड्या कम्युनिस्टविरोधी गटांतल्या जनरल नासुशनला त्याने आपला संरक्षण मंत्री केले होते.

तसे पाहता कम्युनिस्ट पक्ष व लष्कर हे परस्परांचे प्रतिस्पर्धी होते म्हणण्यापेक्षा शेवटपर्यंत ते एकमेकांचे पूरक होते, असेच म्हणावे लागेल. जावामधील कम्युनिस्ट लोकप्रियतेच्या आणि इतर बेटांमधील लष्करी सत्तेच्या बळावरच सुकार्नो टिकून राहिला. कम्युनिस्ट पक्ष आपली ईप्सिते साध्य करण्यासाठी लष्करभरतीसाठी जोराचे प्रयत्न करीत असे तर लष्कराच्या अवाढव्य खर्चामुळे इंडोनेशियन अर्थ-व्यवस्थेवर ताण पडून निर्माण होणाऱ्या दारिद्र्यामुळे कम्युनिस्ट पक्षाचेही चांगलेच फावत होते. वेस्ट न्यू गिनी आणि मलेशियाच्या विरुद्ध लष्कर आणि कम्युनिस्ट पक्ष या दोघांनीही सारख्याच बळाने भावना पेटविल्या. या दोन संघटनांची वाढ काय-मची अशीच होत राहणे शक्य नव्हते. त्यांपैकी एकाला कुणाला तरी पराभव पत्क-रावा लागणार हे उघड होते. परंतु, तात्पुरती तरी दोघांसमोरील ध्येये सारखीच दिसत होती. वेस्ट न्यू गिनीनंतर नॉर्थ बोर्निओ त्यांच्या नजरेसमोर होता. त्यानंतर ऑस्ट्रेलियन न्यू गिनी, पोतुगीज टिमर बेट, मलाक्का, फिलिपाईन्स हे सारे प्रदेश त्यांच्या बृहत् इंडोनेशिया 'इंडोनेशिया राज'च्या स्वप्नात येत होते. जगाला हिंदी महासागर म्हणून माहीत असलेला पण इंडोनेशियन महासागर असे इंडोनेशियन सरकारने दिलेले नाव धारण करणाऱ्या सागरावर या बृहत इंडोनेशियाची सत्ता गाजणार होती.

## स्वप्न आणि सत्य

अर्थातच या स्वप्नामध्ये सध्याच्या वास्तव परिस्थितीला स्थान नव्हते. नव्हे वास्तवात असलेल्या दारिद्र्याची, आर्थिक गोंधळाची आठवण करून देणे हाच मूर्ख-पणा होता. राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय घोषणा, राष्ट्रीय प्रतीके व राष्ट्राच्या आकांक्षा हेच खरे महत्त्वाचे. "कोण म्हणतो राष्ट्र अन्नावर जगते?" अध्यक्ष सुकार्नोने एका सभेत सवाल टाकला. "आमचे राष्ट्र भावनेवर, एकतेवर जगते, राष्ट्रीयत्वावर जगते."

अध्यक्ष सुकार्नोची सारीच भाषणे इंडोनेशियाचे एक महान चित्र उभी करणारी, आपले ' क्रांतिकारक ' उद्दिष्ट गाठण्यासाठी सामुदायिक राष्ट्रीय भावना एकवटून प्रचंड प्रयत्न करीत आहेत असे चित्र उभी करणारी. परंतु या आध्यात्मिक आवाहनाचे दृश्य प्रत्यंतर प्रत्यक्ष भरीव कार्यामध्ये येण्यापेक्षा आरडाओरडा करून सजविलेल्या निदर्शनांमध्येच जास्त येत होते. देशाची प्रतिष्ठा इतकी महत्त्वाची ठरली की, त्यापुढे राष्ट्रीय अर्थव्यवस्था अत्यंत गौण मुद्याची गोष्ट झाली. परकीय कर्ज, मदत, धान्य घेणे यांत काहीच गैर नव्हते. पण परकीय तज्ज्ञांचा सल्ला घेणे म्हणजे राष्ट्रीय प्रतिष्ठेला बाध येत होता. याच कारणामुळे इंडोनेशियात एकही जड उद्योगधंदा नाही. आर्थिक योजना मोठ्या प्रमाणावर आखण्यात आल्या. त्या कोसळून पडल्या असे म्हणता येणार नाही. त्या अंमलातच आणल्या गेल्या नाहीत.

मोठमोठ्या प्रचंड नेत्रदीपक योजना आखण्याची खरे म्हणजे इंडोनेशियन सरकारला कमालीची हौस. पण त्या योजना अंमलात आणणे बहुधा सरकारला कंटाळवाणे आणि जिकिरीचे काम वाटत असले पाहिजे. एकच मोठी योजना अध्यक्ष डॉ. सुकार्नोने स्वतः जातीने लक्ष घालून तडीला नेली आणि ती म्हणजे १९६२ सालच्या आशियन सामन्यांसाठी बांधलेले ऑलिंपिक शहर. पण त्यामागे राष्ट्रीय प्रतिष्ठा होती.

अशा रीतीने मुसोलिनीने ज्याप्रमाणे जुन्या रोमन साम्राज्याच्या आठवणीवर इटालियनांना झुलवीत ठेवले व त्याच धर्तीवर नवे रोमन साम्राज्य निर्माण करण्याची आशा लावून ठेवली तीच भूमिका थोड्याफार फरकाने इंडोनेशियात सुकार्नोने घेतली. फक्त रोमन साम्राज्याच्या जागी जावानीज अथवा ' इंडोनेशिया राज 'चे स्वप्न त्याच्यापुढे होते.

## एक संस्कृती, एक भाषा

ते स्वप्न साध्य करण्यासाठी आधी साऱ्या द्वीपसमूहाची एकी निर्माण होण आवश्यक होते. आणि हे ऐक्य सुकार्नोला हळू हळू, मंद पावलांनी, शतका शतकांनी यावे असे वाटत नव्हते. इतर इंडोनेशियन नेत्यांनाही तसे वाटत नव्हते. इंडोनेशियाची एक संस्कृती, एक देश, एक राष्ट्र, एक भाषा तडकाफडकीने निर्माण होणे आवश्यक होते. मग त्यासाठी जावानीज संस्कृतीचा बळी पडला तरी हरकत नव्हती. आपल्या लोकसंख्येचा दबावामुळे जावानीज लोकांना इंडोनेशियावर राजकीय वर्चस्व गाजविता आले. पण एक संस्कृतीच्या घोषणेमध्ये त्यांना आपली हिंदू, मुस्लिम, बौद्ध यांच्या मधुर मिलाफातून निर्माण झालेली व जगातल्या उच्च संस्कृतींपैकी एक मानली जाणारी जावानीज संस्कृती विसरून नव्याने निर्माण होत असलेल्या ' इंडोनेशियन संस्कृती ' पुढे मान तुकवावी लागली.

आर्थिक योजनांचे संकल्प जरी पाळता आले नाहीत तरीही ही एकतेची शपथ मात्र इंडोनेशियनांनी खरोखर प्रामाणिकपणे अमलात आणली. सुरुवातीला राष्ट्रीय बुद्धिवाद्यांनी, नंतर जपानी आक्रमणाच्या काळात व मग स्वातंत्र्योत्तर काळात सरकारी प्रोत्साहनाने प्रचंड वेगाने राष्ट्रीय एकात्मतेचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्याच्या यशाची साक्ष पटते ती इंडोनेशियाची राष्ट्रीय भाषा 'बाहशा इंडोनेशिया'-मध्ये. दक्षिण आशियातील समुद्रमार्गावरील व्यापारी पूर्वी जी भाषा वापरीत तिलाच हाती घेऊन तिच्यावर संस्कृत, अरेबिक, डच, लॅटिन, इंग्रजी संस्कार करून आपली एक नवीन भाषा इंडोनेशियाने बनविली व अधिकृत रीतीने तिचा वापर सरकारने सुरू केला. १९२७ – २८ पासून निर्माण झालेले वाङ्मय हेच त्या भाषेचे वाङ्मय. त्यामुळे इंडोनेशियातील उण्यापुऱ्या साठ विद्यापीठांतून हजारोंनी बाहेर पडणाऱ्या पदवीधरांची मात्र पंचाईत होते. त्यांना या भाषेत वाचायला मिळते ते म्हणजे सरकारी अथवा पक्षीय पत्रके. परंतु हीही भाषा समृद्ध करण्याचे जोराचे प्रयत्न चालू आहेत. अर्थातच त्यातही मोठा वाटा डॉ. सुकार्नोचा आहे. आपल्या कल्पकतेने त्याने अक्षरश: शेकडो नवनवीन आकर्षक शब्द आणि वाक्प्रचार या नवीन भाषेला मिळवून दिले आहेत.

## शब्दांची जादू

आपल्या या नव्या शब्दांच्या, संकेतांच्या आणि वाक्प्रचारांच्या जोरावर डॉ. सुकार्नो जनमनास चांगलेच पकडीत ठेवतो. विशेषत:, दरवर्षीच्या स्वातंत्र्यदिनी तो जी भाषणे करीत असे (१७ ऑगस्ट) त्या भाषणांमध्ये हमखास एखादा नवा शब्द-संकेत अथवा वाक्प्रचार वा लघु रूप वापरून त्या योगे साऱ्या इंडोनेशियात एक वेगळेच वातावरण तो निर्माण करी. 'मॅनीपोल' (मॅनिफेस्टो पॉलिटिक्स, १९५९ साली) 'स्वर्गातील देवदूत' (१९६०), 'रि – सो – पिम' (रिव्हाल्यूशन – सोशॅलिझम – पिम्पीनन – १९६१), 'विजयी वर्ष' (१९६२), 'क्रांतीची महागर्जना' (१९६३) आणि 'ताऱ्यांकडे झेप' (१९६५) हे त्याने फेकलेले त्याचे आवडते प्रचार हां हां म्हणता सर्वतोमुखी झाले आणि राष्ट्रीय ध्येयाचे ते पवित्र मंत्र बनले. आज इंडोनेशियात ज्याच्या त्याच्या तोंडी असलेला, 'नसाकोम' (नॅशनॅलिझम – अगामा – कोम्युनिझम – राष्ट्रीयत्व – धर्म – साम्यवाद) हाही त्याचाच शब्द. या शब्दायोगे त्याने देशातील तीन शक्तींना आणि पक्षांनाही एकाच ध्येयासाठी एकत्र आणले. या बाबतीतील डॉ. सुकार्नोची कल्पकता आणि कौशल्य नाकारून चालणार नाही. कारण इंडोनेशियन जनतेलाही तेव्हा अशाच मंत्राची गरज होती. बुद्धिवादी चर्चेपेक्षा सोप्या, सुटसुटीत शब्दांमध्ये त्यांना आपली ध्येये हवी होती, ती डॉ. सुकार्नोने पुरविली. त्याची "पाक्स ह्युमानिका" (मानवी शांतता) ही कल्पना फार आवडती होती. जगातील जवळ जवळ सर्व प्रभावी

तत्त्वज्ञानांचे एकत्र चूर्ण करून तयार केलेली ही गोळी होती. तीमध्ये इस्लाम, ख्रिश्चॅनिटी, गांधीवाद, अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा, मानवी अधिकार, कम्युनिस्ट मॅनीफेस्टो हे सर्व त्याने एकत्र आणले होते. १९५९ च्या स्वातंत्र्यदिनी त्याने आपल्या भाषणात सांगितले, " तीन वर्षांपूर्वी मी वॉशिंग्टनमध्ये पाक्स हयुमानिका ही कल्पना अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर कशी आधारली आहे हे समजावून सांगितले. आणि लगेच मॉस्कोमध्ये तीच कल्पना कम्युनिस्ट मॅनिफेस्टोवर कशी आधारित आहे हे दाखवून दिले !" बुंग कार्नोच्या या चतुरते-वर इंडोनेशियन जनता खुष न झाली तरच नवल. (इंडोनेशियन्स सुकार्नोला लाडाने " बुंग कार्नो " म्हणतात. बुंग म्हणजे मोठा भाऊ).

## राजकारण डावीकडे : जनता उजवीकडे

परंतु शब्दमंत्रांची भुरळ फार काळ टिकणे शक्य नव्हते. देशाचे राजकारण अधिकाधिक डावीकडे झुकत चालले होते तरी कम्युनिस्ट समाधानी नव्हते. " राज-कारण डावीकडे झुकते आहे खरे, परंतु जनतेची पोटे मात्र उजवीकडेच चालली आहेत," अशी आपली भावना कम्युनिस्ट नेता ऐदित याने बोलून दाखविली होती. उत्तमोत्तम अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असलेले लष्कर सारखे फुगतच होते. तरी राजकारण डावीकडे फारच झुकते आहे म्हणून जनरल्स नाखूष होते. तारेवरची कसरत फार काळ चालली होती. दोन्ही संघटना एकमेकींना पाण्यात पाहत होत्या पण बुंग कार्नो असेपर्यंत तरी काही करण्याची त्यांना हिंमत वाटत नव्हती. तो गेल्यानंतर कोण हाच खरा जीवन-मरणाचा प्रश्न होता.

आणि त्या प्रश्नाला तोंड देण्याची दोन्ही गटांची तयारी जोरात चालू होती. १९६४ च्या मध्यात सुकार्नो गंभीर आजारी झाला, तेव्हा तर ही दुहीची लक्षणे स्पष्ट झाली. तो आजारातून उठला तो ही लक्षणे पुसून काढण्याचा चंग बांधूनच. परंतु ते काही त्याला जमले नाही. चिनी नेत्यांची त्याच्यावरील भुरळ वाढत गेली. आणि त्यांच्या भरीला पडून आपला शत्रू मलेशिया याला संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा समितीत प्रवेश मिळताच त्याने सरळ यूनो संघटनेचाच त्याग केला आणि चीनच्या मदतीने एक नवीनच प्रतिस्पर्धी संघटना उभारण्याचा घाट घातला. जनतेचे लक्ष वळविण्यासाठी एक नवेच लक्ष्य निर्माण झाले. पण त्यामुळे बरेच जनरल्स मात्र नाखूप झाले.

इकडे कम्युनिस्टांची, राष्ट्रवाद्यांची आणि इस्लामियांची परस्परांविरुद्ध निदर्शने सुरू झाली. आपापल्या पक्षांच्या सदस्य संख्या वाढविण्यात त्यांच्यांत चुरसच लागली. कम्युनिस्ट पक्षाने आपले सभासद ३० लाख असून चाहत्याची संख्या २ कोटींवर असल्याचे सांगितले तर नॅशनॅलिस्ट पक्षाने सदस्यसंख्या ४५ लाख आणि पक्षाचे ५ कोटी चाहते दाखविले. नहदातुल उलामा या मुस्लिम पक्षाने तर त्यावरही ताण

करून आपले सदस्य ६० लाखांच्यावर असल्याचे सांगितले. या सर्व चाहत्यांची आणि सदस्यांची बेरीज इंडोनेशियाच्या एकूण लोकसंख्येपेक्षा कितीतरी जास्त होत होती ! मजची गोष्ट म्हणजे या तिन्ही पक्षांचा सुकार्नोला संपूर्ण पाठिंबा होता आणि तिन्ही पक्षांच्या अधिवेशनांच्या उद्‌घाटनाला अथवा अध्यक्ष म्हणून सुकार्नो सारख्याच तत्परतेने हजर राहत होता.

परंतु हे फार काळ चालणे शक्य नव्हते. लवकरच काहीतरी घडावयास हवे होते. आणि त्याप्रमाणे घडलेही.

## पहिली उठावणी

"क्रांतिकारक कामगारांना आणि शेतकऱ्यांना मुक्तपणे शस्त्रे वाटण्यात यावी," अशी ओरड कम्युनिस्ट पक्षाने आधीच सुरू केली होती. शस्त्रे अर्थातच मलेशियाचा नाश करायलाच हवी होती. चाऊ एन् लायनेही आपला दोस्त भाई सुकार्नो याला २ कोटींची लोकसेना उभारण्याचा सल्ला दिला होता – मलेशियाविरुद्धच. त्यानुसार सुकार्नोनेही आपले जनरल नासुशन आणि जनरल अहमद जानी यांना आपले सैन्य 'नसाकोमाईझ' करण्याची आज्ञा केली. सुकार्नोच्या आज्ञेचे स्वागत मोठ्या उत्साहाने झाले. पण प्रत्यक्षात मात्र काहीच घडले नाही. जनरलसना शस्त्रास्त्रे मुक्तपणे कम्युनिस्टांच्या हाती देण्याचा धोका पत्करायचा नव्हता. आणि कम्युनिस्टांची ओरड तर अधिकच जोर धरू लागली. याच भांडणाची परिणती एक ऑक्टोबरच्या क्रांतीत झाली.

कुठल्याही क्रांतीत नेमके काय घडले हे सत्य बाहेर येणे फार अवघड असते, तसेच याही ठिकाणी आहे. अध्यक्षांच्या राजवाड्याच्या शरीररक्षक पथकाचा नेता कर्नल उंटूंग याने सुरुवातीच्या आपल्या घोषणेत सांगितले, की जनरलसचा कट हाणून पाडण्यासाठी मला सत्ता हाती घ्यावी लागली. नेमका कुणाचा कट आधी होता ? कम्युनिस्टांचा की जनरलसचा ?

अध्यक्षांच्या राजवाड्याच्या संरक्षक पथकाचा सत्ता हाती घेण्याचा प्रयत्न थोडक्यात चुकला. पण तेवढ्या वेळात त्यांनी लष्करातील सहा नॅशनॅलिस्ट जनरलसना ठार केले. त्यातच सेनापती जनरल अहमद जानी हा होता. जनरल नासुशन थोडक्यात निसटला. मागील बागेच्या कुंपणावरून उडी टाकून तो शेजारच्या इराकी दूतावासात लपून बसला आणि तेथून आपल्या संरक्षण मंत्रालयात जाऊन कटाविरुद्ध कारवाई करण्यास त्याने सुरुवात केली. या गडबडीत त्या ी एक ९ वर्षांची मुलगी मात्र ठार झाली आणि त्याच्या गुडघ्यालाही थोडे लागले.

कर्नल उंटूंगच्या नेतृत्वाखालील कट हा कम्युनिस्टप्रणीत होता, की दुसऱ्याच कुणाचा, याची प्रथम कुणाला कल्पना नव्हती. तसेच, या सुरुवातीच्या गडबडीत डॉ. सुकार्नो कोठे होता आणि काय करीत होता, याचीही कुणाला विशेष माहिती

नव्हती. ऑक्टोबर तीनला त्यानेच स्वत: रेडिओवर भाषण केले, तेव्हाच तो जिवंत असल्याची जगाला खात्री पटली. त्याच भाषणात त्याने सांगितले की, वैयक्तिक सुरक्षिततेसाठी आपण जकार्ताच्या विमानतळावर गेलो होतो. पण बहुधा त्याला विमानाने कुठे जाता आले नसावे. कारण, पुढचा सबंध पंधरवडाभर तो आपल्या बोगोद येथील मेरेडका राजवाड्यात लष्कराच्या कडक बंदोबस्तात होता.

## कम्युनिस्ट विरुद्ध लष्कर

५–६ ऑक्टोबरच्या सुमारास जकार्तात कम्युनिस्टविरोधी निदर्शने इस्लामी पक्षाने सुरू केली. इस्लामी पक्षानेच प्रथम या कटामागे कम्युनिस्ट पक्षाचा हात असल्याचा आरोप केला व त्या पक्षावर बंदी घालण्याची मागणी केली. तोपर्यंत हा आरोप उघडपणे कुणी केला नव्हता. कर्नल उंटूंग दरम्यान फरारी होता.

सहा ऑक्टोबरला जकार्तापासून ४० मैलांवर असलेल्या बोगोद येथे सुकार्नोने आपल्या मंत्रिमंडळाची बैठक भरविली. कम्युनिस्ट मंत्री ऐदित या बैठकीला हजर नव्हता. सुकार्नोने पुन्हा एकदा राष्ट्रीय ऐक्याचे आवाहन केले व परस्परांत न भांडण्याची विनंती केली.

लष्कराचा रोख आपल्यावर आहे हे कम्युनिस्टांनी ओळखले. म्हणून शेवटचा प्रयत्न म्हणून त्यांनी आपण अध्यक्ष सुकार्नोशी एकनिष्ठ असल्याचे निक्षून सांगणारे पत्रक काढले. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. ऑक्टोबर आठला मुस्लिमांनी कम्युनिस्टांविरुद्ध उग्र निदर्शनांना सुरुवात केली. हजारो मुस्लिम आणि नॅशनॅलिस्ट युवकांनी ‘कम्युनिस्टांना ठार मारा,’ ‘ऐदितला गोळ्या घाला,’ अशा घोषणा देत कम्युनिस्ट पक्षाची कचेरी जाळून टाकली. सूडाच्या आणि द्वेषाच्या भावनेने सारे वातावरण पेटले. जनरल नासुशनच्या शवाची मोठी प्रेतयात्रा युवकांनी काढून या विषारी वातावरणात भरच घातली.

कम्युनिस्टांनी वेळ ओळखली आणि ते एकदम भूमिगत झाले. तेव्हापासून कम्युनिस्ट विरुद्ध लष्कर असा खरा लढा सुरू झाला. मध्य आणि पूर्व जावामध्ये कम्युनिस्टांनी संघटितरीत्या लढे देण्यास सुरुवात केली तर लष्कराने ठिकठिकाणचे कम्युनिस्ट हुडकून त्यांना गोळ्या घालण्याचा सपाटा लावला. कम्युनिस्ट वर्चस्वाखाली गेलेली ‘अंतारा’ वृत्तसंस्था बंद करण्यात आली होती. तीमधून कम्युनिस्टांना डच्चू मिळून लष्कराच्या मार्गदर्शनाखाली ती पुन्हा सुरू करण्यात आली. जनरल उंटूंग बसमधून पळून जात असताना त्याला ऑक्टोबर बाराला पकडण्यात आले आणि पुढे त्याच्यावर खटला भरून त्याला गोळी घालून ठार मारण्यात आले. ऐदित भूमिगत झाला होता. तोही पुढे एका चकमकीत मृत्युमुखी पडला.

## सुकार्नोचा ओढा कम्युनिस्टांकडे

एवढे होऊनही सुकार्नो अद्याप अध्यक्षपदी होताच. अद्यापही त्याने कम्युनिस्ट

पक्षावर बंदी घातली नव्हती. आणि अद्यापही कम्युनिस्टधार्जिणा परराष्ट्रमंत्री त्याच्या पदरी होताच. त्याच दरम्यान सुकार्नोने मेजर जनरल सुहार्तो यास आर्मी चीफ् ऑफ स्टाफ केल्याचे घोषित केले. नॅशनॅलिस्ट नासुशनला डच्चू मिळाला होता.

या सर्व घटना इतक्या भराभर एकामागून एक घडत गेल्या की, त्यांचा तपशीलवार अर्थ लावणे कठीण आहे. एक गोष्ट मात्र खरी, की काहीतरी करण्याची वेळ जवळ आली आहे हे कम्युनिस्टांनीही आणि लष्करी जनरल्सनीही ओळखले होते. कुणी अगोदर पाऊल टाकायचे हेच ठरायचे होते. कम्युनिस्टांनी काही हालचाल केली नसती तर जनरल्स काहीतरी करतीलच हीही त्यांना खात्री होती. आणि कम्युनिस्टांच्या बाजूने सुकार्नोचे थोडे झुकतेच माप होते.

एक ऑक्टोबरला जे जनरल्स ठार झाले त्यांमध्ये सुहार्तो आणि नासुशन वाचले त्यानंतर सुहार्तोने जे पवित्रे घेतले ते अगदी अगोदर ठरविलेल्या योजनेबरहुकूम असल्यासारखे भासत होते. ते काहीही असो क्रांतीच्या पहिल्या दिवशी डॉ. सुकार्नो आणि डॉ. सुबांद्रियो विमानतळावर आले आणि परत गेले. या त्यांच्या हालचालीमुळे त्यांचाही या कटाशी संबंध होता, असाच निष्कर्ष निघतो. कम्युनिस्टांकडून जर परस्पर उजव्या गटाच्या जनरल्सचा निकाल लागत असेल तर ते सुकार्नोला हवे होते. पण ते नीट जमले नाही. कुणाची तसे उघड म्हणण्याची छाती नसली तरी सध्या अधिकारावर असलेल्या जनरल सुहार्तोला त्याची पूर्ण कल्पना असली पाहिजे. त्यानंतरही डॉ. सुकार्नोला आपली टोपी वळवून जनरल्सच्या बाजूने आपले वजन टाकण्याची संधी होती. कम्युनिस्ट पक्षाला बंदी घालण्याचा कितीतरी दबाव त्याच्यावर आला होता. पण तो त्याने झिडकारून दिला. देशभर कम्युनिस्टांचे शिरकाण होत असतानाही आपला डावा हात पूर्ववत भक्कम करण्याची चिंता त्याला लागून राहिली होती.

इंडोनेशियन कम्युनिस्ट पक्षाच्या सामर्थ्यावर सुकार्नोचा चांगलाच विश्वास होता व आपल्या नासाकोमच्या आणि इंडोनेशियन समाजवादाच्या कल्पनेला पाठिंबा देणारा कम्युनिस्ट पक्ष त्याला हवाच होता. जगातील अत्यंत प्रबळ कम्युनिस्ट पक्षांमध्ये गणल्या जाणाऱ्या या कम्युनिस्ट पक्षाचे हिशेब चुकले हे त्याचे आणि पक्षाचेही दुर्दैवच.

### लष्कर वरचढ ठरले

अर्थातच कम्युनिस्ट पक्ष इंडोनेशियातून कायमचा नेस्तनाबूत झाला असे म्हणणे चुकीचे होईल. पक्ष इतक्या झपाट्याने वाढत होता आणि पक्षाचा प्रभावही इतक्या वेगाने वाढत होता की कधीतरी आपल्या हाती सत्ता येईलच याची त्याला खात्री होती. अशा स्थितीत बळाचा वापर करून सत्ता हाती घेणे मूर्खपणाचेच

होते. पण कम्युनिस्टांना तसे करण्यास भाग पाडले ते जनरल्सनी. कम्युनिस्टांनी पुढे पाऊल टाकले नसते तरी उजव्या जनरल्सनी कधीतरी कम्युनिस्टांना कापून काढलेच असते. त्यापेक्षा आपणच आधी जनरलसना कापून काढले तर— असा कम्युनिस्टांनी विचार केला असावा. पण जनरल्स त्यांनाही भारी ठरले. त्यांच्या योजना अगोदर तयारच होत्या आणि सुकार्नोच्या मृत्युनंतर जे नाट्य घडले असते ते त्याच्या हयातीतच घडले. एवढ्या मोठ्या प्रमाणात कम्युनिस्ट मारले गेले याचे जकार्तातील लोकांना विशेष दु:ख वाटते असे दिसत नाही. एका मुस्लिम नेत्याने एका पाश्चात्त्य वार्ताहराला शांतपणे सांगितले, एक तर आम्ही तरी कापले गेलो असतो किंवा ते तरी कापले गेले असते. त्याशिवाय इलाज नव्हता. तेव्हा आता 'ते'च कापले गेले यासाठी रडण्यात काय अर्थ ?

अध्यक्ष सुकार्नोने कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातली असती तर कदाचित या शिरकाणावर थोडेफार बंधन पडले असते. पण सुकार्नोने या रक्तपाताचा आपल्या जनरल्सविरुद्धच उपयोग केला आणि फेब्रुवारीमध्ये त्याने आपले जे नवीन मंत्रिमंडळ बनविले त्यामध्ये कम्युनिस्ट चाहत्यांचा जाणूनबुजून समावेश केला. त्यामुळे लष्कर आणि जनता अधिकच खवळली. याच सुमारास आर्थिक व्यवस्था पार कोसळण्याच्या बेतात आली होती. सुकार्नोच्या कारभारातील गलथानपणा आता लोकांच्या नजरेला येऊ लागला होता. कट ही केवळ कम्युनिस्टांचीच चूक नव्हती तर ती सुकार्नोचीही चूक होती अशी भावना दृढ होऊ लागली. याही वेळेस अध्यक्ष सुकार्नोने जनमताला मान तुकविण्याचे नाकारले आणि कम्युनिस्टांविरुद्ध निदर्शने करण्यास आलेल्या विद्यार्थ्यांवर गोळ्या घालण्याचा हुकूम त्याने आपल्या राजवाड्याच्या रक्षकांना दिला.

अशा खूपच चुका झाल्या होत्या आणि सुकार्नोच्या हातून सत्ता काढून घेण्या-शिवाय जनरल्सना गत्यंतर नव्हते.

अत्यंत साध्या रीतीने केवळ एक सही करून सुकार्नोने सर्व सत्ता जनरल सुहार्तोच्या हाती सुपूर्द केली. जकार्तामध्ये गोंधळ माजला होता आणि परिस्थिती काबूत आणण्यासाठी सैन्याच्या हाती सत्ता देण्यावाचून इलाज नाही असे सुहार्तोने बजावले होते. नाहीतरी आतापर्यंत सुकार्नोच्या हाती सत्ता असली तरी तिचा काही उपयोग नव्हता. सुहार्तोच्या हाती सत्ता देण्यावाचून गत्यंतर उरले नव्हते.

दुसरे दिवशी सकाळी देशाला ही बातमी कळताच सर्वत्र खळबळ माजली. जकार्ताच्या रस्त्यांवरून 'लष्कर झिंदाबाद'च्या घोषणा देत विद्यार्थ्यांनी मिरवणुकी काढल्या. 'सुकार्नोला फाशी द्या,' अशी मागणी करणारी भित्ती-पत्रकेसुद्धा ठिक-ठिकाणी चिकटवलेली आढळून आली. एकूण लष्करी अधिकाऱ्यांना जी भीती वाटत होती ती खोटी ठरली. सुकार्नो अद्यापही इंडोनेशियन जनतेच्या मनात राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हणून आहे. सत्तेवरून त्याला खाली ओढल्यास मोठी गडबड

उडेल, अशी त्यांना भीती वाटत होती. पण तसे काही घडले नाही.

सुकार्नो सत्तेवरून उतरला तरी त्यामुळे अद्याप आणीबाणी संपुष्टात आली नाही. अजून इंडोनेशियात काहीतरी घडावयाचे आहे. सुकार्नोची जागा कोण घेतो हे अद्याप ठरावयाचे आहे. सुकार्नो हा इंडोनेशियन राज्यघटनेप्रमाणे इंडोनेशियन गणराज्याचा आजन्म अध्यक्ष आहे. आणि पुन्हा काही घडले तर सुकार्नोच पूर्ववत अधिकारावरही येईल.

दरम्यान सत्तेवर येताच ४२ वर्षांच्या जनरल सुहार्तोने पहिली आज्ञा काढली ती कम्युनिस्ट पक्षावर बंदी घालण्याची. तसेच सुबांद्रियो आदी कम्युनिस्टधार्जिण्या मंत्र्यांवर खटले भरण्याचाही त्याचा विचार असल्याचे बोलले जाते. परराष्ट्रमंत्री सुबांद्रियो व अर्थमंत्री चैरूल सलेह हे धरून पूर्वीच्या एकूण १५ मंत्र्यांना अजूनही त्याने लष्करी तुरुंगात ठेवले आहे. इंडोनेशियन जनतेच्या क्षोभाला ते बळी पडू नयेत म्हणून सुहार्तोने ही दक्षता घेतली असल्याचे सांगण्यात येते. त्याने नव्याने बनविलेल्या मंत्रिमंडळात सुकार्नोची ज्यांच्यावर नामर्जी होती, त्यांपैकी त्याने कुणालाही घेतले नाही. त्यामुळे सुकार्नोने घालवून दिलेल्या महत्त्वाकांक्षी जनरल नासुशनचीही या नव्या मंत्रिमंडळात वर्णी लागली नाही. कुठल्याही परिस्थितीत देशाचे राजकारण उजवीकडे झुकू देणार नाही अशीही घोषणा जन. सुहार्तो वारंवार करतो. यावरून बुंग कार्नोच्या इच्छेला मान देण्याची त्याची अद्यापही धडपड चालू असलेली दिसते.

## सुहर्तोचे नवे धोरण

सुकार्नोच्या इच्छेला मान देण्याचा जरी जनरल सुहार्तोचा वरवर प्रयत्न दिसत असला तरी एकंदर सर्वच अंतर्गत व परराष्ट्रीय धोरणांमधील पूर्वीचा पोकळ बेफाटपणा काढून टाकून समंजस धोरणे सुहार्तो पत्करत असल्याचे दिसत आहे. नव्या मंत्रिमंडळाच्या आवाजाला आता वजन आले आहे. संयुक्त राष्ट्र संघामधून सुकार्नोने बेछूटपणे इंडोनेशियाचे पाऊल बाहेर काढले, तेथे आता पुन्हा प्रवेश मिळविण्याचा विचार नव्या मंत्रिमंडळात चालू आहे. मलेशियावर आपणहून चढाई न करण्याची सुहार्तोची घोषणा, चिनी–इंडोनेशियन मधुचंद्राला दिलेला फाटा, रशिया, पूर्व युरोप, अलिप्त राष्ट्रे व अमेरिका यांची पूर्ववत् मैत्री संपादण्याच्या दृष्टीने चाललेले प्रयत्न ही नक्कीच समजूतदारपणाची लक्षणे आहेत.

तसेच अंतर्गत परिस्थिताचाही मोठ्या प्रमाणावर फेरविचार चालू आहे. नागरी सरकार आणण्यासाठी सार्वत्रिक निवडणुका घेण्यासाठी मागण्या होत आहेत. त्या दृष्टीने निवडणुकांची तयारी करण्यासाठी एक समितीही मंत्रिमंडळाने नेमलेली आहे. एकूण सात महिन्यांच्या अनिश्चिततेनंतर आणि लाखोंच्या शिरकाणानंतर इंडोनेशियात जबाबदार राज्यकारभार येत असल्याची ही चिन्हे आहेत.



अजून यौवनात मी ...
[ सुकार्नो ]

## ' मीच सर्वसत्ताधीश आहे, हा ऽऽ हा ऽऽ '

दरम्यान अध्यक्ष सुकार्नोची स्थिती मात्र दिवसेंदिवस अधिकाधिक केविलवाणी होत आहे. त्याच्यासमोर त्याने ठरविलेल्या धोरणामध्ये आमूलाग्र फेरबदल होतो आहे. इतकेच नव्हे तर त्याच्या अध्यक्षपदाच्या काळात मंत्रिमंडळाला न विचारता त्याने जे असंख्य निर्णय घेतले त्यांच्या कायदेशीरपणाबद्दल सर्वत्र चर्चा चालू आहे. सुकार्नोमागून इंडोनेशियाच्या अध्यक्षपदी येण्याची महत्त्वाकांक्षा धरणारा व सध्या कुठलीच सत्ता हाती नसलेला जनरल नासुशन याने तर नुकतेच उघडपणे सुकार्नोच्या आयुष्यभराच्या अध्यक्षपदाच्या कायदेशीरपणाविषयी शंका व्यक्त केली आहे. आणि इतर अनेकांनीही अशीच शंका व्यक्त केली आहे. १९४५ पासून निर्माण केलेले लोकांचे सल्लागार मंडळ आतापर्यंत केवळ अध्यक्षाच्या तालावर नाचत होते. किंबहुना या कॉंग्रेसला काही अधिकारच सुकार्नोने ठेवले नव्हते. या मंडळाला १९४५ च्या घटनेनुसार पूर्ववत प्रभावीपणा प्राप्त करून द्यावा, याविषयीदेखील प्रयत्न चालू आहेत. या सर्व प्रयत्नांत जनरल नासुशन मोठ्या उत्साहाने भाग घेत आहे. पुढे मागे निवडणुका झाल्याच तर त्यात उभे राहण्याचा त्याचा विचार दिसतो.

सुकार्नो मात्र अजूनही अधून मधून आपल्या भाषणांमधून मीच सर्वसत्ताधीश असल्याची पुन्हा पुन्हा आठवण करून देतो. परंतु आपली खरी परिस्थिती काय आहे, याची त्याला दु:खद जाणीव असली पाहिजे. आपल्या मंत्र्यांना त्याने परवा चर्चेसाठी बोलविले होते. त्यांना त्याने आवर्जून सांगितले, " मंत्र्यांनो, कृपा करून माझ्याकडे केवळ बाहुले म्हणून किंवा प्रतीक म्हणून बघू नका. मी अजूनही

अध्यक्ष आहे, सर्वसत्ताधीश आहे." काहीजण आपल्याला केवळ घटनात्मक प्रमुखाची भूमिका देत आहेत, अशी तक्रार करून सुकार्नो पुढे म्हणाला, "मला नावापुरता राजा व्हायचे नाही. मला तशी महत्त्वाकांक्षा नाही."

जनरल सुहार्तोकडे कष्टी नजरेने पाहत डॉ० सुकार्नो म्हणाला, "मी मेल्यावर मला एखाद्या घनदाट छाया देणाऱ्या झाडाखाली पुरा. मग मी त्या शांत–निरामय वातावरणात परमेश्वरासमोर जाईन. माझ्यासाठी मोठी कबर बांधू नका किंवा एखाद्या मोठ्या सुंदर कबरस्तानातही मला पुरू नका."

डॉ० सुकार्नोची परिस्थिती खरोखरच केविलवाणी झाली असली पाहिजे यात शंका नाही. परवा एका वार्ताहराने त्याला विचारले, "बुंग कार्नो, आजकाल तुम्ही विशेष हसताना दिसत नाहीत ?"

"हा ऽऽ हा ऽऽ ....." सुकार्नो त्यावर मोठ्याने हसला आणि त्याला म्हणाला, "हा ऽऽ हा ऽऽ हा...हे बघ, मी हसतो आहे, तुम्हा सर्वांना हसतो आहे, तुम्हा वार्ताहरांना हसतो आहे. तुम्ही म्हणता ना मी आजारी आहे म्हणून ? हा बघा मी कसा टुणटुणीत आहे. साऱ्या जगाला, साऱ्या राजकारण्यांना हसतो आहे. ते समजतात मी आता सत्ताहीन झालो आहे. पण अजूनही मीच इंडोनेशियाचा अध्यक्ष आहे. मीच सर्वसत्ताधीश आहे ! हाऽऽ हा ऽऽ ... हा ! मीच सर्वसत्ताधीश आहे... हा ऽऽ हा...हा ऽऽ"

• • •

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

# ONE CIGARETTE BURNS TWICE







Once when you light it. Again when you throw it away thoughtlessly.

Do not throw lighted cigarette ends or beedi's inside your carriage.

Follow this simple rule, and help to make railway travel safer for yourself ... safer for others.

CENTRAL RAILWAY

mcm/cr/5



'देवा'—गंधर्वांनाही आवडलेली सुभद्रा

# 'यशवंत' नट

## श्री. शंकरराव सरनाईक

लेखक
एस्. ए. कुलकर्णी

आपल्याकडे १९३० नतर सिनेमा बोलका झाला आणि या बोलक्या सिनेमांनी मराठी रंगभूमीची अक्षरश: दाणादाण उडविली. रात्रभर जागरणाचा प्रश्न नाही, तिकिटांसाठी केवळ चार-आठ आण्यांचा खुर्दा पुरेसा आणि सर्व दृष्टीने नव-थर असलेली बहुरंगी करमणूक या बाबींच्या जोरावर बोलक्या सिनेमांनी मराठी रंगभूमीला बेवारशी करून सोडले. रंगभूमीवरचे मखमली पडदे हळूहळू गुंडाळले जाऊ लागले. या सर्व घटनांचा व्यावहारिक दृष्टिकोनाने सखोल विचार करून एका नटश्रेष्ठाने आपली नाटक–कंपनी बंद करण्याचा निर्णय घेतला आणि ऐन फॉर्मात असलेल्या एखाद्या क्रिकेटरने आपण निवृत्त झाल्याचे जाहीर करावे, त्याप्रमाणेच हा नटश्रेष्ठ मखमली पडद्याआड झाला.

कोण हा नटश्रेष्ठ? कविहृदयाला युगानुयुगे ज्या कोकिळेने मोहित केलेले आहे, जिच्या पंचमस्वराने सालोसाल वसंत ऋतूला नवा तजेला, उजाळा व रसिलेपणा येतो, त्या कोकिळेच्याच मधुर कंठाने मराठी रंगभूमीच्या लक्षावधी रसिक श्रोत्यांना १९१९ ते १९३५ पर्यंत अखंड १६ वर्षे रिझविले आणि 'महाराष्ट्र-कोकीळ' ही यथोचित सन्मान्य बिरुदावली पटकावली – तेच श्री. शंकरराव सरनाईक! त्यांनी 'यशवंत संगीत नाटक-मंडळी'ची 'यशवंती' मराठी रंगभूमीच्या यशोदुर्गावर थेट बुरुजाच्या पृष्ठभागापर्यंत चढविली आणि गड चोहो बाजूंनी सर केला व आपल्या यशाची सद्दी मर्यादित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे वेळीच अचूकपणे हेरून आपल्या लाडक्या यशवंतीला चुचकारून त्यांनी स्वतःच परत घेतले.

शंकररावांनी नाटकाचा धंदा सोडला आणि आपल्या डोक्यावरचे लांबसडक काळेभोर केस उतरविले. (स्त्रीभूमिकांसाठी त्यांनी स्वतःचे केस भरपूर वाढविले होते.) जवळजवळ तो त्यांचा संन्यासाश्रमच होता. तेव्हापासून आजतागायत ते कोल्हापूरला आपल्या घराण्यातील आध्यात्मिक भजनी परंपरेचा वारसा चालवीत आहेत. दर सोमवारी ते आपल्या सुप्रसिद्ध 'सरनाईक हॉल'मध्ये आपल्या साथीदारांसह भजनात रंगून जातात. वयाची सत्तरी उलटून गेली असली तरी त्यांचे कोकीळकंठी गाणे आजही कायम आहे. त्यांचा आवाज मंद्र, मध्य व तीव्र या तिन्ही सप्तकांत आजही इतक्या लीलया फिरतो, की नव्या दमाचे त्यांचे तरुण साथीदारही अवाक होऊन जातात.

## आदर्श कारभारी

श्री. शंकरराव सरनाईक म्हणजे एक आदर्श नटश्रेष्ठ, आदर्श गायक व आदर्श कारभारी ठरले आहेत. कंपनी बंद केली तेव्हा त्यांनी कोणाचे एक पैही देणे ठेवले नाही. सर्व नटांचे पगार चुकते केले व सर्वांना कोल्हापूरला आपल्या घरी आणून ठेवून घेतले. कंपनीत तेव्हा १२५ लोक होते. "दुसरा चरितार्थाचा व्यवसाय मिळेपर्यंत माझ्याबरोबर राहून माझी मीठभाकर गोड मानून घ्या," असा त्यांचा आपल्या सहकाऱ्यांना खासा आग्रह होता; आणि खरोखरच ही मंडळी आपली सोय होईपर्यंत आपल्या लाडक्या 'नानां'च्या सहवासात चार महिने त्यांच्या घरी राहिली होती. मराठी रंगभूमीच्या इतिहासातील ही एक दुर्मीळ व अविस्मरणीय घटना होय! कंपनीचा मुक्काम हलणार, परंतु गाडीभाड्याला पैसे नाहीत, कंपनीचे सामान–पेटचा, तबले–गावातल्या अडत्यांच्या पेढीवर गहाण पडलेले, कंपनीवर कर्जाचा डोंगर, दिवाणी दावे, दरखास्ती, जप्त्या-नोटिसा यांचा ससेमिरा, मालक–नट–गायक व्यसनाच्या गर्तेत तासन् तास खितपत पडल्यामुळे अंगाची शुद्ध नाही, व्यसनाच्या तारेत अन्नान्नदशेच्या अवस्थेत त्यांना अनपेक्षितपणे एखाद्या अडगळीच्या अंधाऱ्या खोलीत आलेला मृत्यू, त्यानंतर त्यांच्याच सहकाऱ्यांनी जीव

मुठीत धरून प्रेतसंस्कारासाठी लागणारा पैसा गोळा करणे – इत्यादी लज्जाहीन अवस्थेने कित्येक मराठी नाटक कंपन्यांचा इतिहास बरबटून गेलेला आहे. परंतु शंकररावांची 'यशवंत संगीत नाटक-मंडळी' या सर्व घटनांना एकमेवाद्वितीय अपवाद ठरली. याचा अर्थ शंकरराव नंबर एकचे कंजूष असले पाहिजेत, असा कोणी निष्कर्ष काढील; पण ते साफ खोटे! शंकरराव महारथी कर्णाच्या औदार्याने वागत आले आहेत. यशवंत संगीत नाटक-मंडळीमध्ये त्यांनी लक्षावधी रुपये जमविले आणि तितकेच खर्चलेही! गायनसम्राट अल्लादियाखाँचा गंडा बांधताना शंकररावांनी दहा हजार रु. दिले. विविध संस्थांना देणग्या देण्यात त्यांनी ऐंशी हजारांहून अधिक रुपये बिनदिक्कतपणे वाटले. हैद्राबाद मुक्कामी त्यांच्या 'चलती दुनिया' या नाटकाला तीन महिन्यांत बेचाळीस हजार रुपयांचे उत्पन्न झाले आणि शंकररावांनी केले काय?– तर "देवाने मला भरपूर दिले आहे; मग मीसुद्धा इतरांना मोठ्या मनाने व मोकळ्या हाताने का देऊ नये?" असा विचार करून त्यांनी आपल्या सर्व नटांना एक वर्षाचा आगाऊ पगार देऊन टाकला. तर मग या नटश्रेष्ठाला मराठी रंगभूमीवरचा कर्ण असे का म्हणू नये?

शंकररावांचा स्वभाव निरागस बालकाप्रमाणे आहे. 'कोणाही जिवाचा न घडो मत्सर' हे तर त्यांचे ब्रीदवाक्य! तत्कालीन कोणत्याही नटश्रेष्ठाबद्दल त्यांना कधीही हेवा वाटला नाही. सवाई गंधर्वांची कर्जफेड त्यांनीच केली; बालगंधर्वांच्या कर्जफेडीस्तव नाट्यसंन्यास घेतल्यानंतरही शंकररावांनी त्यांच्याशी संयुक्त पद्धतीने नाटके करण्यासाठी तोंडाला रंग फासला. परंतु बालगंधर्वांनीच नेहमीच्या आपल्या परक्यांच्या सूत्र-संचलनावर हालचाल करण्याच्या विशिष्ट पद्धतीनुरूप या संधीचा भरपूर फायदा उठविला नाही त्याला ते काय करणार? कलावंतांचा, नटांचा मान राखण्यामध्ये शंकररावांनी कधीही कसूर केली नाही. त्याकाळी ते सवाई गंधर्वांना २५० रु. व कृष्णराव गोऱ्यांना २०० रु. मासिक पगार देत असत. नाटक–कंपनी कोणतीही असो, तिचे व आपले ध्येय एक आहे, ही गोष्ट शंकरराव पुरेपूर मनात बाळगून असत व अडचणीत सापडलेल्यांना आपण होऊन मदतीचा हात देत. एकदा कोल्हापूरला महाराष्ट्र कंपनीच्या नोकरांनी संप केला. सामानाची चणचण भासली म्हणून जाहीर केलेला खेळ बंद पडण्याचा प्रसंग आला. शंकररावांनी आपला एक स्वतंत्र ताफा पाठवून, सामानसुमान धाडून देऊन तो खेळ पार पाडला. असा त्यांचा दिलदार स्वभाव! मराठी नाट्यसृष्टीचे पितामह श्री. अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या नित्य पूजाअर्चेतील 'बाण' (शंकराची पिंड) बेवारशी पद्धतीने दूरच्या मुलखात पडला असल्याचे कळल्यावर शंकररावांनी मोठ्या निष्ठेने त्याचा तलास केला आणि शेवटी भरपूर किंमत देऊन विकतही घेतला. आजही तो बाण त्यांच्या घरी देव्हाऱ्यावर ठेवलेला आढळून येतो.

शंकररावांचा मुख्य गुणविशेष हाच, की त्यांनी शेवटपर्यंत 'अंथरुण पाहून पाय

पसरायचे' हे तत्त्व अवलंबिले. 'मियाँ टिचभर नि दाढी हातभर' अशा पद्धतीने त्यांनी कधीच खर्च केला नाही. होळी सणाच्या निमित्ताने इंदूरला तुकोजीराव महाराजांच्या अत्तराच्या कारंजाखाली गुलाबी फुलांच्या सड्यावर गाणे–बजावणे केले; पण कंपनीत अत्तराचे दिवे फुकटच्या फाकट जाळले नाहीत. रंगपट, पडदे, वाद्ये, फर्निचर इत्यादी आवश्यक बाबींवर त्यांनी भरपूर खर्च केला. त्यांची कंपनी बंद झाली, तेव्हा १३ ट्रक्स भरतील एवढे जबरदस्त सामान त्यांच्याकडे होते. कंपनीमध्ये ६ तबलजी, ६ पेटीवाले, ४ सारंगीवाले होते आणि नटांच्या अशा काही विलक्षण जोड्या त्यांनी जमविल्या होत्या, की त्यांच्या जोरावर ते एकाच शहरामध्ये, एकाच दिवशी, दोन वेगवेगळ्या थिएट्रांत एकाच नाटकाचे दोन अलग अलग खेळ लावीत असत. एकीकडे सवाई गंधर्व सुभद्रा होत, तर दुसरीकडे शंकरराव सुभद्रा बनत. असे प्रयोग त्यांनी खुद्द कोल्हापूरलाही केले. असे जरी असले तरी आपला कोणताही खर्च अनाठायी होणार नाही, याची ते सदैव काळजी घेत. त्यामुळेच ते मराठी रंगभूमीवर शेवटपर्यंत मानाच्या स्थानावर राहून मानानेच निवृत्त झाले !

## शंकररावांचे 'सौभद्र'

शंकररावांची यशवंत संगीत नाटक–मंडळी म्हणजे सवाई तुकोजीराव होळकर सरकार बहादूर, इंदोर यांच्या आश्रयाखालील एक बडे संस्थानच होते. १९१९ ते १९३५ या काळात कंपनीने मानापमान, मृच्छकटिक, संशयकल्लोळ, मूकनायक, विद्याहरण, पुण्यप्रभाव, शारदा, सौभाग्यलक्ष्मी, पटवर्धन, लयाचा लय, सिद्धसंसार (हिंदी), चलती दुनिया (हिंदी), तुळसीदास, तुकाराम, भवानी तलवार, सौभद्र, देवी अहल्या, माझा देश, सत्याग्रह, रायगडची राणी, देवकी, कायदेभंग, पुनरागमन, रोशनआरा इत्यादी २५ नाटके सादर केली. हैद्राबादच्या मुक्कामात भाषेची अडचण आली म्हणून शंकररावांनी 'रोशनआरा' हे उर्दू नाटक तीन महिन्यांत बसविले आणि खोऱ्याने पैसा ओढला. "पैसा मोजला नाही," असं त्या मुक्कामाचं वर्णन केलं जातं. १९२२ साली शंकररावांनी 'चलती दुनिया' या नाटकात स्टेजवर पहिल्याने तिरंगी झेंडा फडकविण्याचे धाडस केले. इक्बाल, मोतीलाल नेहरू आदींचे रूपक असलेले, त्यागाची शिकवण देणारे ते नाटक सादर करणे म्हणजे त्या काळात एक अग्निदिव्यच होते. त्यामध्ये वेश्याउद्धाराचा प्रश्न हाताळलेला असल्याने या नाटकाचा त्या काळी समाजावर एवढा जबरदस्त पगडा बसला, की कित्येक वेश्यांनी आपला धंदा सोडून दिला.

कंपनीने जशी सुप्रसिद्ध व मराठी रंगभूमीवर अजरामर ठरलेली नाटके हाताळली, तसेच सुयोग्य व दृष्ट लागेल असा नटसंचही पदरी बाळगला होता. खुद्द शंकररावांच्याबद्दल तर बोलायचे कामच नाही. त्यांनी मराठी रंगभूमीवर जी 'सुभद्रा'

उभी केली, तशी मागे झाली नाही व पुढे होणार नाही. स्त्रीवेषामध्ये ते इतके शोभून दिसत, की हा पुरुष आहे, की स्त्री असा संभ्रम निर्माण होई. मुंबईच्या एका मुक्कामात एका युरोपियन गृहस्थाने ते स्त्रीच असल्याची पैज लावली आणि विंगमध्ये येऊन शंकररावांची छाती चाचपून पाहण्याचे धाडसही त्या वेड्याने केले; ही आठवण शंकररावांचे पुतणे अगदी हसून हसून सांगतात. इतक्या सुंदर अभिनयाला तितक्याच मुलायम, सुरेल, देहभान हरपायला लावील अशा सुंदर-गोड गाण्याची जोड लाभलेली; म्हणूनच सुभद्रेच्या कामात शंकररावांनी आपले एक वेगळेच स्थान निर्माण केले. खुद्द बालगंधर्वही त्या वेळी म्हणायचे, "देवा, तुम्हांला 'सौभद्र' पाहायचे असेल तर आमच्या शंकररावांचं पाहा!" यापेक्षा आणखी दुसरे कोणते प्रशस्तिपत्र हवे? 'किती किती सांगु तुला', 'पुष्पपराग सुगंधित', 'पांडु नृपति जनकजया', 'अरसिक किती हा शेला' या गाण्यांप्रमाणेच 'नका परि हास्य करू मन लाजे', 'बोल हसरे बोल' इत्यादी गाण्यांच्या वेळी त्यांना डझनावारी वन्समोअर पडायचे. शंकरराव शरीराने किंचित ठेंगू असल्यामुळे त्यांना पुरुषवेष शोभणार नाही, असा काहीजणांचा त्या वेळी कयास होता. परंतु धैर्यधराचे कामही त्यांनी इतके भारदस्तपणे केले, की कोल्हापूरच्या श्रीपतराव उपरे यांनी मुद्दाम बनवून दिलेला धैर्यधराचा पोषाख तेथल्या तेथे शंकररावांना बक्षीस म्हणून देऊन टाकला. म्हणून कंपनीच्या 'मानापमान' नाटकात सवाई गंधर्व धैर्यधर व शंकरराव भामिनी किंवा त्या उलट पद्धतीने ते विनदिक्कतपणे काम करीत.

## नटसंच

कंपनीमध्ये गायक नटांत स्वत: श्री. शंकरराव, सवाई गंधर्व, श्री. कृष्णराव गोरे, श्री. गणपतराव देवासकर, श्री. वामनराव सडोलीकर व श्री. नथ्थुबुवा यांचा सुरेख कला-संगम होता. आजचे अव्वल दर्जाचे गवई पं. भीमसेन जोशी यांचे गुरुजी-सवाई गंधर्व-म्हणजे मराठी नाटचसंगीतातील एक अजब चमत्कारच होता. नटवर्य गोरे-कृष्ण, सवाई गंधर्व-अर्जुन, नथ्थुबुवा-नारद व शंकरराव-सुभद्रा, या नटसंचाने सादर केलेले सौभद्र ज्यांनी ज्यांनी पाहिले असेल ते ते धन्य होत! त्यांना आजकालची एकपात्री, द्विपात्री नाटके म्हणजे शुद्ध विडंबन वाटत असल्यास नवल नाही. कृष्णराव गोरे यांना तरतरीत नाक, तेजस्वी डोळे अशा देखण्या स्वरूपाची जन्मजात देणगी लाभल्यामुळे रंगभूमीवर ते अतिशय लोकप्रिय ठरले होते. 'दे हाता शरणागता' या पदात ते जेव्हा मालश्री रागिणीची गुंफण करीत तेव्हा टाळ्यांचा नुसता पाऊस पडत असे. (ते सुरेश हळदणकरांचे गुरुजी होत.) नथ्युबुवा हे तर एक खानदानी गायक. 'संशयकल्लोळ'मधील जलशात त्यांची व सवाई गंधर्वांची जुगलबंदी खूप गाजत असे. श्री. गणपतराव देवासकर हेही एक कंपनीचे उत्कृष्ट गायक. रज्जबअल्लींचे शिष्य. ते मुंबईला असतात. सौ. नलिनी मुळगावकरांचे ते

गुरू आहेत. साधुवेष घेऊन तबलजीसह गावोगाव गात हिंडण्याचा विक्रमही त्यांनी केला होता. ते धैर्यधर, कोदंड, कादंबरी, महाश्वेता इत्यादी कामे अतिशय उत्कृष्ट करीत. शंकररावांना थोडी विश्रांती मिळावी म्हणून वामनराव सडोलीकरांना घेतले होते. परंतु त्यांची उंची जास्त असल्याने स्त्रीवेष त्यांना शोभेनासा झाला. म्हणून शेवटी ते पुरुष-भूमिकाच करू लागले.

विनोदी नट म्हणून कंपनीचे जनरल मॅनेजर श्री. बापूराव पवार यांची खूप प्रसिद्धी होती. लक्ष्मीधर, भादव्या, शकार इत्यादी कामांत त्यांनी नटवर्य गणपतराव बोडस यांच्या खालोखाल मान मिळविला. 'सौभाग्यलक्ष्मी' मध्ये ते कवी होत आणि त्यामुळे 'कैलासवासी कवी' या नावानेच त्यांची ख्याती होती. 'चलती दुनिया'मध्ये ते वेड्याचे काम करीत. "लाजवंती! मारू का धोंडा," या वाक्याला ते हमखास टाळी घेत. या वेड्याच्या वेषामध्ये नाकावर कणकेचे कृत्रिम मोठे नाक बसवीत व प्रेक्षकांना पोट धरून हसवीत. त्यांचा मुद्राभिनय अत्यंत वाखाणण्या-जोगा होता. ते १९६१ साली वारले.

श्री. इंदूरकर खलनायकाच्या भूमिका उत्कृष्ट वठवीत. त्यांचा आवाज टापेचा होता. चेहरा अतिशय निर्घृण आणि रुबाबदार शरीरयष्टी—त्यामुळे खलनायकाची क्रूर मनोवृत्ती दाखविण्यात ते कुणालाही हार गेले नाहीत. गडकऱ्यांनी पुण्यप्रभाव-मध्ये ज्या पद्धतीचा खलनायक रंगविलेला आहे, तसा हुबेहूब तो सादर करण्यात इंदूरकर शंभर टक्के यशस्वी ठरलेले होते.

त्याशिवाय दुय्यम भूमिकांमध्ये गोपाळ जाधव (रुक्मिणी), देवीदास (मैना), निवृत्तीबुवा सरनाईक (तोता) वगैरे मंडळी प्रसिद्ध होती. "होटो पे मुसीकली" हे गीत गात तोता—मैनाची जोडी रंगमंचावर आली रे आली, की प्रेक्षक टाळ्यांच्या कडकडाटाने थिएटर अक्षरशः डोक्यावर घेत असत. वाद्यांच्या साथीला रामभाऊ बेडगकर, राजारामबापू पुरोहित, बाळुभाई रुकडीकर, बाबालाल, भावे, दादा लाडू, खादीय हुसेन खाँसारखी मातबर मंडळी असत.

असा उत्कृष्ट कलाकारांचा त्रिवेणी संगम बनलेली 'यशवंत संगीत नाटक-मंडळी' म्हणजे मराठी रंगदेवतेच्या शिरोमुकुटातील कौस्तुभमण्याप्रमाणे तेजोय-मान होऊन गेली. मृच्छकटिकामध्ये मेघांचा गडगडाट, विजा व अक्षरशः पाऊस असा देखावा कंपनी सादर करीत असे. वऱ्हाड मुक्कामी थंडी फार होती, तेव्हा शंकररावांना सर्दी होऊ नये, या उद्देशाने पाईपमधून गरम पाणी सोडून गरमागरम पाऊस पाडण्याची एकदा सोय केली होती, ही हृद्य आठवण शंकरराव सांगतात.

शंकररावांनी मराठी रसिकांची जेवढी सेवा केली, तितकेच प्रेम रसिकवर्गानेही त्यांना दिले. सोलापूरच्या एका मुक्कामात एक वृद्ध महिला त्यांच्याकडे भाकरी, त्यावर मटनाचे तुकडे व कोळसा घेऊन आली होती. शंकररावांना दृष्ट लागू नये म्हणून तो कोळसा होता. तिची मीठभाकर त्यांनी श्रद्धेने खाल्ली. त्या गरीब

स्त्रीने आपली जन्माची मिळकत (आठशे रु.) बरोबर आणून शंकररावांपुढे ओतली. पुढे पुण्याला आल्यावर शंकररावांनी तिला मुद्दाम बोलावून घेऊन तिचे पैसे परत केले व साडी-चोळीचा आहेर करून तिचा गौरव केला. म्हापशाला एकदा गर्दीमुळे झापाच्या थिएटरमधील गॅलरी कोसळली. दगाफटका झाला नाही व लोकांनी दंगाही केला नाही. लोक तसेच बसून राहिले व पुन: नाटक संपूर्णपणे सादर केले.

या सर्व आठवणी सांगताना शंकरराव आज अंतर्मुख होतात, त्यांना गहिवर येतो. मास्टर दीनानाथ त्यांना म्हणत, "शंकरराव ! मला एकदा तुमच्याबरोबर 'धैर्यधर' व्हायचं आहे ! " या दोन कलावंत-सूर्यांची ही एकच इच्छा दुर्दैवाने सफल झाली नाही ! आज शंकरराव वयोमानाने खूप थकलेले आहेत. 'मधु मागशी माझ्या सख्या परी, मधुघटचि रिकामे असती जरी' या अवस्थेला ते आज पोहोचले असले तरी आशेने त्यांच्याकडे गेलेल्या रसिकाला विन्मुख न पाठविता ते भजनाच्या निमित्ताने एक-दोन अभंग म्हणून दाखवून त्याला रिझवितात. तेवढ्यातही त्यांची तारुण्यातील गायकीची चुणूक अनुभवास येते. ● ● ●



सावकार : हरकत नाही. घरमालक बाहेर गेलेत ना ? मग ते परत येईपर्यंत मी थांबतो. —उषा मयेकर

# जे नव्हते ध्यानी मनी

We never meant to go so far

## या माविस रॉन्सन कृत पुस्तकाचा परिचय

## लेखांक तिसरा

[ तेहरान-काबूल मार्गावर वाटेत मेशेद हे गाव लागते. या गावात बार्बाराला आजारपणामुळे काही दिवस अडकून पडावे लागले... ]

बार्बारा बरी होताच माविसने व तिने नॉर्मनबरोबर काबूलला जाण्याचे ठरवले. नॉर्मनची मैत्रिण कॉनी ही दक्षिण इराण पाहण्यासाठीच एकटी गेली होती व आता ही तिघेच उरली होती.

तिघेजण काबूलच्या बसची वाट पाहत मेशेदच्या स्टॉपवर उभी असतानाच, तिथे दोघे-तिघे अफगाण तरुण आले. गोरेपान आणि लालबुंद असे ते होते. त्याच बसने, काबूलच्या महापौरांची पत्नी प्रवास करीत आहे, असे त्यांनी सांगितले व बसमध्ये चढल्यावर एका बुरख्यात बसलेल्या बोचक्यासारख्या बाईकडे त्यांनी बोट दाखविले. त्या बाईचे नखही माविसला दिसत नव्हते. बुरख्याला डोळ्यांपुढे जी जाळी होती, त्याच्या आत डोळे लुकलुकत होते, यावरून त्या बुरख्यात बाई आहे एवढेच समजत होते. आता बाई म्हटली की तिला काही आकार-रूप असायला हवे ! परंतु बुरख्यांना कसला आला आहे आकार आणि कसले रूप ! सगळ्या सुस्वरूप आणि कुरूप स्त्रियांचा बुरख्यातला आकार एकच-निराकार शरीराकृती !

बसच्या मध्यभागी त्यातल्या त्यात श्रीमंत माणसे वर्तुळाकार बसली होती. त्यांच्यांतच ती मेयरची बायको व मेयर बसलेले होते. गरिबगुरीब बसच्या टपावर सामानावर बसले होते. बस दिवसभर अशीच धावत होती, हिंदकळत-खडखडत.

दुसऱ्या दिवशी हेरत गाव लागले. चंगीजखानाची ही राजधानी. सर्वजण खाली उतरले. बसमध्ये ओळख झालेल्या खलील नावाच्या अफगाण तरुणाबरोबर माविस-बार्बारा व नॉर्मन हेरत गाव पाहण्यासाठी बाहेर पडली.

बाजारात पोरकट धमाल उडाली. जिथे बाईचे बोटदेखील दिसायचे नाही तिथे भर बाजारात हाडामांसाच्या दोन गोऱ्या मुली अगदी आवश्यक अवयवही थोडेसे फाजील उघडे टाकून फिरत होत्या. सगळा बाजार – तमाम अफगाण – चकित मुद्रेने दोघींना माना मोडेपर्यंत पाहत होता.

खलील आज खुषीत होता. चार वर्षे इंग्लंडमध्ये इंजिनिअरिंच्या शिक्षणासाठी त्याने काढली होती. त्याचे लग्न झाले होते, परंतु त्याची निरक्षर पत्नी गेल्या पाच-दहा वर्षांत त्याला भेटलीही नव्हती ! बुरख्यात ती त्याची वाट पाहत होती. तिच्याशी तुलना करता माविस–बार्बाराची ही भेटच त्याला महत्त्वाची वाटत होती. त्याने माविसला विचारले की, "काबूलमध्ये तू अधिक राहणार आहेस का ?" सुदैवाने त्याने हा प्रश्न विचारायला आणि बस कंदाहारकडे निघाल्याची घोषणा होण्यास एकच गाठ पडली. सर्वजण पुन्हा घाईघाईने बसकडे आले. माविसने उत्तर देण्याचे हातोहात टाळले.

तीन दिवसांच्या कंटाळवाण्या प्रवासानंतर एकदाचे कंदाहार आले. कंदाहार शहराजवळ अमेरिकन इंजिनिअर्स एक मोठे धरण बांधीत होते. त्यामुळे कंदाहारची शान जरा पालटली होती. तिथे छानदार आलिशान हॉटेल होते ! माविस, बार्बारा व नॉर्मन अशी तिघे हॉटेलात उतरली. नॉर्मनने आग्रह धरला, की तिघांनी एकाच खोलीत राहावे ! माविस भडकली. आतापर्यंत सभ्यासारखा वागलेला हा अमेरिकन दोस्त – त्याची मैत्रीण कॉनी जरा काही काळ दूर होताच असभ्य सूचना करू लागला होता. माविसने नॉर्मनशी चांगले भांडण केले व नॉर्मनने त्या दोघांशी बोलणे सोडले व ती खोलीही सोडली.

कंदाहारमध्ये एकच दिवस बस थांबणार होती, परंतु दोघींना लगेच प्रवास चालू करण्याची इच्छा नव्हती. शिवाय नॉर्मनला कटवण्याचा तोच एक मार्ग होता.

दुसऱ्या दिवशी नॉर्मन व इतर उतारू घेऊन बस काबूलकडे निघून गेली. माविस व बार्बारा दोघीच पुन्हा मागे राहिल्या. दोन दिवस त्यांनी कंदाहारलाच काढले. दोन दिवसांनी एक मोटरगाडी हॉटेलपाशी थांबली. त्यात दोन दाढी वाढवलेले ऑस्ट्रेलियन्स प्रवास करीत होते. या दोघींना त्यांनी काबूलला नेण्याचे कबूल केले. प्रवास बराच होता. त्यांचा थोडाफार स्वयंपाक व कपडे धुणे ही कामे दोघींनी पत्करली ......व अखेर दोघी काबूलला पोचल्या.

## कामधंदा

घर सोडून आता ४ महिने झाले होते. प्रवासाचा कंटाळा आलेला होता. दोघींना ज्यांनी काबूलपर्यंत आणले ते ऑस्ट्रेलियन प्रवासी त्यांना आपल्या मोटारीतून सिलोनपर्यंत नेण्यास तयार होते. परंतु बार्बारा गेले पंधरा दिवस आजारी होती, म्हणून माविसने ठरवले की काही दिवस अफगाणिस्तानातच काढावयाचे. सुदैवाने त्यांचा मित्र झालेला खलील त्यांचा शोध काढीत हॉटेलात अवतीर्ण झाला.

दोघी कामधंद्याच्या शोधात आता होत्या. नोकरी नव्हती तोपर्यंत स्वस्त हॉटेलही परवडण्यासारखे नव्हते. एका जपानी व्यापाऱ्याने, बायकोला इंग्रजी शिकविण्याच्या अटीवर दोघींना घरातली एक खोली राहावयास दिली व राहण्याचा प्रश्न सुटला. नोकऱ्या मिळणे तितके सोपे नव्हते, परंतु बार्बाराला एका इटालियन फर्ममध्ये

सेक्रेटरीची नोकरी मिळाली. काबूलमधला सर्वसाधारण पगार महिना सुमारे ७५ रुपये होता व त्यामानाने बार्बाराला जवळजवळ ६०० रुपये पगार मिळणार होता. तो खूपच होता. माविसला पण क्लार्कची नोकरी मिळाली. तिच्या फोटोग्राफीच्या छंदाचा तिथे काहीच उपयोग नव्हता. कामाच्या वेळा सकाळी ८–३० ते सायंकाळी ६ अशा होत्या व कारकुनांना साधारणत: महिना सुमारे २५० रुपये मिळत असे. ऑफिसात माविस खूप बडबडत असे. त्यात अफगाणी स्त्रियांना शिक्षण हवे, स्वातंत्र्य हवे, बुरखे नकोत असे ती तावातावाने सांगत असे. एके दिवशी तिच्या अधिकाऱ्याने तिला बोलावून सांगितले, "बाई, जरा कमी बडबड कर! उगाच मागे सरकारी लफडे लागेल."

ऑफिसात जायला बस होती. नुकतीच रशियातून आणलेली ती बस खास अफगाणी लोकांसाठीच बनविलेली होती. ड्रायव्हर बसतो त्याच्याशेजारी काचेचे पार्टिशन होते. थोड्याफार पुढारलेल्या ज्या कोणी मुलीबाळी ऑफिसात जाण्यासाठी बसमध्ये बसत, त्यांच्यासाठी ती जागा होती. अर्थात् त्यांचा चेहराच काय, पण कंडक्टरला हात दिसणेही मुष्किल असे. पहिल्या दिवशी माविस व बार्बारा बसमध्ये चढल्या आणि बार्बारा एका पुरुषाशेजारी जाऊन चक्क बसली! बार्बाराशेजारचा तो अफगाण पुरुष दचकून ताडकन जागेवरून उडालाच. कंडक्टरने मग दोघींना त्या काचेच्या पार्टिशनआड नेऊन बसविले.

आता अधूनमधून त्या दोघी एखाद्या ओळखीच्या अफगाण कुटुंबात जेवणासाठी जाऊ लागल्या. एकदा खलीलने त्यांना आपल्या मित्राकडे भोजनासाठी नेले. त्या घरी यजमानीणबाई त्यांच्याबरोबर जेवायला बसलेली बघून माविसला आश्चर्य वाटले. तिने आश्चर्य प्रदर्शित करताच खलीलने खुलासा केला, "माझ्या मित्राच्या दोन बायका आहेत. एक आत स्वयंपाक करते आहे ती जुन्या वळणाची आहे. ही थोडी आधुनिक आहे. माझा मित्र आठवड्यातून पाच दिवस हिच्या खोलीत घालवतो व दोन रात्री पहिल्या बायकोबरोबर—"

खलीललाही जरा आधुनिक अशा आणखी एका बायकोची फार गरज वाटत होती. परंतु कारकुनी पगारात दोघींचे पोट कसे भरणार म्हणून तो स्वस्थ होता.

### अटक व सुटका

कुणीही चांगली ओळख होताच जेवायला बोलवावे, अशा माविस व बार्बारा या दोनच तरुण मुली काबुलात त्या वेळी असाव्यात. कारण, त्यांच्याशी ओळख करून घेणाऱ्यांची संख्या फुगू लागली. योग्य ते अंतर राखून दोघी काळ काढीत होत्या. शेवटी व्हायचा तो गोंधळ झालाच. काबूलच्या पोलिस सुपरिंटेंडेंटचे लक्ष दोघींकडे गेले. त्याने माविसला नाताळच्या अखेरच्या रात्री एकटीलाच भेटीसाठी निमंत्रण दिले. माविसने ते अर्थात् नाकारले...... तेव्हा दुसऱ्या दिवशी त्याने बार्बाराला अटक केली.

बार्बाराला पकडल्याचे पाहून त्याची भेट घेऊन त्याबद्दल विचारणा करणे माविसला भाग पडले. तेव्हा तो चिडलेला पोलिस अधिकारी त्यांना वाटेल ते बोलू लागला. काबूलच्या अफगाण तरुणांना इस्लाम धर्माविरुद्ध तुम्ही दारू प्यायला शिकवता....तेव्हा ताबडतोब काबुलातून चालत्या व्हा, अशी धमकी त्याने दिली. कोल्ह्याला द्राक्षे आंबट असण्याचा हा नवा शोध लागत आहे हे दोघींनी ओळखले.

पुढे कुठे जायचे हे कुठे नक्की होते ? बार्बाराला वाटत होते की, आता परत फिरावे. झाला एवढा प्रवास पुष्कळ झाला. माविसला ते पटत नव्हते. अफगाणिस्तानापर्यंत आलो आणि आता भारत न पाहता परत जाणे तिला पटत नव्हते. दोघींचा यामुळे थोडासा खटका उडाला व अखेर बार्बारा भारतात माविसबरोबर यायला तयार झाली.

काबूल–कराची प्रवास त्यांनी पार पाडला व दोघी दिल्लीच्या गाडीत बसल्या. बायकांच्या डब्यात त्याच गाडीने प्रवास करणाऱ्या सरला वर्मा नावाच्या त्यांच्याच वयाच्या मुलीशी त्यांची ओळख झाली. ओळख होताच सरलाने त्यांना सांगितले,

" दिल्लीला तुम्ही हॉटेलातच उतरणार ना ? मग आमच्या घरी उतरा. "

प्रवासात अगदी पहिल्याप्रथम दोघींना आतिथ्याचा अनुभव आला. भारतात त्यांनी जे वर्ष घालवले त्या सबंध वर्षात असेच आतिथ्य त्यांनी अनुभविले.

दोघी दिल्लीला वर्मा कुटुंबात उतरल्या. घरात शिरताक्षणीच सरलाच्या वडिलांनी व भावाने त्यांना– " हे आपलेच घर समजून पुष्कळ दिवस राहा—" असा आग्रह केला. कुणी असे सांगितले तरी फार दिवस राहायचे नसते, ही गोष्ट माविसला माहीत होती. परंतु पुरते २४ तास उलटण्यापूर्वी माविसला हे घर खरोखरच आपले वाटू लागले.

श्री. वर्मा यांनी दोघींना भेटण्यासाठी दिल्लीतल्या प्रमुख वृत्तपत्रप्रतिनिधींना घरी चहासाठी बोलाविले. वीसएक पत्रकार घरी जमले व दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांतून त्यांच्या प्रवासी जीवनाचे काही किस्से, त्यांच्या छब्यांसह प्रसिद्ध झाले. त्यामुळे एकदम त्यांना दिल्लीत अनेकजण ओळखू लागले. २६ जानेवारीची स्वातंत्र्यदिनाची परेड पाहण्याकरता वर्मांनी कार्यक्रम आखला. घरातील सगळी मंडळी व या पाहुण्या परेड पाहण्यासाठी जाणार होत्या. घरातल्या सर्व माणसांचे एकत्र कार्यक्रम वारंवार कसे काय ठरवले जातात, याचे आश्चर्य दोघींना फार वाटले. कारण त्यांच्या घरात प्रत्येकाचे कार्यक्रम बहुधा स्वतंत्र असत. अखेर सर्वांचे आटोपेपर्यंत निघायला इतका उशीर झाला, की रस्त्यावरील प्रचंड गर्दीत, आठ-आठ, दहा-दहा मुंडक्यांतून फक्त उंटांच्या माना आणि हत्तींवरचे माहूत पाहून वर्मा आणि मंडळी घरी परतली.

[ पुढील अंकी चालू ]

**रा. म. शास्त्री**

# ज्ञा न वि ज्ञा न

## □ रशियातील स्पेलिंग सुधारणेचा वाद

रशियन भाषेच्या स्पेलिंग पद्धतीत काही सुधारणा करावी काय याचा विचार करण्यासाठी रशियात एक कमिशन नेमण्यात आले होते. पण कोणतीही सुधारणा करावयाची नाही असे रशियाच्या सूत्रधारांनी ठरविले आहे. ही सुधारणा झाली असती तर 'कंम्युनिस्ट' शब्दाच्या स्पेलिंगमधील दोन 'एम्'पैकी एक एम् गेला असता. सर्व बाबतींत स्वतःला क्रांतिकारक समजणाऱ्या रशियन नेत्यांनी स्पेलिंग सुधारणेच्या बाबतींतच सोवळेपणा व सनातनीपणा दाखवावा याचे आश्चर्य वाटते.

स्पेलिंग सुधारणेचा आराखडा क्रुश्चेव्ह यांच्या राजकीय अस्तापूर्वी वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यावर वृत्तपत्रांत बरीच कडाक्याची चर्चा झाली. एका बाजूला लेखक आणि दुसऱ्या बाजूस भाषातज्ज्ञ व भाषाशिक्षक असे दोन तट या प्रश्नावर पडले असल्याचे दिसून आले. लेखकांचा स्पेलिंग सुधारणेस विरोध होता तर भाषातज्ज्ञांनी त्यास पाठिंबा दिला. रशियन स्पेलिंगमध्ये कोणतीही सुसंगती किंवा तर्कसंगती नाही हा स्पेलिंग सुधारकांचा मुख्य मुद्दा होता. परंपरावाद्यांचे त्यावर उत्तर असे की, नव्या पद्धतीत तरी कोठे सुसंगती आहे ? परंपराप्रिय इंग्रजसुद्धा स्पेलिंग सुधारणेचा विचार करू लागले आहेत असे सुधारकांचे म्हणणे; तर त्याला उत्तर म्हणून परंपरावाद्यांनी एका इंग्रज नागरिकाच्याच उद्गारांचा आधार दिला. "सबंध राष्ट्राच्या, लाखो लोकांच्या सवयीत बदल घडवून आणताना त्यातून खरोखरच एखादी सामाजिक गरज भागणार असेल तरच हा बदल करावा," असे या इंग्रजाने म्हटले होते. स्पेलिंगचे जुने नियम शिकण्यात विद्यार्थ्यांचा जो वेळ जातो, त्याचा अधिक चांगल्या रीतीने उपयोग करता येईल, असे शिक्षकांनी प्रतिपादले तर त्यास उत्तर देताना एरिएट्टा शांगिनयान या लेखिकेने आपला स्वतःचा अनुभव सांगितला. ती म्हणाली, "क्रांतिपूर्वी रशियन स्पेलिंग फारच कठीण व गुंतागुंतीचे होते. पण त्या वेळी शाळेतून बाहेर पडणारी मुले आजच्या शालेय मुलांपेक्षा अधिक शिक्षित होती."

रशियन वृत्तपत्रांत या विषयावर बरेच दिवसांत अशी खुली चर्चा झाली नव्हती. एक महिन्यानंतर या विषयावरचा पत्रव्यवहार बंद करण्यात आला. त्यानंतर गेल्या चार–पाच महिन्यांत या विषयावर वृत्तपत्रांत काहीही प्रसिद्ध झालेले नाही.

"अखेर ही सुधारणा स्वीकारण्यात आली नाही, हे सुदैव आहे." एवढाच उल्लेख करणारे एका भाषातज्ज्ञाचे मत एका रशियन मासिकात नुकतेच प्रसिद्ध झाले.

## □ अमेरिकन संशोधनातील उणिवा

समाजशास्त्रीय संशोधनात अमेरिकन पद्धती आदर्श मानून त्यांचे अनुकरण व अवलंब इतर देशांत केला जात आहे. अमेरिकन संशोधनांत पाहणीवर भर असतो. या पाहणी-पद्धतीतील काही महत्त्वाच्या उणिवांकडे कॅलिफोर्निया विद्यापीठातील समाजशास्त्राचे प्राध्यापक विल्यम पिटर्सन यांनी 'न्यू सोसायटी' साप्ताहिकातील एका लेखात लक्ष वेधले आहे. पाहणीसाठी जो विषय निवडलेला असतो, त्याची ज्यांना काही माहिती नाही अशा विद्यार्थ्यांकडून हे पाहणीचे काम अनेकदा करून घेतले जाते. कित्येकदा पाहणीमागचा खरा उद्देशही लपवून ठेवण्यात येतो. जी माहिती जमविली तीच सदोष व अनेक दृष्टींनी अपुरी असल्याने त्यावर आधारलेले निष्कर्षही चुकीचे असतात.

दक्षिण अमेरिकेतील अंतर्गत उठावासंबंधी एक पाहणी 'प्रोजेक्ट कॅमेलॉट' या नावाने हाती घेण्यात आली. या पाहणीच्या सुरुवातीच्या खर्चासाठी अमेरिकन लष्कराने ६० लाख डॉलर्स दिले. चिलीमधील समाजशास्त्रज्ञांना या पाहणीशी सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली, पण तसे करताना, ही केवळ शैक्षणिक पाहणी आहे असे भासवून अमेरिकन लष्कराच्या पुढाकाराने ती हाती घेण्यात आली आहे ही वस्तुस्थिती लपवून ठेवण्यात आली. अमेरिकन हेरगिरीच्या योजनेत एक साधन म्हणून आपला उपयोग केला जात आहे, असे चिलीच्या शास्त्रज्ञांना वाटू लागले आणि ही पाहणी चालू असतानाच सान्तो डोमिंगोमध्ये अमेरिकेने हस्तक्षेप केल्याच्या बातम्या आल्याने ही शंका अधिकच बळावली. अखेर चिलीच्या अध्यक्षांनी अमेरिकन वकिलातीकडे निषेध प्रदर्शित केला आणि ती पाहणीच रद्द झाली. याचा परिणाम संबंध दक्षिण अमेरिकेत जाणवला. चिलीमध्ये तर सध्या अमेरिकेच्या पाठिंब्याने एकही पाहणी चालू नाही आणि इतर देशांतील अमेरिकन संशोधनाची प्रगती कुंठित झाली आहे.

### उघड गोष्टींची पाहणी कशासाठी?


ज्या गोष्टी उघड आहेत त्यांसाठी पाहणीची काय आवश्यकता? पण अमेरिकेत अशा गोष्टींचीही पाहणी केली जाते आणि ही पाहणी विचारलेल्या प्रश्नांना मिळालेल्या उत्तरांवर मुख्यतः आधारलेली असते. कैद्यांना सुधारण्यासाठी तुरुंग व पॅरोल पद्धतीचा कितपत उपयोग होतो हा प्रश्न कैद्यांनाच विचारला तर ते त्याची होकारार्थी उत्तरे देणार हे उघड आहे. पण या विषयावर सतरा अमेरिकन

संशोधकांनी चार वर्षे संशोधन केले व त्यासाठी अडीच लाख डॉलर्स खर्च केले. त्यातून निष्कर्ष काय निघाला, तर बहुसंख्य कैदी धार्मिक वृत्तीकडे वळण्याच्या प्रयत्न करतात व फक्त एक टक्का कैद्यांना तुरुंग म्हणजे आणखी यशस्वी गुन्हे कसे करावे, याचे शिक्षण देणारी शाळा वाटते.

## अपुरी माहिती, चुकीचे निष्कर्ष

'अनोळखी माणसापुढे फक्त आपले एक–तृतीयांश मत व्यक्त करणे चांगले,' अशी एक चिनी म्हण आहे. लोकांकडून खरी व पूर्ण माहिती कशी मिळवायची हा संशोधकांपुढे मोठा प्रश्न असतो. माहिती गोळा करण्याचे काम अमेरिकेत मुख्यतः पूर्ण वेळ किंवा अर्ध वेळ काम करणाऱ्या मध्यमवर्गीय गृहिणी करतात. एखाद्या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी आपल्या संस्थेच्या कार्यासंबंधी पाहणी करून काही माहिती जमा केली असली तर या अपुऱ्या माहितीचेच विश्लेषण करून पीएच्. डी. पदवी मिळविणे अमेरिकेत शक्य असते. यांत्रिक गणकांच्या साहाय्याने वर्गीकरणाचे काम फार सोपे झालेले आहे. पण वर्गीकरणासाठी या यंत्रात तुम्ही जी माहिती घालाल ती काय दर्जाची आहे हा खरा प्रश्न आहे. श्री. एन्. के. सरकार आणि एस. जे. तांबय्या यांनी सिलोनमधील काही खेड्यांची पाहणी करून एक अहवाल तयार केला.

त्यांनी ज्या शेतांची पाहणी केली त्यांत दर एकरी जादा उत्पन्नाचे व कमी उत्पन्नाचे असे स्पष्ट दोन भाग पडल्याचे त्यांना दिसून आले. पण पाहणीत या प्रदेशाच्या माहितीच्या अभावी एक महत्त्वाची गोष्ट या संशोधकांच्या हातून विसरली होती. दर एकरी उत्पादनात जो फरक पडला त्याचे एक कारण दोन्ही भागांत एकराच्या आकारातच फरक होता. ज्या भागात कमी उत्पादन झाले तेथील एकरापेक्षा जेथे जास्त उत्पादन झाले तेथील एकराचा आकार दीडपट मोठा होता. जमीनच जास्त त्यामुळे पीक जास्त असा हा सरळ साधा हिशेब होता. वरील संशोधकांपेक्षा जास्त काळ त्या भागात राहिलेले आणि याच विषयावर संशोधन करणारे डॉ. लीच यांनी या अहवालावर लिहिलेल्या टीकेत ही चूक निदर्शनास आणली.



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

**● येथे थापा मिळतील !**

नवऱ्यांचा जन्मच वाईट. आधी त्यांना बायकोची छानछोक पुरवण्यासाठी घाम गाळून पैसे कमवावे लागतात. (ऑफिस एअर-कन्डिशन्ड नसले किंवा पंखा मोडला असला तर चांगलाच घाम गळतो.) त्यातून बायकांची जात महासंशयी. एखादे दिवशी टायपिस्ट किशोरी करमरकरला फॅमिली रूममध्ये चहा पाजण्यात ( पोरगी भलतीच स्वीट आहे ! ) थोडा जास्त वेळ गेल्यामुळे घरी उशिरा येऊन " ऑफिसात फार काम होते, " असे म्हटले तर बायको डोळे वटारून " खरं बोला, त्या स्टेनो सटवीशी, मॉली डिसूझाशी–गुलगुल गोष्टी करीत होतात की नाही ?" असा धडधडीत खोटा आरोप करणार ! बरे, 'सत्यमेव जयते' या राष्ट्रीय बाण्याला अनुसरून " मी आज मॉली डिसूझाशी मुळीच गप्पा मारल्या नाहीत " ( स्वगत–कारण, ती ऑफिसात आली नव्हती. ) असे त्रिवार म्हटले तरी बायकोचा अनाठायी संशय कायम तो कायमच. म्हणून म्हणतो, नवऱ्यांचा जन्मच वाईट.

सुदैवाने सुधारलेले पाश्चिमात्य नवरे पददलित हिंदुस्थानी नवऱ्यांसारखे हातपाय गाळून कबुलीजबाब देऊ लागलेले नाहीत. उलट, पश्चिम बर्लिनमधल्या कल्पक नवऱ्यांनी एक 'थापा मारणारे यंत्र' तयार केले असून ते एका उपाहारगृहात बसवले आहे. त्या यंत्रावर ऑफिस, दुकान, गॅरेज, रेल्वे स्टेशन, विमानतळ इत्यादी निरनिराळ्या २१ ठिकाणी साधारणपणे ऐकू येणारे आवाज ध्वनिमुद्रित केले असून यंत्र टेलिफोनला जोडले आहे. समजा, टेलिफोनवर बायकोला सांगायचे असले की, " बॉसला पोचवायला एअरपोर्टवर आलोय्, जरा उशीर होईल. " तर थाप खोटी वाटायला नको–कारण 'विमानतळ' नावाचे बटन दाबले की बायकोला टेलिफोनवर विमानांचा आवाज ऐकू येईल ! आहे की नाही एकदम अफलातून आयडिया ? आता बर्लिनमधला प्रत्येक सत्यप्रिय नवरा ( म्हणजे आपली थाप बायकोला सत्य वाटणे हे ज्याला प्रिय आहे ) या थापेबाज यंत्राची कास धरणार हे उघड आहे. या हॉटेलचा धंदाही आता खाण्यापिण्याचे पदार्थ विकण्यापेक्षा थापा विकण्यावरच अधिक चालणार. " आज मेन्यू काय आहे ?" असे वेटरला विचारल्यावर पहिले उत्तर " लोणकढी थाप " असे मिळणार.

दुर्दैवाने हिंदुस्थानात अजून पुरेशी यांत्रिक प्रगती झाली नसल्याने "येथे गॅरंटीड थापा मिळतील. बायको न फसल्यास पैसे परत!" अशी पाटी सध्या तरी कुठे दिसण्याची आशा नाही. आणि पुढे मागे थापा मारणारे भारतीय यंत्र तयार झाले तरी त्या थापाही भारतीयच असतील, अशी काळजी घ्यावी लागेल. उदाहरणार्थ, एअरपोर्टची थाप हवी असेल तर पायलट आणि एअर-होस्टेस जोरजोराने भांडत आहेत असा आवाज हवा. रेल्वे स्टेशनची थाप हवी असेल तर "सरदारजी, जरा हमारा भांडेका पोता कोपरेमें ठेवने देव," असे एखादे वाक्य घालावे लागेल अन् ऑफिसातच मान मोडून बिच्चारा काम करतोय् अशी थाप हवी असेल तर "अग नलू, ती टू-वाय-टूची वायल मफतलालकडे आलीय् ती पाहिलीस का?" "अय्या, सुशे, कित्ती छाऽऽन आहे नाही? मी बाई पगार झाल्याबरोबर दोन वायली घेणार......" अशी कामसू कारकुनिकांची ऐकवावी लागणार.-सबूर! ही थाप निराळ्याच अर्थाने अंगाशी यायची. घरी आल्याबरोबर बायको म्हणायची, "मला पण टू-वाय्-टूच्या दोन वायली हव्यात!" एकूण तात्पर्य काय, खरे बोलणेच जास्त स्वस्त पडायचे!

## ● पैसे पचविणारी प्रकृती

अन्नटंचाईच्या हल्लीच्या काळात बऱ्याच लोकांना पैसे खाऊन गुजराण करावी लागते. सुदैवाने त्यांची प्रकृती चांगली असल्याने खाल्लेले पैसे त्यांना पचतातही. पण एखादा यःकश्चित् पक्षी-प्राणी या बाबतीत मानवाचे अनुकरण करू लागला तर त्याचा कसा पाठ लागणार? परवा दक्षिण अमेरिकेतल्या एका प्राणिसंग्रहालयातले एक शहामृग म्हणे फार पैसे खाल्ल्याने मेले! डॉक्टरांना त्याच्या पोटात शंभरावर नाणी सापडली. पाहिलेत! पैशासारखे 'रिच् फूड' पचवणे येऱ्यागवाळ्याचे काम नाही याला आणखी दुसरा पुरावा कुठला हवा? शरीरमाद्यम् खलु अर्थसाधनम्! शिवाय एकही एक्स्पोर्ट-इम्पोर्ट-लायसेन्स मिळविण्याचा अनुभव नसताना, किंवा सरकारी बांधकाम-खात्याचे एकही कॉन्ट्रॅक्ट दिले-घेतले नसताना, इतकेच काय पण सचिवालयात एखादी फाईल चिरीमिरीसाठी कशी अडकवून ठेवावी याचे यत्किंचितही ज्ञान नसताना या दीडशहाण्या शहामृगाने इतके पैसे खाण्याचे धाडस केलेच कसे?

असो, झाले ते झाले. आता उरलेल्या शहामृगांना तरी माझे कळकळीचे सांगणे आहे की, पैसे पचवायचे असतील तर कम्पल्सरी ट्रेनिंग म्हणून काही काळ हिंदुस्थानात सरकारी नोकरी करून जा. मग तुम्हांला अभय आहे.

●

# चित्रपट

संकलन आणि लेखन
शरद गोखले

## १ : शरद गोज टू इन्स्टिटयूट

पुण्याच्या 'फिल्म इन्स्टिटयूट ऑफ इंडिया' या संस्थेच्या वार्षिक दिनाचे निमित्ताने विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या निवडक कलाकृती पाहण्याचा योग आला. पाच व दहा मिनिटांचे सुमारे पंधरा चित्रपट दाखविण्यात आले. त्यांपैकी तिसऱ्या वर्षाचा विद्यार्थी श्री. टी. के. तिवारी याने तयार केलेले, 'मेरी गो राऊंड' हे चित्र त्याच्या वेगळेपणाने नजरेत भरले. प्रारंभी चित्र जरी असंबद्ध वाटले तरी लवकरच दिग्दर्शकाचा हेतू स्पष्ट होतो. एक छोटी छोकरी होडीतून उड्या मारीत जात आहे. दुसऱ्या ठिकाणी नवीन बालक जन्मास येते आहे, तर तिसरीकडे प्रेतयात्रेची तयारी चालू आहे. ही विविध दृश्ये जलद गतीने दाखविण्यात आली आहेत. अधूनमधून 'मेरी गो राउंड'च्या दृश्यांचा चांगला वापर केला आहे. संकलनाची आवश्यक ती गती राखली गेल्याने चित्राला जरूर असणारा ऱ्हिदम् पकडण्यात संकलन विद्यार्थी श्री. शुक्ला यशस्वी झाले आहेत. जन्म-मृत्यूच्या दृश्यांचे पॅरलल कटिंग चांगले साधले आहे. श्री. तिवारी यांच्या चित्राला निश्चित कथाविषय नाही. तरीही केवळ दहा मिनिटांच्या अवधीमध्ये मानवी जीवनाचे रहाटगाडगे दाखविण्यात ते यशस्वी झाले आहेत. प्रेक्षकांच्या मनामध्ये आवश्यक ती चलबिचल निर्माण होते.

तृतीय वर्षाचेच दिग्दर्शक-विद्यार्थी श्री. आर. राजू यांनी 'डेक्कन-क्वीन'. दहा मिनिटांचा अनुबोधपट तयार केला आहे. या गाडीचा पुणे ते मुंबई व पुन्हा परतीचा प्रवास हाच श्री. राजू यांच्या चित्राचा विषय आहे. 'डेक्कन-क्वीन'च्या प्रवाशांची धावपळ, गाडीमध्ये आढळणारे विविध प्रवासी, पास होल्डर्सची वैशिष्टये या सर्व गोष्टींबरोबरच घाटातील निसर्गसौंदर्याचेही सुरेख चित्रीकरण करण्यात आले आहे. गाडीच्या गतीनेच चित्रे सरकत असल्याने निर्माण होणाऱ्या विशिष्ट लयबद्धतेत प्रेक्षक रमून जातो. फिल्म्स् डिव्हिजनचे प्रख्यात निवेदक बर्कले हील यांचे उत्कृष्ट निवेदन दख्खन राणीचा दिमाख वाढवते. कथाविषयावर दिग्दर्शकाचा मुळीच ताबा नसल्याने हे चित्र निर्माण करताना अनेक अडचणी निर्माण होणे स्वाभाविक आहे. या अडचणीवर मात करण्यात दिग्दर्शक श्री. राजू बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले आहेत.

## नावंदरांचा ‘ शामबाबू ’

दाखविण्यात आलेल्या सर्व चित्रपटांमध्ये ‘ शामबाबू गोज् टू बॉम्बे ’ हे चित्र सर्वोत्कृष्ट वाटले. द्वितीय वर्षाचे विद्यार्थी श्री. मोतीलाल नावंदर यांनी ते दिग्दर्शित केले होते.

एका छोट्या खेड्यातील शामबाबू नावाचा गृहस्थ काही कामासाठी मुंबईस जाणार असतो. या गोष्टीचा सुगावा गावकऱ्यांना लागताच त्यांची शामबाबूकडे रीघ लागते. कोणी फोनो दुरुस्तीसाठी आणतो तर कोणी तंबोरा. या गडबडीमध्य सामानाचा बोजा वाढतो. सर्व सामानाचा बोजा घेऊन शामबाबू टांग्यात बसतात. पण ओझ्याखाली दबलेले घोडे एक पाऊल पुढे टाकत नाही. टांगेवाल्याची स्वारी खाली उतरते व घोड्याला चुचकारत पुढे नेऊ लागते. एवढेच कथेचे शेपूट. पाच मिनिटांच्या मर्यादेत आणखी काय अपेक्षा करणार-!

संयम राखून विनोदनिर्मिती, अचूक कॅमेरा प्लेसमेन्ट व कलाकारांची उत्कृष्ट हाताळणी, यांमुळे चित्राची रंजकता वाढली आहे.

एकूण पंधरा चित्रपट दाखविण्यात आले. त्यांपैकी वरील तीन पुष्कळच समाधानकारक होते. अन्य चित्रपटांची तांत्रिक अंगे समाधानकारक होती. पण कथाविषयांची निवड, विद्यार्थी-कलावंतांच्या भूमिका व दिग्दर्शन या दृष्टिकोनातून बहुसंख्य चित्रपट गचाळ वाटले.

सर्व चित्रपटांमध्ये चांगल्या वाटलेल्या ‘ शामबाबू गोज् टू बॉम्बे ’ या चित्रपटाचे दिग्दर्शक श्री. मोतीलाल नावंदर यांनी प्रत्यक्ष भेटीत आणखी काही विचार व्यक्त केले.

‘ शामबाबू गोज् टू बॉम्बे ’ या छोट्या चित्राची संपूर्ण तयारी झाल्यावरच चित्रीकरणास सुरुवात करण्यात आली. खोलीतील विविध वस्तूंची मांडणी, कॅमेऱ्याची जागा, कलाकारांच्या हालचाली या प्रत्येक बाबतीत निश्चित योजना होत्या. मात्र मूळ कल्पना जास्त चांगल्या प्रकारे पडद्यावर साकार होईल असा विश्वास वाटला तरच ऐन वेळी काही बदल करण्यात आले.

चित्रपटाचा दिग्दर्शक हीच चित्रपटामागील जिवंत प्रेरणा असल्याने चित्रपटाच्या संकलन, कॅमेरा, साउंड या सर्व तांत्रिक बाजूंचे ज्ञान त्यास असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर साहित्य व Visual Art चाही दांडगा अभ्यास हवा. त्यामुळेच पडद्यावर आपणास काय हवे याची निश्चित कल्पना दिग्दर्शकास येते.

समाजाच्या सर्व थरांतील व्यक्तींशी दिग्दर्शकाचा सतत संबंध असावा. पात्रांसाठी प्रसंग निर्माण करण्यापेक्षा पात्रांना त्यांच्या वास्तव जीवनात वावरत ठेवूनच जर प्रसंग टिपता आले तर ते अत्यंत परिणामकारक होतात. एखाद्या विशिष्ट प्रकारची व्यक्तिरेखा पडद्यावर साकार करण्यापूर्वी त्या व्यक्तिरेखेची असंख्य वैशिष्टये जागरूकतेने न्याहाळणे जरूर असते.

ओ. नावंदर यांच्या व्यक्तिगत ग्रंथसंग्रहामध्ये चित्रपटांच्या तांत्रिक बाजूंची माहिती देणारी विविध पुस्तके आहेत. त्याखेरीज देगास, सेझान, पिकॅसो, मॅनेटा, इ. मान्यवरांच्या दुर्मिळ कलाकृतीही आहेत. श्री. नावंदर जन्माने मारवाडी आहेत. पण महाराष्ट्रात दीर्घकाळ वास्तव्य केल्यामुळे मराठी जीवनाचे त्यांचे अवलोकन सूक्ष्म आहे.

फिल्म इन्स्टिटयूटचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर उत्कृष्ट मराठी कथा निवडून सहकारी तत्त्वावर चित्रनिर्मिती करण्याचा त्यांचा विचार आहे.


**संस्थेतील शिक्षणपद्धती ......**

विद्यार्थ्यांनी निर्माण केलेल्या या चित्रपटांचे संदर्भात थोडी अन्य माहितीही देणे उचित ठरेल.

दुसऱ्या वर्षाचे पटकथा-लेखनाचे विद्यार्थ्यांना आपल्या चित्राची कथा आपण स्वत: लिहावी लागते. कथाविषयाची मूळ कल्पना प्राध्यापकांकडून मंजूर झाल्या-वर हाताळणीचे दृष्टीने त्याची मांडणी (ट्रीटमेंट) करण्यात येते व त्या आधारे शुटिंग स्क्रिप्ट तयार करण्यात येते. याच वेळी चित्र निर्मितीच्या इतर खात्यांतील एक एक विद्यार्थ्याची निवड करण्यात येऊन एक गट (unit) तयार करण्यात येतो. दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांची चित्रे ही या गटाची म्हणून ओळखली जातात ( तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चित्रांना स्वतंत्र श्रेय नामावली असते. ) एकदा हा 'गट' तयार करण्यात आला, की दिग्दर्शक–विद्यार्थ्याने तयार केलेल्या पटकथेवर चर्चा-सत्रे (Script Conferances) सुरू होतात. ही चर्चा–सत्रे अत्यंत महत्त्वपूर्ण असतात. या चर्चा–सत्रांमध्ये संबंधित प्राध्यापक, मुद्दाम बोलावलेले मान्यवर पाहुणे, संकलन करणारा, कॅमेऱ्याची जबाबदारी असणारा व ध्वनिमुद्रण करणारा विद्यार्थी सहभागी होतो. सर्वांचे शंकानिरसन झाल्यावर चित्रपट सेटवर जातो. दुसऱ्या वर्षाचे विद्यार्थ्यांना १५०० फूट फिल्म दिली जाते. संकलनानंतर त्यांचे चित्रांची लांबी केवळ ५००फूट ठेवण्यात येते. तिसऱ्या वर्षातील विद्यार्थ्याला चार हजार फूट फिल्म दिली जाते व संकलनानंतर एक हजार फुटाचे एकच रीळ ठेवण्यात येते. याखेरीज तृतीय वर्षाचे चित्रपटांना Re-reco-rding ची सोय असते. म्हणजेच संगीत, प्रासंगिक आवाज (incidental sound) इत्यादी अंगांची जोड देऊन ही चित्रे जास्तीत जास्त परिपूर्ण करण्यात येतात. या सर्व चित्रांना 'Exercise films' म्हणतात.

**पदवीधर पण बेकार**

फिल्म इन्स्टिटयूट ऑफ इंडिया ही भारत सरकारतर्फे चालवण्यात येणारी संस्था आहे. चित्रनिर्मितीच्या विविध तांत्रिक अंगांचे परिपूर्ण शिक्षण येथे देण्यात येते. अशा स्वरूपाची संपूर्ण आशियातील ही एकमेव संस्था आहे. मान्यवर पाश्चात्त्य तज्ज्ञांनीही या संस्थेस उत्कृष्ट दर्जाबद्दल प्रशस्ती-पत्रक दिलेले आहे. या संस्थेचा



सुप्रसिद्ध मेक-अप् आर्टिस्ट जिमी व्हिनिंग इन्स्टिटयूटच्या विद्यार्थिनी कु. सुधाराणी शर्माच्या चेहऱ्यावर मेक-अप्चे प्रात्यक्षिक करताना.

नावलौकिक इतका वाढला आहे की, नेपाळ, सिलोन, आफ्रिका, इ. देशांतूनही विद्यार्थ्यांचा ओघ या संस्थेकडे वाहत आहे. मात्र असे असूनही व ही संस्था महाराष्ट्रामध्ये असूनही मराठी माणसे या संस्थेकडे आकर्षित होत नाहीत व नजरेत भरण्याजोगी कामगिरीही संस्थेतून बाहेर पडलेल्या पदवीधरांनी केलेली दिसत नाही.

१९६१ साली ही संस्था सुरू झाली. तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करून १९६४ मध्ये २१ विद्यार्थ्यांची पहिली तुकडी बाहेर पडली. आतापर्यंत सुमारे ६५ पदवीधर या संस्थेतून बाहेर पडले. त्यांपैकी एकाचेही नाव चित्रपटक्षेत्रात ऐकू येत नाही. दोन–चार विद्यार्थी परदेशी पाठविण्यात आले आहेत. त्यांच्या कार्याबद्दल वारंवार टिमकी वाजविण्यात येते. पण इतरांबद्दल माहिती देण्यात येत नाही. पहिल्या काही तुकड्यांच्या विद्यार्थ्यांना फिल्म इन्स्टिटयूटमध्येच नेमणुका देण्यात आल्या आहेत. चार–दोन मंडळी मुंबईच्या चित्र व्यवसायात टक्के–टोणपे खात आहेत, तर कित्येक पदवीधर चित्रव्यवसायाखेरीज इतरत्र नोकऱ्या करत आहेत. केवळ नाईलाज म्हणून.

खूप वर्षांचा अनुभव पदरी असूनही मुंबईमध्ये अमाप तंत्रज्ञ बेकार आहेत. उदा० आज मुंबईमध्ये चित्र–संकलकांच्या संघटनेच्या सदस्यांची संख्या इतकी मोठी आहे की पात्रता असूनही संकलकांना स्वतंत्रपणे काम मिळू शकत नाही. सातत्याने

वीस–पंचवीस वर्षे काम करूनही सहाय्यकाचेच काम करणारी मंडळी पाहण्यात आहेत. चुकून–माकून संधी मिळून स्वतंत्र दिग्दर्शक झालेल्या दिग्दर्शकाला पुढे दोन–दोन वर्षे काम मिळू शकत नाही. अशा परिस्थितीत दरवर्षी चित्र तंत्रज्ञांचा रतीब घालून फिल्म इन्स्टिटयूटला काम मिळणार तेच समजत नाही. शिवाय मुंबईमध्ये गेल्यावर या तंत्रज्ञांना सापत्नभावाने वागवले जाते. मनामध्ये मोठ्या आकांक्षा घेऊन मुंबईत उतरणारे हे फिल्मीपदवीधर काम मिळू न शकल्याने अक्षरशः रडकुंडीस येतात आणि कंटाळून इतर व्यवसायांकडे वळतात.

या सर्व परिस्थितीची फिल्म इन्स्टिटयूटला जाणीव नाही, असे कसे म्हणावे ? सध्या फिल्म इन्स्टिटयूटच्या पदवीधरांना या धंद्यातील नोकऱ्यांबाबतची माहिती इन्स्टिटयूटमार्फत कळवण्यात येते. इन्स्टिटयूटकडून विद्यार्थ्यांना सरकारी नोकऱ्या देण्याबाबतही खटपट करण्यात येते. परंतु, जोपर्यंत मुंबई, कलकत्ता, मद्रास येथील चित्र-व्यवसाय या पदवीधर तंत्रज्ञांकडे आकर्षित होत नाहीत तोपर्यंत या तंत्रज्ञांचे नोकऱ्यांचा प्रश्न समाधानकारक रीतीने सुटणे केवळ अशक्य आहे. □

## २ : निर्भेळ करमणूक – गुरुकिल्ली

प्रदीर्घ कालानंतर परांजपे-फडके-माडगूळकर ही मराठी चित्रपट सृष्टीतील श्रेष्ठी-मंडळी 'गुरुकिल्ली'च्या निमित्ताने 'श्रीपाद चित्र'च्या निशाणाखाली एकत्र आली आहेत.

श्री. द. मा. मिरासदार यांच्या 'व्यंकूची शिकवणी' या फक्कड कथेवरून 'गुरुकिल्ली' चित्रपटाची कल्पना सुचली आहे. या कथेवर वास्तविक, केव्हाच चित्रपट निर्माण व्हायचा. पण या ना त्या कारणाने काम रेंगाळले खरे. खुद्द राजाभाऊंकडे ही कथा जवळ जवळ दोन वर्षे होती. 'पडछाया' नंतर पुन्हा विनोदी चित्रपट निर्माण करण्याचे ठरल्यावर त्यांनी ती हाती घेतली. पटकथा, संवादलेखन व गीतरचनेचे काम ग. दि. मां. कडे सोपवण्यात आले. मग मात्र सर्व कामाला अशी काही गती आली की, घोषणा झाल्यापासून चार-सहा महिन्यांचे आतच चित्र प्रदर्शितही झाले.

अत्यंत सरळ व एकमार्गी आयुष्य जगणाऱ्या रामभाऊ रेगे चहावाले यांच्या तालमीत तयार झालेल्या त्यांच्याच मुलाची ही कथा आहे. वडिलांप्रमाणेच चिरंजीवही साधेभोळे व सरळ मार्गी आहेत. मास्तराच्या नोकरीला आवश्यक असणारा बी. एड्. चा शिक्का मिळवून ही स्वारी पारगाव या छोट्या खेड्यात मास्तरकीसाठी रवाना होते. ज्या गाडीने हे रघुनाथ रेगे, बी. ए. बी. एड्. पारगावला येतात, त्याच गाडीतून गावच्या सरपंच देशमुखांची कन्या येत असते. या कन्येला पाहण्यासाठी म्हणून सारगावचे विलासी जहागिरदारही याच गाडीतून पारगावाला येऊन थडकतात.

समजुतीचा घोटाळा होऊन रघुनाथलाच नियोजित जावई समजण्यात येते. आणि मास्तरांचे पार्सल थेट देशमुखांच्या घरामध्ये येऊन पडते. (असेच काहीतरी, पूर्वी कुठेतरी पाहिल्यासारखे वाटते ना?—तेवढे चालाय-चेच.) जावयाचे लाड सुरू होतात. आंघोळीला चंदनी साबण काय, टबबाथ काय, नंतर चहा, टोस्ट, जाम नुसती चंगळ! (खेड्यात हे सर्व कसे अशी शंका अप्रस्तुत.) सरपंचांची कन्या प्रभा रघुनाथकडे आपला भावी पती या दृष्टी-कोनातून पाहू लागते.

देशमुख आल्यावर सर्व गोष्टींचा उलगडा होतो. गावच्या सरपंचांच्या घरी मास्तराने पाहुणचार झोडायचा म्हणजे काय? संताप-लेले देशमुख मास्तराची रवानगी गावाच्या दत्त मंदिराकडे करतात. यडू वडार नावाच्या गावकऱ्याची रघुनाथची गाठ पडते. वडाराच्या-कडे असलेली जुनी जागा रघुनाथला मिळते व आणि मध्येच शाळा सोडलेल्या आपल्या पोराची पेशल शिकवणीही वडार या मास्तराला देतो.



मैदान मारले

## पावशेर कोंबडी

मिरासदारांची खरी कथा इथूनच सुरू होते बरं का मंडळी! पावशेर कोंबडीला दोन शेर मसाला असे वाटते खरे. पण मसाला ग. दि. मां.नी अशा काही खुमारीने भरला आहे की, कोंबडी एकदम टेसदार व्हावी.

यडू वडाराचे पोरगे महावस्ताद. स्वत: तर शिकतेच, पण शिकता शिकता गुरूलाही शिकवून जाते. शाळेत पोरांना शिकवणे आणि घरी प्रेमाचा पाठपुरावा करणाऱ्या सरपंचाच्या पोरीला चुचकारणे अशी दुहेरी कामगिरी रघुनाथ पार पाडत असतो. परमशिष्य व्यंकोबा वडाराचे सुयोग्य मार्गदर्शनाखाली प्रभा—प्रेम प्रकरणातही यशस्वी होतो.

रघुनाथ रेगेची प्रमुख भूमिका राजा गोसावींनी ए वन् केली आहे. साधा, सरळ, प्रसंगी मिस्किल रघुनाथ राजा गोसावींनी समर्थपणे उभा केला आहे. रघुनाथमधील बदलही त्यांनी योग्य प्रकारे दाखवला आहे. प्रणय दृश्यांतून जसा त्यांनी जिवंतपणा आणला आहे त्याचप्रमाणे गंभीर प्रसंगही (देवळातील गाणे, देशमुखांच्या वाड्या-

तील शेवटची दृश्ये ) त्यांनी यशस्वीपणे उभे केले आहेत. गेल्या दोन-अडीच वर्षातील त्यांचे चित्रपट म्हणजे विदूषकी चाळे, असे समीकरण होते. परंतु राजा परांजपे यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली ' राजा गोसावी 'ची स्वारी ' फुल फॉर्म ' मध्ये आली.

नवतारका संजीवनी हिची स्थिती बरोब्बर उलट आहे. आपल्या प्रत्येक चित्रपटातून नवीन नायिकेचे प्रदर्शन केलेच पाहिजे, असा निश्चयच राजाभाऊंनी केलेला दिसतो. इतकी सामान्य नायिका त्यांनी का निवडावी हेच समजत नाही. अभिनय बेताचाच, सौंदर्य—न बोललेलेच बरे ! संवाद तोंडाने बोलल्यास प्रेक्षकांना समजत नाहीत अशी बाईची समजूत असल्याने ते मानेने बोलून दाखवण्याचा नवीनच प्रकार त्यांनी करून दाखवला आहे. एवढयाने भागले नाही म्हणून की काय, नायिकेचे स्नानदृश्य पाहण्याचे दुर्दैव प्रेक्षकांच्या वाटयास आले आहे. इतके भिकार स्नानदृश्य पूर्वी कधीच पाहिल्याचे स्मरत नाही. स्नानगृहातील बाईंच्या दृश्यापेक्षा रघुनाथचे ' रिॲक्शन शॉटस् ' कधी येतात, याचीच प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघतात.

रामभाऊ चहावाल्याची छोटी भूमिका राजाभाऊंनी कमालीच्या तन्मयतेने सादर केली आहे. सारगावच्या जहागिरदाराच्या भूमिकेमध्ये रमेश देवने आपली नाटकी अभिनयाची परंपरा प्रामाणिकपणे पुढे चालवली आहे.

सुषमा ( चांदणी ), बाळ गोसावी ( व्यंकू ), राजाभाऊंचे प्रथम क्रमांकाचे सहाय्यक दत्ता मायाळू ( केशव ), बर्ची बहाद्दर ( यडू वडार ), शांता तांबे ( सौ. देशमुख ), विनय काळे ( सरपंच देशमुख ) या कलावंतांच्या भूमिका समाधानकारक आहेत. वसंत शिंद्यांसारखा कलावंत योग्य संधीअभावी वाया गेला आहे.

## राजाभाऊंचे श्रेय

दिग्दर्शक या नात्याने राजाभाऊंनी फिरून एकदा मैदान मारले आहे. राजा गोसावींच्या गुणांचा लाभ उठवून विदूषकीपणाला मात्र कौशल्याने फाटा दिला आहे. छोटया भूमिकांवरही भरपूर मेहनत घेतलेली आहे. संजीवनीचा अपवाद वगळता पात्रयोजना अचूक आहे.

राजाभाऊंच्या दिग्दर्शनातील बारकावे जागोजागी दिसून येतात. रघुनाथ शाळेतून घरी येतो. जाताना कुलूप लावले असूनही कुलूप निघाल्याचे पाहून भांबावून जातो. संपूर्ण दृश्याला राजाभाऊंचा स्पेशल टच आहे. रघुनाथ जावई म्हणून सरपंचांचे घरात आल्यावर जी मजा उडते, त्यातही अनेक ठिकाणी दिग्दर्शक दिसतो.

विनोदी दृश्यांइतकेच गंभीर प्रसंगही समर्थपणे हताळले आहेत. रामभाऊ घरमालकांच्या दिवाणाकरवी रघुनाथला पत्र लिहितात, तो प्रसंग व रघुनाथ शाळेतील विद्यार्थ्यांना कै. लालबहादूर शास्त्रींसंबंधी गोष्ट सांगतो, तो प्रसंग यांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

प्रभा व रघुनाथ यांचेमधील ओढयाकाठची दोन्ही प्रणयदृश्ये संवाद, टेकिंग व

राजा गोसावींचा अभिनय या दृष्टीने प्रथम श्रेणीची आहेत.

चित्रपटाचा शेवटही मोठा मार्मिक केला आहे. पण काव्यपंक्ती घेऊन जाणाऱ्या कॅमेऱ्याबरोबरच प्रेक्षक रंगून गेल्याने रघुनाथ व प्रभा यांचेमधील दुहेरी अर्थाने भरलेल्या संवादांकडे जावे तेवढे लक्ष जात नाही.

सुधीर फडके यांचे पार्श्वसंगीत हलके फुलके व कथेशी एकजीव होणारे आहे. गीतांच्या चालींमध्ये फारशी चमक नाही; पण भावपूर्ण गीत व उत्कृष्ट टेकिंग यांमुळे 'काल झाली भेट येथे आजही होईल का ! तो पुन्हा येईल का ' हे गीत लक्षात राहील.



फुल फॉर्म

पटकथा, गीतलेखन व संवाद अशी तिहेरी कामगिरी ग. दि. माडगूळकरांनी यशस्वीपणे पार पडली आहे. सर्व गीते प्रासादिक आहेत. 'अजब गुणांची वनस्पतीही साऱ्यांनी खावी ' हे तंबाखूवरील गीत लावणीलागोपाठ आल्याने दोन्ही गाणी थोडाफार मार खातात. ग. दि. मां. नी संवाद उत्कृष्ट फुलवले आहेत. साधे, सोपे व घरगुती ही त्यांच्या संवादांची वैशिष्टये सांगता येतील.

रघुनाथ घरी एकटा जेवत असताना त्याला जे कल्पना-भोजन घातले आहे ( भात मोकळा, जिरेसाळीचा, थर त्यावरती घट डाळीचा, रसाळ लिंबू पिवळे धमक इ. ) ते मोठे मनोरंजक वाटते.

चित्रपटाची तांत्रिक अंगे सर्वसाधारणपणे समाधानकारक आहेत. 'अजब गुणाची वनस्पती ' गाण्याचा शेवटचा भाग व त्यानंतरचे रघुनाथचे काही शब्द 'आऊट-सिंक ' आहेत. बहुतेक बाह्य चित्रीकरणाचा दर्जा समाधानकारक आहे.

एकंदरीने बऱ्याच दिवसांनी एक निर्मळ, करमणूकप्रधान, सरस चित्र मराठी प्रेक्षकांना दिल्याबद्दल 'श्रीपाद चित्र' चे अभिनंदन.



# लांडोबा-पुंडोबांची नवी कहाणी

[पृष्ठ ११ वरून चालू]

त्यांनी बंडखोरांना बजावले. शिलु आओ यांना शांतता वाटाघाटीतून वगळता येणार नाही. या कणखर इशाऱ्यामुळे बंडखोर नरमले आणि अखेर ५ सप्टेंबर १९६४ रोजी त्यांनी शांततेचा तह केला. नागाप्रकरणी युद्ध पर्व संपून शांतिपर्वाला सुरुवात केली.

पण या शांतिपर्वात दिल्लीश्वरांनी नीतिपर्वाच्या तत्त्वांची उपेक्षा केली व नागांनी मात्र त्यांचा कित्ता गिरवून या शांततेचा उपयोग आपली बाजू मजबूत करून घेण्याकडे पुरेपूर करून घेतला. शेकडो नागा जंगलमय सरहद्द ओलांडून पूर्व पाकिस्तानात टोळीटोळीने जात राहिले. नव्या शस्त्रास्त्रांचे साहित्य व शिक्षण घेऊन परत येत गेले. संसदेत आरडा झाला, देशात ओरड झाली. संरक्षण-व्यवस्थेची अशीच रड राहणार असेल तर नुसते मेनन गेले, चव्हाण आले या खांदेपालटाने काय होणार, अशी चर्चा लोक करू लागले. आज मिझोंनी उठाव केल्यावर सरकार जागे झाले, नागांनी तीन आगगाड्या उडवून दिल्यावर त्याची झोप उडाली. आणि मिझोपासून तर मणिपूर, नागालॅण्ड आणि नेफाचे ईशान्य विभागातील वालाँग-पर्यंतची एक सलग चिचोळी पट्टी भारताकडून तोडून स्वतंत्र सार्वभौम भूप्रदेशाच्या स्वरूपात पाकिस्तान व चीन यांच्या कृपेने वेगळी करायची जी पाताळयंत्री योजना शिजली असल्याच्या बातम्या आता येत आहेत, ती योजना तेव्हापासूनच सतत खदखदत असल्याच्या वार्ता सरकारच्या कानीकपाळी ओरडून सांगण्यात येत असतानाही तिकडे कानाडोळा करण्यात आला. नागा आधुनिकतम रॉकेट्सनी सुसज्ज झाले आहेत. फूमरदिंग, लुमडिंग व दिपू या स्टेशनांवर झालेले भीषण स्फोट परदेशी बॉम्बमुळेच संभवतात असा शोध सरकारला आता लागला आहे. शांतता मंडळाच्या कार्याचा फाफटपसारा पसरविला जात असताना तिकडे स्कॉट बंडखोर गुंडखोरांना लांबोडा पुंडोबांना, "न धरी शस्त्र करी मी. ." या बोलण्याने "युक्तीच्या चार गोष्टी" सांगत होता. शांतिपर्वातील नीतिपर्वाची आम्ही उपेक्षा केली आणि त्याने मात्र युद्धपर्वाला नीतिपर्वाचा बुरखा पांघरून शांतिपर्वाचे सोंग आणून दिले.

## पाटसकरांचा इशारा

ना. पाटसकर आसाम डोंगरी जिल्हा मंडळाचे अध्यक्ष असताना त्यांनी कै. शास्त्रींना पत्र लिहून नागांची ही अशी गय केल्याने परिणामी आपल्याला किती भयंकर परिणामांना तोंड द्यावे लागेल याची कल्पना देणारे एक मोठे मार्मिक वर्णन केले होते. शस्त्रसंधीची मुदत दर तीन महिन्यांनी वाढविली जाणे दिशा-

मूल करणारे आहे. या लांडोबांना लाडोबा करणारे आहे, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला होता. आता जाहीर करायला हरकत नाही, शास्त्रीनी पाटसकरांचे म्हणणे मान्य असल्याचे त्यांना कळवले होते. . . आणि ही नागांना व स्कॉटलाही शेवटची संधी आहे . . . असे त्यांना उत्तर दिले होते. दुर्दैवाने शास्त्रीजी अचानक निघून गेले. ताश्कंदला प्रस्थान करण्यापूर्वी त्यांनी व्यक्त केलेला हा निर्धार सरकार दप्तरी तसाच गुंडाळून राहिला. बंडखोर पुंडोबांच्या नेत्यांशी दिल्लीत बोलणी झाली. नाव त्याचे सुखाई पण आचरण मात्र सुखाबाईसारखे. दिल्लीत केंद्र सरकारच्या नाकावर टिच्चून आपण सकलतंत्र स्वतंत्र सर्वभौम नागासंघराज्याचे पंतप्रधान आहांत अशी वल्गना त्याने केली. स्कॉट त्या वेळी हजर होता. पत्रकारांनी त्यांना छेडले. अखेर नागांचे खरे रूप उघड झाले. पण एव्हाना शास्त्रींनी दाखवलेली समयसूचकता लोप पावून शिलु आओची या वाटाघाटीतून उचलबांगडी झाली होती. त्यामुळे निर्माण होणारी विमनस्कता स्वाभाविक होती पण इंदिरेने दुर्गा बनता येते हे दाखवले. स्कॉटची हकालपट्टी झाली. आता सुखाई एकटा पडला (पण परदेशात त्याचे लागेबांध आहेत) दिल्लीत ब्राह्मतेजाचे पर्व संपून क्षात्रतेजाचा उदय झाल्याची ही प्रसादचिन्हे आहेत.

उद्याची आजी आपल्या नातवंडांना नागांची ही कहाणी जेव्हा सांगेल तेव्हाच लांडोबा पुंडोबांची ही नवी साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण होईल. आणि तरच दर वर्षी १७ कोटी रुपयांचे केन्द्रीय दूध या नागांना पाजल्याचे सार्थकही होईल. ●


**आमच्या आगामी यात्रा**

**(उत्तर भारत यात्रा)**

श्री बद्रीकेदार नारायण यात्रा (९ जून ६६)

**(दक्षिण भारत यात्रा)**

काशी–हरद्वार : रामेश्वर कन्याकुमारी (२४ जुलै ६६)

भू–नंदन काश्मीर (ऑगस्ट ६६)


चौकशी : **राजकमल यात्रा कंपनी**

६०५ शनवार, लोखंडे तालमीजवळ, पुणे २

( मालक : कर्वे बंधु : फोन ५४४५७)

हरीद्वार ते हरीद्वार...४२५ रु. फक्त

# নাৎসী



# भस्मासुराचा उदयास्त

: लेखक :

रा. म. शास्त्री

पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे.

रॉयल आकार : पृष्ठसंख्या सुमारे पाचशे

भरपूर छायाचित्रे

**किंमत : अठरा रुपये**

प्रसिद्धिपूर्व सवलतीची किंमत

**रुपये बारा केवळ**

- *सवलतीची मुदत ३१ मे १९६६ पर्यंत*
- *रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास दोन रुपये टपालखर्च अधिक पडेल. (१२ + २ = १४ रु.)*

**राजहंस प्रकाशन**


४१९ नारायण पेठ, पुणे २

MANOOS (Fortnightly) : 1 Mar 1966 : 40 Paise : Regd. No. M H–649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स




Parkerson/srp/13

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **श्री. ग. माजगावकर**